# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १५/२००५.** **दिनांक ५.११.२००५.**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.३० वाजता.**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ५ नोव्हेंबर, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१२१७२-२००५, दि. २० ऑक्टोबर,२००५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ५ नोव्हेंबर, २००५ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील. | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्री. प्रकाश रामदास काळे |
| ०७. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव | ०८. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे. |
| ०९. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया | १०. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ११. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १२. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर. |
| १३. | मा.श्री.कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय | १४. | मा. डॉ. पी. एल. तिवारी. |
| १५. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. | | |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री समि खतिब व मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांचे फॅक्स /ई-मेल संदेशांची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६५०.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना निर्णय क्र.६३९ मध्ये शेवटी - " त्यावर चर्चा होऊन रुपये २५,०००.०० मासिक लायसेन्स फी आकारुन इमारतीचा पहिला मजला १२ महिनेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेस सदरचा कालावधी नंतर पुढील कालावधीसाठी ज्या त्या वेळी विचार विनिमयाने निर्णय घेता येईल."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

" त्यावर चर्चा होऊन रुपये २५,०००.०० मासिक लायसेन्स फी आकारुन इमारतीचा पहिला मजला १२ महिनेसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देणेस मान्यता देणेत आली. सदरचा कालावधी नंतर पुढील कालावधीसाठी ज्या त्या वेळी विचार विनिमयाने निर्णय घेता येईल, असें ठरले."

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२. दिनांक ०१.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.६५१.** दिनांक १.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सल्लागार समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, ते सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवण्यात आलेले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

(०१) शिर्डी येथे अत्याधुनिक पध्दतीचे बसस्थानक बांधणेकामी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सादर केलेल्या प्लॅन एस्टीमेटनुसार नवीन मल्टी स्टोरीड बसस्थानकाचे बांधकाम संस्थानमार्फत करणेबाबत व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याचा ताबा संस्थान महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अ.नगर यांना देईल, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

(०२) गट नं. १७२ चे दक्षिणेकडील चरालगतचा रस्ता विकसीत करणेसाठी प्रथमतः जलनिःसारण विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मे. गोदावरी जलनिःसारण मंडळ, नाशिक यांनी याकामी त्वरीत मान्यता द्यावी यासाठी मा. जिल्हाधिकारी संबंधितांना सूचना देणार असल्याचे सांगणेत आले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/पाणी पुरवठा प्रमुख)

(०३) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पावसाचे पाणी तसेच सांडपाणी वाहून जाणेसाठी योग्य व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने इरिगेशनचे चारीवरील अतिक्रमण काढण्यासाठी मा. कार्यकारी

अभियंता, पाटबंधारे विभाग, नाशिक यांना याबाबत सत्वर कार्यवाही करणेबाबत सूचना देणेबाबत व केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत समिती सदस्य मा. आमदार श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचेकडे देण्यात यावी, असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०४) भांडार इमारतीकडे जाण्यासाठी चारी नं. १२ वर सी. डी. वर्क करणे आवश्यक आहे. सदरचे काम संस्थानचे निधीतून करणेत येणार आहे. याकामी मा. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी त्वरीत मान्यता द्यावी, असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(०५) संस्थानने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव को-हाळे येथील हेक्टर ४५.६४ आर जमीन सुसज्ज रुग्णालय व इतर लोकपयोगी कामासाठी मिळावी म्हणून संस्थानने पत्र क्रमांक एसएसएस/वशी-०२/८५०५/२००२ दिनांक २३/०९/२००२ अन्वये मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेक्डे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

त्यावर मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दिनांक १२/१२/२००२ रोजीचे पत्राने संस्थानला महाराष्ट्र भूसंपादन कायदा १८९४ परिच्छेद २६१ अन्वये जमीन मालकाने आगाऊ रकमेची मागणी केल्यास त्यांना जमिनीच्या होणा-या संभाव्य विनंतीच्या ८० टक्के रक्कम आदा करावी असा नियम आहे. जमीन मालक आपणांस अगाऊ ताबा देणेस तयार आहेत. त्याप्रमाणे आपणास ताबा देण्याची कार्यवाही करीत आहोत. आपणास ताबा दिल्याशिवाय सदरची रक्कम जमीन मालकास अदा केली जाणार नाही तरी सदरची रक्कम आपण सत्वर इकडेस जमा करावी असे संस्थानला कळविले होते.

त्यानंतर ८० टक्के रक्कम रुपये ५,८५,००,०००/-संस्थान कडून शासनामार्फत शेती महामंडळास देणेसाठी भूसंपादन कार्यालयास जमा केलेली आहे. आदा रकमेवर शेती महामंडळ यांचेकडून संस्थानला दि २२/०१/०३ रोजी जमिनीचा ताबा ( ८५ आर जागेचा ताबा सोडून उर्वरित हेक्टर ४४.७९ आर) प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त विषयाबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना प्रारुप निवाडा एल.ए.क्यु/एस.आर/१/२००२ दिनांक ३१/०८/२००५ तयार केला आहे. सदर निवाडयामध्ये एकतर नुकसान भरपाईची रक्कम रुपये १०,१५,८४,८७०/- (अक्षरी रुपये दहा कोटी ,पंधरा लाख,चौ-याऐंशी हजार, आठशे सत्तर) दाखविण्यात आलेली आहे. आतापर्यंत संस्थानने मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना नुकसान भरपाईच्या रक्कमेपोटी वेळोवेळी जमा केलेली एकूण रक्कम रुपये ८,३४,६६,००२/- (अक्षरी रुपये आठ कोटी, चौतीस लाख, सहासष्ट हजार, दोन ) फक्त अदा केलेले आहेत ही रक्कम वजा जाता रक्कम रुपये १,८१,१८,८६८/- (अक्षरी रुपये एक कोटी, एक्याऐंशी लाख, अठरा हजार, आठशे अडूसष्ट मात्र) ची मागणी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी केलेली आहे.

उपरोक्त निवाडयामध्ये त्यांनी अतिरिक्त घटक १२ टक्केची रक्कम दिनांक १९/१२/२००२ (भू संपादन कायदा कलम ४ नोटिफिकेशनची तारीख) ते दिनांक ३१/०८/२००५ (निवाडयाची तारीख) पर्यंत आकारणी रक्कम रुपये १,९६,८९,९५०/- अक्षरी रुपये (एक कोटी, शहाण्णव लाख, एकूणनव्वद हजार, नऊशे पन्नास ) फक्त ची आकारणी केलेली आहे . भूसंपादन कायदा कलम २३ (१-अ) मध्ये १२ टक्के अतिरिक्त घटकांची रक्कम ही जमिनीचा ताबा घेतल्याच्या तारखेपर्यंत अथवा निवाडा जाहीर करण्याचा दिनांक यापैकी जी अगोदर तारीख आहे तो पर्यंत आकारणी व्हावी अशी तरतूद आहे शेती महामंडळाकडून जमिनीचा ताबा दिनांक २३/०१/२००३ रोजी घेतलेला असल्याने तेथ पर्यंतच आकारणी आवश्यक आहे, असे मत आहे. निवाड्यामध्ये भूसंपादन कायद्या अंतर्गत ताबा मिळणार असेही नमूद केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अदाई रकमेबाबत मार्गदर्शन व्हावे अशी विनंती मा.कार्यकारी अधिकारी यांनी केली होती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी मागणी केलेली रक्कम रुपये १,८१,१८,८६८/- अंडर प्रोटेस्ट भरणा करण्यात यावी, अशी सल्लागार समितीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

(०६) नगर पंचायत, शिरडी यांनी साई भक्तांकडून कोणताही कर वसूल करु नये. पथकर नाका बंद करावा अशी विनंती संस्थानने जा क्र १२३१०/ दिनांक ३१/१२/२००४, जा क्रं. ४०५४/ दिनांक २२/०४/२००५ ने नगर पंचायत शिर्डी यांना केली होती. त्याचप्रमाणे शिरडी येथे भक्तांकडून पथकर आकारणे बाबत रेग्युलर मुकादमा ३७/९३ ( खाजगी व्यक्तीचा दावा आहे ) प्रमाणे मनाई असल्याचेही नगरपंचायत शिरडी यांना कळविणेत आलेले आहे. पथकर संस्थानकडूनच आकारला जातो असा भक्तांमध्ये गैरसमज होतो. तेंव्हा भक्तांकडून कोणत्याही स्वरुपात कर आकारू नये असे नगरपंचायत शिरडी यांना कळविणेत यावे असा व्यवस्थापन समितीचे दिनांक १७/११/०५ रोजीचे निर्णयास अनुसरुन प्रस्तूतची विनंती शिर्डी नगरपंचायतीस करण्यात आली होती.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी उपरोक्त निर्णयाचे संदर्भात दिनांक १८/०३/२००५, दिनांक ११/०५/२००५ व दिनांक ११/०७/२००५ चे पत्र पाठविले आहे.

नगरपंचायतीने टोल नाक्यापासून मिळणा-या उत्पन्नाचा तक्ता दिनांक ११/०७/२००५ चे पत्रासोबत पाठविला आहे त्याबाबत शिरडी नगरपंचायत, शिरडी यांना सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात टोलनाक्यापासून रक्कम रुपये ४५,६१,९९०.०० मिळालेली आहे असे दिसून येते.

दिनांक ११/०७/२००५ चे पत्रात त्यांनी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी यांनी नगरपंचायतीला विशेष स्वच्छता आकार व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करावा व त्यापोटी नगरपंचायतीस सन २००४-२००५ साली रु.४५,६१,९९०/- टोल नाक्यापासून मिळाले तेवढी रक्कम प्रतिवर्षी मिळावी. तसेच त्यात प्रतिवर्षी २० % वाढ करणेत यावी. ५ वर्षाची रक्कम आगाऊ भरावी अशी विनंती केली आहे संस्थान कडून निश्चित धोरण त्यांना कळविलेस मंजूरीसाठी शासनास प्रस्ताव सादर करता येईल असेही त्यांनी पत्रात कळविले आहे.

टोलनाका- पथकर बंद करणेसाठी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगर पंचायत, शिरडी अनुदान देणेबाबत त्याबाबत शासन मान्यता घेणेबाबत निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुषंगाने अनुदान ठरविणेबाबत तसेच श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांचे मालकीचे इमारतीवर नगरपंचायत यांचे मार्फत मालमत्ता कर व त्या अनुषंगाने इतर कर उदा. शिक्षण कर, स्वच्छता कर, रोजगार हमी कर यांची साधारणत: रुपये २६,००,०००/- मात्रची आकारणी होते. सदर करातून सवलत मिळणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०६.०८.२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपालिका यांना द्यावयाचे रकमेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे समितीने अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें.

त्यानंतर सल्लागार समितीचे सभेत उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा झाली मा.जिल्हाधिकारी यांनी शिरडी नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्यामूळे व संकलित मालमत्ता कर हे उत्पन्नाचे मुख्य साधन आहे त्यामुळे संकलित मालमत्ता कराबाबत (सुट देणेची) आग्रही मागणी करण्यात येऊ नये असे सुचविले. तसेच मा.मुख्याधिकारी, शिरडी नगरपंचायत, शिरडी यांनी "शिरडी नगरपंचायत क्षेत्रातील हद्दीमध्ये येणाऱ्या यात्रेकरुंच्या प्रवासी वाहनांवर विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर यांची आकारणी केली जाते. व येणाऱ्या करापोटीचे उत्पन्न शहरातील स्वच्छतेशी निगडीत असलेल्या बाबींवर खर्च केला जातो," असे सांगितले.

प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन, सल्लागार समितीचे सभेत प्रस्तावास खालीलप्रमाणे तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर आकारु नये याकरीता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रुपये ३९,६१,९९०/- पुर्णांकित रक्कम रुपये ४०,००,०००.०० (अक्षरी रुपये चाळीस लाख मात्र) प्रति तीन महिन्यास रुपये १० लाख याप्रमाणे आगाऊ रक्कम शिर्डी नगरपंचायतीस देण्यात यावी असे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सांगितले, सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली. सदरहू विषय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा. त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कारवाई करण्यात यावी, असें ठरलें.

सल्लागार समितीची उपरोक्त शिफारस विचारात घेता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ने भक्तांकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर आकारु नये. यासाठी भक्तांचे सोयीसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना प्रतिवर्षी रुपये ४०,००,०००/-अनुदान (प्रति तीन महिन्यास रुपये १० लाख याप्रमाणे) द्यावेत असें सर्वानुमते ठरले. याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे कलम (२) (C) अन्वये शासनाची पूर्व परवानगी घ्यावी असेंही ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

(०७) दिनांक २८/०५/२००४ रोजीच्या नगर पंचायतीचे सभेत विषय क्रमांक १८ (२) नगरपालिकेच्या वाचनालया संदर्भात खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

" शिरडी नगरपंचायत मालकीचे वाचनालय सध्या चावडी समोरील जागेत चालू आहे. सदर जागा ही नगर पंचायत मालकीची असून ती श्री साईबाबा संस्थानकडे वर्ग करणेबाबत सभागृहात चर्चा करणेत आली. सदर वाचनालयाची जागा ही श्री साईबाबा संस्थानला दिल्यास त्याबदल्यात संस्थानने दुस-या ठिकाणी नगर पंचायतीस वाचनालय बांधून द्यावे असे श्री अरुणकुमार दोडिया यांनी सुचविले. सदर वाचनालयाचे जागेचा उपयोग श्री साईबाबा संस्थानला पालखीचे वेळेस व इतर धार्मिक कार्यक्रमाच्या वेळेस करणे सोईचे होईल. तरी सदर जागा श्री साईबाबा संस्थानकडे वर्ग करणेस सभागृहाने सर्वानुमते मंजूरी दिली."

उपरोक्त ठरावांची माहिती संस्थानला प्राप्त झाल्यावर त्याबाबत दि २७/१२/२००४ रोजी संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्रमांक १८२ खालील प्रमाणे झाला आहे.

"उपरोक्त ठरावाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, शिरडी नगरपंचायत सदर जागेच्या मोबदल्यात अन्य जागेवर वाचनालयाची इमारत बांधून देण्याचे अटीवर सध्याच्या वाचनालाची जागा देत आहे.

थोडक्यात या जागेच्या मोबदल्यात त्यांना संस्थानकडून वाचनालयाचे इमारतीचे बांधकाम अपेक्षित असल्याचे दिसते. वाचनालयाची सध्याची जागा मोक्याच्या ठिकाणी असल्याने नगरपंचायत प्रस्तुत मिळकत संस्थानला मालकी हक्काने हस्तातंरीत करून देत असल्यास ती स्विकारता येईल तसेच नगर पंचायत शिरडी यांना वाचनालयासाठी दुसरे ठिकाणी इमारत बांधून देण्यात येईल. तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात यावी.

सदरच्या ठरावानंतर मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगर पंचायत, शिर्डी यांना दिनांक २७/०४/२००५ चे पत्राने प्रस्तुतच्या जागेचे सिटी सर्व्हे उता-याप्रमाणे तसेच नगर पंचायत उताऱ्याप्रमाणे हद्द निश्चिती Demarkation बाबतची कार्यवाही करण्याची विनंती केली होती. त्याप्रमाणे हद्द निश्चिती झाली म्हणजे संस्थानच्या प्रतिनिधीला ताबा घेणे व इतर दस्तऐवज करणेचे दृष्टीने सोयीचे होईल असे कळविले होते.

मुख्याधिकारी, नगरपंचायत, शिरडी यांनी त्यांचे दिनांक १४/०७/२००४ रोजीच्या पत्राने सदर जागेची मालकी भूमि अभिलेख कार्यालयाचे रेकॉर्डवरुन महाराष्ट्र सरकारच्या नावाने असल्याने सदर जागा संस्थानकडे वर्ग करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस सुचविले आहे. याबाबत कार्यवाही करणेबद्दल मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना विनंती करणेत आली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत कार्यवाही करणेस मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना विनंती करण्यात येऊन मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे संस्थानने दाखल केलेल्या प्रस्तावानुसार मंजूरी प्राप्त झालेवर नगरपंचायतीने सूचित केलेल्या पर्यायी जागेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार शासनाचे परवानगीने नगरपंचायत शिर्डीस पर्यायी इमारत बांधून देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा असा सल्ला देण्यात आला होता, तो मान्य करण्यात आला. (कार्यवाही-विधी अधिकारी)

(०८) राहाता येथील न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती यांचे भेटीच्यावेळी छोटासा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यास श्री. जी. डी. करमासे, अध्यक्ष, राहाता तालुका बार असोसिएशन ने संस्थानमार्फत मागणी केल्याप्रमाणे स्टेज, फुलझाडांच्या कुंडया, मंडप व साऊंड सिस्टीम देण्यास मा. अध्यक्ष यांनी परवानगी दिली आहे. सदरचे कामी रु. १७,०००/- खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत शिफारस करण्यात आली. त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-०५)

(०९) मौजे शिर्डी येथील कलव्हर्ट नं. ३३ व ३४ (सर्व्हे नं. १६० व १६१ च्या दक्षिणेस) तयार झालेली गाळपेर जमीन हेक्टर ०.२९ आर कायम स्वरुपी संस्थानला देणेबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कामी सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, अ. नगर यांचेकडे पाठविणेत यावा, असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी/पाणी पुरवठा प्रमुख)

(१०) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी भू-संपादन प्रकरणातील आरक्षण क्रमांक ८ प्राथमिक शाळा व क्रीडांगण बाबतचे प्रकरण अंतिम टप्प्यावर आहे. निवाडा जाहीर होऊन ताबा सत्वर मिळणे अपेक्षित आहे. उपरोक्त प्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेणेत आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

(११) दारणा धरणातून थेट पाईपलाईनद्वारे संस्थानला पाणी आणणेकामी मा. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सभेस अशी माहिती दिली की सदर पाणीपुरवठा योजना शिर्डी नगरपंचायतीने राबविलेस शासन अशा पाणीपुरवठा योजनेसाठी मोठया प्रमाणावर अनुदान देते. शिर्डी नगरपंचायतीने ही योजना राबविलेस शिर्डी शहरापासून पाच किलोमीटर अंतरापर्यंतचा खर्च शिर्डी नगरपंचायतीस करावा लागेल. उर्वरीत धरणापासून पाच किलोमीटरपर्यतचा सर्व खर्च शासन करेल येणारा पाच कि. मी. चा खर्च नगरपंचायतीस श्री साईबाबा संस्थान देऊ शकेल. याबाबत सविस्तर प्लॅन व एस्टिमेंट मा. मुख्याधिकारी यांनी येत्या सल्लागार परिषदेसमोर सादर करावे असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-पाणी पुरवठा प्रमुख)

(१२) कनकुरी शिवारातील साठवण तलावावरील वॉटर पंप व मशिनरीकरीता ॲडीशनल ट्रान्सफॉर्मर व स्वतंत्र ११ के. व्ही. लाईन टाकून मिळणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून त्वरीत पुढील कार्यवाही होणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर मा. जिल्हाधिकारी, अ. नगर यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने त्यावर तात्काळ कार्यवाही

करणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या, त्यांनी त्या मान्य केल्या. त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

(१३) संस्थानच्या ५०० रुम्सच्या मागील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची ११००० व्होल्टसची वाहिनी ओव्हरहेडऐवजी भूमिगत केबल टाकून योग्य ती कायमस्वरुपी उपाययोजना करावी. यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून त्वरीत कार्यवाही होणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर मा. जिल्हाधिकारी, अ. नगर यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने त्यावर तात्काळ कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या, त्यांनी त्या मान्य केल्या. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

(१४) पोलीस स्टेशनसाठी लोखंडी बॅरीकेटस् तयार करुन मिळणेकामी मा. उपविभागीय पोलीस अधिक्षक, कोपरगाव विभाग शिर्डी यांनी दि. २७.११.२००४ चे पत्रान्वये मागणी केली आहे. सदर कामी रु. ७,०३,६००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. मागणीप्रमाणे त्या तयार करुन द्याव्यात अशी शिफारस करणेत आली. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख/प्रशासन शाखा वशी-०६)

(१५) जिल्हा परिषद स्कूल बिल्डींग साईटवरील मेन एच. टी. लाईन व एल. टी. लाईन शिफ्टींगचे काम त्वरीत सुरु होण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही त्वरीत होणेबाबतचा मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता. यावर मा. जिल्हाधिकारी, अ. नगर यांनी त्यावर तात्काळ कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना सुचविण्यात आले, त्यांनी ते मान्य केले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

(१६) शिर्डी पोलीस स्टेशनच्या अधिकारी/कर्मचारी निवासासाठी दिलेल्या संस्थानच्या निवासस्थानाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की पोलीस अधिकारी यांचेकडे असलेले संस्थानचे निवासस्थान त्यांची इतर ठिकाणी बदली झाल्यास संस्थान नियमाप्रमाणे भाडे वगैरे भरुन संस्थानमार्फतच निवासस्थानाची देवाण-घेवाण करावी. याबाबत मा. अधिक्षक, जिल्हा पोलीस, अहमदनगर यांना कळविणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सुचविले, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

(१७) श्रीसाईबाबा समाधी मंदिराचे सुरक्षा व्यवस्थेबाबत केलेल्या ०१.कर्मचारी प्रशिक्षण, ०२.मेटल डिटेक्टर,०३. संकट कालीन बाहेर जाण्याचा मार्ग, ०४. दुर्बीण, ०५. मोर्चे, ०६. जामर, ०७. बंदुकधारी सुरक्षा रक्षक, ०८. फायर इस्टिंग्युझर, ०९. विशेष सुरक्षा पथक, १०. बुलेट प्रुफ काच, ११. कॉलेप्सिबल गेट, १२. सी. सी. टि. व्ही., १३. वायरलेस इ. सुविधांची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

(१८) नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या स्टाफिंग पॅटर्नबाबतः- सदर कामी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव तपासून तो प्रस्तावित करुन मिळणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर यांना मा. कार्यकारी अधिकारी यांनी केलेली विनंती त्यांनी मान्य केली, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

(१९) उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर व तहसिलदार, राहाता यांना संस्थानतर्फे दिलेल्या वाहनाबाबत शिफारस करण्यात आली, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

(२०) शनिशिंगणापूर, पाथरे, बेलापूर, श्रीरामपूर, वाकडी, शिर्डी रस्त्याची सुधारणा करण्याच्या अंदाजपत्रकाबाबत आणि याबाबत शासकीय मान्यता घेण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

(२१) पशुसंवर्धन व्यवसायास चालना देण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन केंद्रात लॅबसाठी आवश्यक असणारी मशीनरी खरेदी करुन देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समिती पुढे सादर करणेत यावा असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०६)

(२२) जिल्हा परिषद शाळांना बेंचेस तयार करुन देणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०६)

**विषय नं.०३. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ व दि.१४.०८.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र. ६५२.** व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ व दि.१४.०८.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता सप्टेबर , २००५**

**(ब) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) माहे सप्टेंबर, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(ड) माहे सप्टेंबर,२००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**(इ) माहे सप्टेबर, २००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६५३. (A).**माहे सप्टेबर, २००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे २४ ऑक्टोबर, २००५ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे सप्टेबर,२००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेली देणगी, माहे सप्टेबर,२००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंचा अहवाल, माहे सप्टेबर,२००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे सप्टेबर, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ६५३. (B).** माहे सप्टेबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३ रुग्णालयातील रुग्णांना माहे सप्टेबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ६५३. (C).** माहे सप्टेबर,२००५ मध्ये रुग्णालयातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४ माहे सप्टेबर, २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ६५३. (D).** माहे सप्टेबर, २००५ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५ बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ६५३. (E).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. अधिकारी निवासस्थाने बांधकामाचे अंतिम बील अदा करणेसही मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६ पाणी तपासणी अहवाल**

**निर्णय क्र. ६५३. (F).** माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. पोष्ट ऑफिस शिर्डी येथील संस्थानचे बचत खाते बंद करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६५४.** श्रीसाई भक्तांकडून दररोज साधारणत: १५०० ते २००० मनिऑर्डर्सव्दारे संस्थानला देणगी प्राप्त होत आहे. सदर मनिऑर्डर्सव्दारे मिळणाऱ्या देणगी रक्कमेचा दैनंदिन भरणा पोस्ट ऑफीस सेव्हींग्ज अकाऊंट नं.१७९३७९ मध्ये जमा करण्यात येतो. सदरचे अकाऊंट मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी या नावाने आहे.

सदरच्या खात्यामध्ये दरमहा सरासरी रक्कम रू.१५,००,०००/- मात्र जमा होत असते. म्हणजेच सर्वसाधारणपणे मनिऑर्डर्स व्दारे एका दिवसास सरासरी रक्कम रू.५०,०००/- मात्र भरणा असतो.

सब पोस्टमास्तर, सब पोस्ट ऑफीस, शिरडी यांनी त्यांचे कडील पत्र क्र.३७०, दि. ०५/०९/२००५ अन्वये सदरचे बचत खाते क्र.१७९३७९, दि. १५/१२/२००५ पुर्वी बंद करण्यात यावे असे कळविले आहे. याकामी त्यांनी त्यांना वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. २७ जुलै, २००५ च्या राजपत्राची झेरॉक्स प्रत सोबत पाठविलेली आहे.

सदर राजपत्रातील अधिसुचनेत खालीलप्रमाणे नियम बनविण्यात आल्याचा उल्लेख आहे.

अ) व्यक्तिगत खात्याशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही खात्यावर रक्कम स्विकारली जाणार नाही.

ब) व्यक्तिगत खात्याशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही खात्यावर देय असलेली रक्कम दिनांक ३१ डिसेंबर, २००५ पर्यंत त्यांना परत केली जाईल.

क) व्यक्तिगत खात्याशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही खात्यावर जमा असलेल्या रकमेवर दिनांक ३१ डिसेंबर, २००५ नंतर व्याज दिले जाणार नाही.

ड) व्यक्तिगत खात्याशिवाय अन्य दुसऱ्या कोणत्याही खात्यावर देय असलेले व्याज हे दिनांक ३१ डिसेंबर, २००५ पर्यंत किंवा त्यापूर्वी बंद केलेल्या तारखेपर्यंत देय असेल.

वरील अधिसूचनेचा विचार करता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी या नावाने पोस्ट ऑफीस, शिरडी येथे असलेले सेव्हींग्ज अकाऊंट नं.१७९३७९ बंद करणे अनिवार्य आहे.

सदरचे पोस्ट ऑफीस, शिरडी येथे असलेले बचत खाते बंद केले नंतर आपणास पोस्ट ऑफीसमधून दैनंदिन मनिऑर्डर्स भरणा रोखीने अथवा चेकव्दारे स्विकारता येईल तसेच फ्रँकिंग मशिनसाठी द्यावी लागणारी रक्कम रोख स्वरूपात डिपॉझीट करता येईल.

उपरोक्तप्रमाणे वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील दि.२७ जुलै,२००५ च्या अधिसूचनेनुसार दि. ०१/१२/२००५ पासून शिरडी पोस्ट ऑफीसमधील संस्थानचे बचत खाते नं. १७९३७९ बंद करणेस व पोस्ट ऑफीसमधून दैनंदिन मनिऑर्डर्सची रक्कम रोखीने अथवा चेकव्दारे स्वीकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यंता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. स.नं.१४८/२ मधील जमिनीवर साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधणेकरिता प्राप्त झालेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र. ६५५.** संस्थानचे स.नं.१४८/२ जमिनीवर साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधणेकामी आर्किटेक्ट मे. काबरे चौधरी, नाशिक यांनी सादर केलेला आराखडा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०७/२००५ रोजीचे सभेपुढे काबरे चौधरी आर्क्टिेक्टस् यांनी समक्ष सादर केला. या आराखड्यामध्ये दर्शविलेल्या ४ बेडच्या खोल्यांपैकी दोन बेडच्या २५% ते ३०% खोल्या ठेवणेबाबत सभेने त्यांना सांगितले. त्यानुसार सुधारीत प्लॅन तयार करुन त्यामुळे वाढ होणा-या योग्य त्या खर्चास निर्णय क्र. २६० अन्वये मान्यता देण्यात आली. तसेच वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन किमान पात्रतेसाठी अटी नमूद करुन दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या रु. ९,७९,०८,९००/- मात्र अपेक्षित खर्चाचे सुधारीत एस्टिमेटनुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. कोरी निविदा विक्री मूदत दि.२२/०८/२००५ ते ०६/०९/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.१३/१०/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती.

खालील ठेकेदारांनी मुदतीत को-या निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.आर.एल.दलाल ॲण्ड कंपनी प्रा.लि.,मुंबई |
| ०२. | मे.रामके इन्फ्रास्ट्रक्चर लि., हैद्राबाद. |
| ०३. | मे.पवार पाटकर कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०४. | मे.सुयोजित इन्फ्रास्ट्रक्चर लि., नाशिक |
| ०५. | मे.अशोका बिल्डकॉन लि., नाशिक |
| ०६. | मे.ए.व्ही.पंधे, सोलापूर |
| ०७. | मे.पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०८. | मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| ०९. | मे.प्रकाश कन्स्ट्रूवेल प्रा.लि.नाशिक |
| १०. | मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि., मुंबई |
| ११. | मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई |

वरील ११ ठेकेदारापैकी खालील ०६ ठेकेदारांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई |
| ०२. | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०३. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०४. | मे. पवार पाटकर, नाशिक |
| ०५. | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| ०६. | मे. ए.व्ही. पंधे, सोलापूर |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदामधील तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.०१ दिनांक २८/१०/२००५ रोजी व्यवस्थापन समितीचे स्थानिक विश्वस्तांचे सभेत उघडण्यात आलेला होता. या ठेकेदारांनी सादर केलेला निविदांचा लिफाफा क्रं.०२ उघडणेकामी प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांसाठी बांधण्यात येणाऱ्या निवासी खोल्यांच्या इमारतीचे निविदांमध्ये लिफ्ट व सोलर सिस्टीम इत्यादी बाबींचा समावेश नसल्याने त्यांचा निविदांमध्ये समावेश करुन उपरोक्त सादर केलेल्या सहा निविदाधारकांकडून सुधारित देकार मागविण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०७. मौजे निमगांव को-हाळे गट नं.१६९ मध्ये संस्थान वर्ग-४ कर्मचारी यांचेकरिता निवासस्थान बांधणेकरिता प्राप्त झालेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र. ६५६.** मौजे निमगांव को-हाळे गट नं. १६९ मध्ये संस्थानचे वर्ग-४ कर्मचारी यांचेकरीता निवासस्थान बांधणेकामी आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांनी रु.३,७४,७६,२८६/- रकमेचे प्लॅन व एस्टिमेट सादर केले होते. त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२००५ रोजीचे सभेत मान्यता दिलेली असून याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्याचे ठरले आहे.

त्यानुसार इकडील दि.१४/०८/२००५ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. कोरी निविदा विक्री दि. २२/०८/२००५ ते ०६/०९/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.१३/१०/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती.

खालील ठेकेदारांनी मुदतीत को-या निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.आर.एल.दलाल ॲण्ड कंपनी प्रा.लि.मुंबई |
| ०२. | मे.रामके इन्फ्रास्ट्रक्चर लि.,हैद्राबाद (A.P.) |
| ०३. | मे.पवार पाटकर कन्स्ट्रवेल, नाशिक |
| ०४. | मे.सुयोजित इन्फ्रास्ट्रक्चर लि., नाशिक |
| ०५. | मे.अशोका बिल्डकॉन लि., नाशिक |
| ०६. | मे.विशाल कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई |
| ०७. | मे.अे.व्ही.पंधे, सोलापूर |
| ०८. | मे.पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०९. | मे.प्रकाश कन्स्ट्रवेल प्रा.लि.,नाशिक |
| १०. | मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि.,मुंबई |
| ११. | मे.एम.आर.मुथा, इंजि.ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अ.नगर |
| १२. | मे.टेक-युनिक कन्स्ट्रवेल प्रा.लि.,नाशिक |
| १३. | मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| १४. | मे.हर्ष कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| १५. | मे.नितीन बी.औताडे, पोहेगांव |
| १६. | मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई |

वरील १६ ठेकेदारांपैकी खालील ०७ ठेकेदारांनी विहीत मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई |
| ०२. | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०३. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०४. | मे. वाघ बिल्डर्स, कोपरगांव |
| ०५. | मे. विशाल कंन्स्ट्रक्शन नवी मुंबई |
| ०६. | मे. ए.व्ही. पंधे, सोलापूर |
| ०७. | मे.एन.बी. औताडे, पोहेगांव |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांमधील तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.०१दि. २८/१०/२००५ रोजी स्थानिक विश्वस्त समिती सभेत समक्ष उघडण्यात येऊन विहीत पात्रताधारक निविदासादरकर्त्यांच्या सिलबंद निविदा आजचे सभेत निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आल्या असता निविदाधाकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई | ७.२ %अधिक | ५.०४% अधिक |
| ०२. | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई | ३६ % अधिक | अनुपस्थित |
| ०३. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | १४.९५% अधिक | अनुपस्थित |
| ०४. | मे. वाघ बिल्डर्स, कोपरगांव | २५ % अधिक | ६ % अधिक |
| ०५. | मे. विशाल कन्स्ट्रक्शन नवी मुंबई | ५.३% कमी | ५.३% कमी |
| ०६. | मे. ए.व्ही. पंधे, सोलापूर | ७ % अधिक | अनुपस्थित |
| ०७. | मे.एन.बी. औताडे, पोहेगांव | ९.९ % अधिक | अनुपस्थित |

मे.विशाल कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई यांचे जबाबदार प्रतिनिधी समक्ष उपस्थित नव्हते. इतर निविदासादरकर्त्यांचे दरात व त्यांचे दरात फार मोठी तफावत असल्याने त्यांचेकडून विहीत मुदतीत व उत्तम दर्जाचे काम होणार नाही असे उपस्थित मा.सदस्यांनी व आर्किटेक्ट श्री चावरे यांनी मत प्रदर्शित केले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन, इतर उपस्थित ठेकेदारांसमवेत वाटाघाटी करुन मे. अस्मिता

कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांची निविदा रकमेच्या ५.०४% अधिक दराची निविदा मान्य करुन त्यांना कामाचा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०८. समाधी मंदीर परिसरात कॅन्टीनचे दक्षिण बाजूस देणगी काऊंटर, माहिती केंद्र व बुक स्टॉल करिता फर्निचर तयार करणेकामीचे कोटेशन्सबाबत.**

**निर्णय क्र. ६५७.** समाधी मंदिर परिसराचे कॅन्टीनचे दक्षिण बाजुस देणगी काउंटर, पुस्तक विक्री व माहिती केंद्राकरीता फर्निचर तयार करणेसाठी सुधारीत आराखडा व एस्टिमेट तयार करुन त्यानुसार निविदा मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२००५ निर्णय क्र.३४६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी याकामी सुधारीत प्लॅन व एस्टिमेट रु. १,४६,९८९/- मात्रचे सादर केलेले आहे. याकामी सुधारीत प्लॅन व एस्टिमेटनुसार खालील स्थानिक फर्निचर ठेकेदारांना कोटेशन फॉर्म घेणेबाबत कळविण्यात आले होते.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१. | श्री.मनिलाल शामलाल पटेल, शिर्डी |
| ०२. | श्री.आदेश नामदेव लाडवंशी, निघोज |
| ०३. | श्री.रमेश भाटीया, न.पा.वाचनालयाचे मागे, राहाता |
| ०४. | श्री.विजय मोरे, अशोक बॅंकेशेजारी, श्रीरामपूर |
| ०५. | महाराष्ट्र फर्निचर, साळुंके बिल्डिंग, श्रीरामपूर |
| ०६. | जयसिंग फर्निचर, न.पा.वाचनालयाचे मागे, राहाता |
| ०७. | मे.मनिषा फर्निचर, स्टेशन रोड, पुणतांबा |
| ०८. | उत्तम फर्निचर वर्क्स, काळाराम मंदिर, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर |
| ०९. | राज प्लॅनर्स, पिपल्स बॅंकेसमोर,बॅंक रोड, कोपरगांव |
| १०. | भास्कर पगारे, व्दारा- गौतम प्लायवूडस, कोपरगांव |

वरील १० ठेकेदारांपैकी खालील ०४ ठेकेदारानी विहीत मुदतीत कोटेशन फॉर्म विकत घेतले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | आदेश नामदेव लाडवंशी, निघोज |
| ०२ | पटेल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, शिर्डी |
| ०३ | पी.एच. जागंड, येवला |
| ०४. | उत्तम फर्निचर श्रीरामपूर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे दोन निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदेत देऊ केलेले दर (रुपये) |
|---|---|---|
| ०१ | आदेश नामदेव लाडवंशी, निघोज | १,७५,७४८.०० |
| ०२ | पी.एच. जागंड, येवला | १,८९,१८९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, आदेश नामदेव लाडवंशी, निघोज यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत यावी असे ठरले. सदर निविदेची रक्कम एस्टीमेटेड कॉस्ट रुपये १,४६,९८९.०० पेक्षा जास्त आहे. वरील जादा रक्कम रुपये २८,७४९.०० मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करणेकामीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६५८.** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करणेकामीचे निविदांबाबत निर्णय क्र. ६५८ दि.११/०७/२००५ रोजीचे पत्रान्वये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नऊ रस्त्यांची कामे शिरडी शहराच्या तसेच साईभक्तांचे सोयी-सुविधाच्या दृष्टीने विकसीत करणेकामी अंदाजीत किंमत रु. ४२२.३६ लक्ष इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करुन कामे करुन द्यावीत अशी विनंती केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४२ अन्वये सदर विकास कामे करणेस तत्वतः मान्यता मिळाली आहे.

शिर्डी नगरपंचायतीने डांबरीकरण करुन मागितलेल्या रस्त्यांची रुंदी प्रत्यक्षात उपलब्ध नसल्यामुळे सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे कामाबाबत दि. ०१/०९/२००५ रोजी मा. अध्यक्ष महोदय, यांचे समवेत चर्चा झाली. सदर बैठकीस मा.कार्यकारी अधिकारी, व नगर पंचायतीचे अध्यक्ष श्री. कैलास (बापू) कोते तसेच श्री गोसावी, मुख्याधिकारी हेही उपस्थित होते. त्यावेळी रस्ते रुंदीकरणाकरीता बऱ्याचशा अडीअडचणी असल्यामुळे जास्तीत जास्त उपलब्ध रुंदीप्रमाणे रस्त्यांचे डांबरीकरण करुन घेण्यात यावे असे ठरले. त्यानुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी डांबरीकरणाचे खालील सुधारीत एस्टीमेट सादर केले आहे.

अ)

| अ.नं. | रस्त्याचे नाव व तपशील | रुंदी मिटर | अंदाजीत खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी - निमगांव - शीव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (न.म.रोड ते पुर्वेस ०.८ कि.मी.) | ५.५० | १४,१३,९३९.०० |
| ०२ | नांदुर्खी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे (२०० रुम ते नांदुर्खी शीव रस्ता) लांबी १.७ कि.मी. | १२.०० | ८९,९३,६३३.०० |
| ०३ | कनकुरी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे. (न.म.रस्ता ते नाला रस्ता पर्यंत) लांबी १.०० कि.मी. | १०.५० | २६,७३,७३७.०० |
| ०४ | नाला रस्ता डांबरीकरण करणे (लुटे वस्ती ते साईबंधारा पर्यंत) लांबी २ कि.मी. | ६.०० | ३१,६५,३८२.०० |
| ०५ | बिरेगांव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. (शिर्डी ते चौफुली ते बिरोबा मंदीर) लाबी ३.३० कि.मी. | ६.०० | ७१,७०,६६३.०० |
| ०६ | १२ क्रमांक चारी पुढील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे लांबी ०.९० कि.मी.<br>४०० मीटर पर्यत<br>५०० मीटर | <br><br>५.००<br>२.७५ | १७,१९,१४४.०० |

आर्किटेक्ट मे. निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी प्रस्तावीत रस्त्यांचा सविस्तर अभ्यास करुन एस्टिमेटची तपासणी केली आहे. डांबरीकरण कामाची अंदाजित एकूण रक्कम रु. २,५१,३६,४९८.०० इतकी आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. को-या निविदा फॉर्म विक्रीची मूदत दि.०६/१०/२००५ ते २०/१०/२००५ अखेर व सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.०३/११/२००५ अखेर ठेवण्यात आलेली आहे.

विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी को-या निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव |
| ०२. | मे.एम.एस.पंजाबी, पुणे |
| ०३. | मे.एस.एस.कन्स्ट्रक्शन, अ.नगर |
| ०४. | मे.एन.के.गाडे, संगमनेर |
| ०५. | मे.अे.जी.वाबळे, अ.नगर |
| ०६. | मे.एस.एम.औताडे, मंगळवेढा, सोलापूर |
| ०७. | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता |
| ०८. | मे.ओंकार कन्स्ट्रक्शन, नांदेड |
| ०९. | मे.बनकर पाटील ॲण्ड इंजि.,अंगणगांव, येवला. |
| १०. | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी., अ.नगर |
| ११. | मे.जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कं.,कोल्हार (खु) |

ठेकेदार यांचे विनंतीवरुन निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याने सदरहू विषय पुढील सभेत घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१०. स.नं.१२४ मध्ये मध्यवर्ती भांडाराकरीता अंतर्गत डांबरीकरण रस्ता व सी.डी. वर्क बांधकामासाठीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६५९.** संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ अ मध्ये संस्थानचे नवीन मध्यवर्ती भांडार इमारतीचे काम पूर्ण होत आले आहे. याठिकाणी संस्थानच्या मालकीची १ हे. ०९ आर इतकी जागा आहे. सदर जागेलगत चारी नं. १२ लगतचा रस्ता आहे. हा रस्ता अलीकडेच संस्थानतर्फे डांबरीकरण करण्यात आला आहे. या रस्त्यापासून भांडार इमारतीपर्यंत जाण्यासाठी चारीवर सी.डी.वर्क व अंतर्गत पक्का रस्ता करण्याची आवश्यकता आहे.

याकामी येणा-या अंदाजीत रु. ७,२०,०००.०० चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ०९/०७/२००५ चे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. याकामाचे तपशिलवार अंदाजपत्रक आर्किटेक्ट मे. निकम पाटील असो. श्रीरामपूर यांनी तयार केले असून त्यानुसार रु. ७,६५,७७९.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी गांवकरी व सार्वमत या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

दिनांक १८/०९/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सदर निविदा उघडण्यात आल्या असता सदर निविदांपैकी फक्त एकच निविदासादरकर्ते पात्र असल्याने आलेल्या सर्व निविदा रद्द करुन वर्तमानपत्रात जाहिरात देवून फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. त्याप्रमाणे फेरनिविदा मागविल्या असता खालील ठेकेदारांनी को-या निविदा विकत घेतल्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स , कोपरगांव |
| ०२. | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता |
| ०३. | मे. जगताप कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड इंजिनिअरींग कंपनी, कोल्हार खु॥ |

सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. २५/१०/२००५ अखेर होती.
विहित मुदतीत खालील निविदासादरकर्त्यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता |
| ०२ | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर, कोपरगांव | ०.७७ %कमी | २ % कमी |
| ०२. | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता | १.८९ % कमी | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाटाघाटीनुसार मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.११. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिवपर्यन्त) कॉंक्रीटीकरण करणेकामीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६६०.** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नऊ रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या विकासाच्या दृष्टीने संस्थान मार्फत हाती घेणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी विनंती केली होती. सदरच्या प्रस्तावास व याकामी रु. ४.२२ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ चे सभेत नि.क्र. १०८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर नऊ रस्त्यापैकी ७०० मी. लांबीचा व ६.०० मी. रुंदीचा रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता ) कॉक्रीटीकरण करुन मिळणेबाबत रु. ४६,१३,५४०.०० खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०९/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५७२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

याकामी निविदा मागविणेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन को-या निविदा फॉर्मची विक्रीची मूदत दि. ०६/१०/२००५ ते दि. २०/१०/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०३/११/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती.

खालील ठेकेदारांनी मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स, कोपरगांव |
| ०२. | मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०३. | एस.एस. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०४. | ए.जी. वाबळे, अहमदनगर |
| ०५. | श्री.एस.एम. औताडे, सोलापूर |
| ०६. | मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर |
| ०७. | मे.गुगळे कन्स्ट्रक्शन अहमदनगर |

वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या विहित मुदतीतील निविदांमधील लिफाफा क्र.०१ व ०२ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून निर्णय होणे संबंधी प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

सदरचे रस्त्यांची जागा ही संस्थानचे मालकीची नसल्याने या रस्त्यांचे विकसनावर खर्च करण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ चे कलम २१ (२) अन्वये महाराष्ट्र शासनाचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

ठेकेदार यांचे विनंतीवरुन निविदा सादर करण्याची मुदतवाढ देण्यात आली असल्याने सदरहू विषय पुढील सभेत घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१२. साईभक्तांचे स्वागतासाठी विविध ठिकाणी स्वागत कमानी उभारणीसाठीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६६१.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी सर्व देशभरातून तसेच विदेशातून मोठ्या प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे येतात. शिर्डी येथे पोहचण्यासाठी मुख्यतः नाशिक-शिर्डी, नगर-शिर्डी, मनमाड-शिर्डी, औरंगाबाद-शिर्डी, नेवासा-शिर्डी हे प्रमुख मार्ग आहेत. या मार्गावरुन येतांना साईभक्तांना रस्त्याचा बोध व्हावा तसेच आपण शिर्डी गावाचे जवळ आलो आहोत याची जाणीव व्हावी. याकरीता सदर मार्गांवर साईभक्तांचे स्वागतासाठी विविध ठिकाणी आकर्षक व सुशोभित कमानी उभारणे प्रस्तावीत आहे. याकामी आर्किटेक्ट मे. निकम पाटील असो. श्रीरामपूर यांनी स्वागत कमानीचे डिझाईन सादर केले होते. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०८/२००५ चे सभेत नि.क्र. ४०५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील ठिकाणी स्वागत कमानी उभारणेबाबत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

| अ.न. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | सिन्नर येथे नाशिक पुणे रस्त्यावरुन शिर्डीकडे वळणा-या रस्त्यावर | १०,४६,३८५.०० |
| ०२. | नगर- मनमाड रस्त्यावर राहुरी येथे | १८,५९,७६८.०० |
| ०३. | नगर- मनमाड रस्त्यावर बाभळेश्वर येथे - | १८,५९,७६८.०० |
| ०४. | औरंगाबाद- शिर्डी रस्त्यावर नेवासा फाटा येथे - | १०,४६,३८५.०० |
| ०५. | नगर-मनमाड रस्त्यावर शिर्डी गावाचे दक्षिण बाजूस- | १८,५९,७६८.०० |
| ०६. | नगर- मनमाड रस्त्यावर शिर्डी गावाचे उत्तर बाजूस- | १८,५९,७६८.०० |
| ०७. | कोपरगावं - सगंमनेर रस्त्यावर जवळके येथे - | १०,४६,३८५.०० |
| ०८. | नगर-मनमाड रस्त्यावर येसगांव येथे - | १८,५९,७६८.०० |
| ०९. | कोपरगांव संगमनेर रस्त्यावर पोहेगांव येथे - | १०,४६,३८५.०० |
| १०. | नगर- मनमाड रस्त्यावर कोपरगांव येथे - | १८,५९,७६८.०० |
| | **एकूण रुपये -** | **१,५३,४४,१४८.००** |

उपरोक्त प्रमाणे स्वागत कमानी उभारणेकामी निविदा मागविणेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदा फॉर्मची विक्रीची मूदतदि. ०६/१०/२००५ ते २०/१०/२००५ व सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०३/११/२००५ अखेर ठेवण्यात आली आहे. विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर |
| ०२. | मे.नितिन बी. औताडे, पोहेगांव |
| ०३. | मे.एम.आर.मुथा, अ.नगर |

विहित मुदतीत प्राप्त झालेल्या खालील दोन निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदा सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतर देऊ केलेल दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे.गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर | ८.८% अधिक | ७% अधिक |
| ०२. | मे.एम.आर.मुथा, अ.नगर | २९% अधिक | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाटाघाटीनुसार मे. गुगळे कन्स्ट्रक्शन, अ.नगर यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत यावी असे ठरले. तसेच उपरोक्तप्रमाणे नमूद केलेल्या दहा स्वागत कमानींची संख्या जास्त आहे.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी अ.नं.१,३,४,५,६ व १० या स्वागत कमानींचे बांधकाम करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१३. शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमिनीलगतचे रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणेकामीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६६२.** मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमिनींसाठी रस्ते विकसीत करणेबाबतच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १०८ अन्वये मान्यता देण्यात आली.

आर्किटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी रु.१,०४,०२,८९७/- मात्र अपेक्षित खर्चाचे सादर केलेल्या एस्टिमेटनुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. को-या निविदा विक्री दि. ०६/१०/२००५ ते दि. २०/१०/२००५ या कालावधीत ठेवण्यात आली होती तर सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०३/११/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती. खालील निविदाधारकांनी दिलेल्या मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स , कोपरगांव |
| ०२. | मे.एम.एस. पंजाबी, पुणे |
| ०३. | एस.एस. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०४. | मे. एन.के. गाडे, संगमनेर |
| ०५. | ए.जी. वाबळे, अहमदनगर |
| ०६. | श्री. एस.एम. औताडे, मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ०७. | मे. बी.डी. शिंदे, राहाता |
| ०८. | ओंकार कन्स्ट्रक्शन, नांदेड |
| ०९. | मे. बनकर पाटील ॲण्ड इंजि. अंगणगांव, ता. येवला. |
| १०. | मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर |
| ११. | जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कं.,कोल्हार खु! |

ठेकेदार यांचे विनंतीवरुन निविदा सादर करणेकामी मुदतवाढ देण्यात आली असल्याने सदरहू विषय पुढील सभेत घेण्यात यावा, तसेच याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी, असेही ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१४. नगरपंचायत/दुकान केंद्र समोर सुशोभित कारंजा उभारणेकामीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ६६३.** शिर्डी गावात नगर- मनमाड रस्त्यालगत पश्चिम बाजूस शिर्डी नगरपंचायत यांचे दुकान केंद्र आहे. हा भाग मध्यवर्ती असून दर्शनीय आहे. हा भाग सुशोभीत व्हावा या करीता कारंजा व सभोवती छोटा बगीचा अशा स्वरुपात काम करणेकामी रु.६ लक्ष खर्चाचे एस्टिमेट मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०८/२००५ चे सभेत सादर करण्यात आले होते. यावर चर्चा होउन निर्णय क्र. ४०६ अन्वये निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली होती. आर्किटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी याकामाचे कारंजा व सिव्हील वर्कसह सविस्तर प्लॅन व एस्टिमेट रु. ४,३३,५०९.०० चे सादर केलेले आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर कामांची कोरी निविदा विक्री दि.२२/०९/२००५ ते ३०/०९/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.०८/१०/२००५ अखेर होती.

खालील ठेकेदारांनी मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | अल्फा फाउंटन ॲण्ड इन्स्ट्रुमेन्टस, पुणे |
| ०२. | बी.व्ही.जी. इंडीया लि., पुणे |
| ०३. | स्वामी इलेक्ट्रीकल ॲण्ड इरीगेशनस, पुणे |
| ०४. | श्री. राख शांताराम किसन, नाशिक |
| ०५. | ३ डी वॉटर फन्टासी, पुणे |
| ०६. | सचिन फॅब्रिकेशन, पुणे |

वरील पैकी खालील दोन ठेकेदारांनी विहीत मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | अल्फा फाउंटन ॲण्ड इन्स्ट्रुमेन्टस, पुणे |
| ०२. | श्री. राख शांताराम किसन, नाशिक |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांमधील तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.०१ दि. २८/१०/२००५ रोजी व्यवस्थापन समितीचे स्थानिक विश्वस्त समितीत उघडण्यात आला. पैकी विविध पात्रता धारक निविदासादरकर्ते मे.अल्फा फाउंटन ॲण्ड इन्स्ट्रुमेन्टस, पुणे यांची निविदेतील लिफाफा क्र.०२ आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन त्यांना या प्रकारच्या कामांचा अनुभव असल्याने त्यांनी देऊ केलेली १०.०५% कमी दराची निविदा मान्य करण्यात यावी, आणि तसेच याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१५. शिर्डी येथील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे बसस्थानक विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६६४.** विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर यांनी कळविले आहे की, शिर्डी येथे श्री साईबाबा यांचे समाधीच्या दर्शनार्थ सर्व भारताच्या कानाकोप-यातून व जगभरातून 'साईभक्त' येतात. भक्तांसाठी आपल्या देवस्थानाने अतिशय अत्याधुनिक सुखसोयी उपलब्ध केलेल्या आहेत. त्यामुळे देवस्थानचा लौकिक सर्व दूर आहे. या लौकिकात भर पडण्याच्या हेतूने भक्तांच्या सोईसाठी व येणा-या भक्तांचा ओघ विचारात घेता शिर्डी येथे परिपूर्ण असे अत्याधुनिक बस स्थानक होणे अत्यंत गरजेचे आहे.

रा.प. महामंडळ सध्या आर्थिक अडचणीतून जात असल्याने महामंडळाची इच्छा असूनही नजीकच्या भविष्यात अशा प्रकारचे सर्व सोयी युक्त व परिपूर्ण अत्याधुनिक असे बस स्थानक उभारु शकत नाही. रा.प.महामंडळाचे भूमापन गट क्र. १७१ मध्ये ०.९८.६५ हेक्टर इतक्या क्षेत्रफळाचे जमिनीत बसस्थानकाचे फेर बदलाचा आराखडा तयार केला आहे. अंदाजपत्रकानुसार या कामासाठी ८५ लाख मात्र खर्च अपेक्षित आहे.

परंतू, महामंडळाची आर्थिक स्थिती व्यवस्थीत नाही. करीता याकामी एकूण खर्चापैकी काही वाटा राज्यसरकारने व काही वाटा श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) यांनी उचलावा असे विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर यांनी आपले पत्र क्र.३६४, दिनांक २९.७.२००५ अन्वये कळविले होते.

त्यानंतर उपाध्यक्ष-कार्यकारी संचालक, राज्य परिवहन महामंडळ, यांनी सध्याच्या कार्यरत बसस्थानकाच्या जागेत खालील सोयी सुविधांनी युक्त बसस्थानक संस्थान खर्चाने उभारुन द्यावे अशी विनंती केली आहे.

०१. प्रशस्त अशी प्रवेश मार्गिका.
०२. भव्य प्रतिक्षालय.
०३. भव्य आरक्षण कक्ष.
०४. पार्सल रुम.
०५. भव्य नियंत्रण कक्ष.
०६. अद्ययावत असे चालक / वाहक विश्रांतीगृह.
०७. बस स्थानकाच्या तळास मार्बल/ ग्रेनाईट फ्लोरींग.

०८. संपूर्ण वाहन तळास कॉंक्रीटीकरण.
०९. अत्याधुनिक व आकर्षक अशी कुंपण भिंत.
१०. संपूर्ण परिसराचे अत्याधुनिक पध्दतीने विद्युतीकरण व सुशोभिकरण.
११. येणा-या भक्त प्रवासीजनांचे सोईसाठी भव्य असे स्त्री व पुरुषांकरीता प्रसाधनगृह.
१२. भव्य अतिथ्यालय इत्यादी बाबींनी परिपूर्ण व अत्याधुनिक स्वरुपाचे १२ फलाट असलेले बस स्थानक.

श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील काना कोप-यातून नव्हे तर देशातून/ परदेशातूनही साईभक्त राज्य परिवहन मंडळाच्या बसेस मधून शिर्डी येथे येतात. सध्या शिर्डी येथील बसस्थानकाची परिस्थिती फारच वाईट आहे. प्रसाधन गृह, वेटींग हॉल इत्यादी सोयी-सुविधा व स्वच्छतेचा अभाव तसेच वाहनतळासाठी अपूर्ण जागा यामुळे येणा-या साईभक्तांची/प्रवाशांची फारच गैरसोय होते. करीता सर्व सोयी -सुविधा युक्त असे आधुनिक बसस्थानक शिर्डी येथे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत दि.०१/१०/२००५ रोजी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था सल्लागार परिषदेच्या बैठकीतही चर्चा झाली. संस्थान मार्फत याकामी निधी उपलब्ध करुन देणेसाठी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता आवश्यक आहे.

तरी शिर्डी बसस्थानक सर्व सोयी सुविधायुक्त विकसित करणेसाठी संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बस स्थानक परिसर व तळमजल्याचे बांधकाम संस्थानमार्फत करुन देण्यात यावे व त्यावरील मजले संस्थानचे वापराकरीता ३० वर्षे कराराने घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१६. श्री.संपत अमृतलाल गायकवाड, बाभळेश्वर, श्री.विश्वनाथ गोरक्षनाथ सालपूरे, पिंपळवाडी, श्री.शामराव तुळशीराम तोरडमल, बहिरोबावाडी, श्री. दत्तु काशिनाथ पाळंदे, शेवगे दारणा, श्री.कोटाणे गंगाधर बसण्णा, होटगी , श्री.शरद भिकाजी नवले,राजापूर, श्री.जोशी भालचंद्र विश्वनाथ, नाशिक, श्री.किर्जाट संभाजी भानुदास, शेवटा, श्री.भारती रघुनाथ गोविंद, नाशिक यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबतचे अर्ज.**

**निर्णय क्र. ६६५.** सदरहू विषय स्थगित करणेत आला. फक्त संस्थान वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावे. नियमावलीत न बसणारे अर्ज व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय)

**विषय नं.१७. प्रयोगशाळेसाठी उपकरणे खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६६६.** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात दैनंदिन तपासण्यासाठी रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे सध्या असलेली उपकरणे कमी पडत असल्याने पॅथोलॉजीस्ट, डॉ. सौ. इरा भारद्वाज यांनी त्यांचे दि. ३०/०९/२००५ चे पत्रान्वये सोबतच्या यादीतील अतिरीक्त उपकरणांची तसेच काही नवीन अद्ययावत मशिनरीची ज्या आपल्याकडे उपलब्ध नाहीत त्यांची मागणी केलेली आहे. प्रयोगशाळा हा विभाग दोन्ही रुग्णालये मिळून एकच विभाग राहणार असल्याने रुग्णांची वाढती संख्या कामाचा व्याप विचारात घेता सदर मशिनरी खरेदी करणे गरजेचे आहे.

| Sr.No. | Name of Equipments/Instruments | Qty. | App.Price Rate per | Total Cost |
|---|---|---|---|---|
| 1. | Incubator (Medium) | 1 | 5000.00 | 5000.00 |
| 2. | Incubator (Large | 1 | 5000.00 | 5000.00 |
| 3. | Oven (Medium) | 1 | 5000.00 | 5000.00 |
| 4. | VDRL Shaker | 2 | 5000.00 | 10000.00 |
| 5. | Centrifuge (Rmi) 4x4 | 2 | 10000.00 | 20000.00 |
| 6. | Centrifuge (Rmi) 14 | 2 | 5000.00 | 10000.00 |
| 7. | Sterllizer (Boller) | 2 | 5000.00 | 10000.00 |
| 8. | Pipetters (Automatic) (Fin Pipette) | | | |
| A) | Variable Vol- Rs. 5000/- Each | | | |
| | 5- 50 ul | 2 | 5000.00 | 10000.00 |
| | 40- 200 ul | 2 | 5000.00 | 10000.00 |
| | 200 – 1000 ul | 2 | 5000.00 | 10000.00 |
| B) | Fixed Vol – Rs. 2500/- Each | | | |
| | 100 ul | 2 | 2500.00 | 5000.00 |
| | 1000 ul | 2 | 2500.00 | 5000.00 |
| | 500 ul | 2 | 2500.00 | 5000.00 |
| | 20 ul | 2 | 2500.00 | 5000.00 |
| C) | Stepper Pipette 10-5000 ul with adaptor with tips 50-250 ul and 500- 2500 ul | 1 | 15000.00 | 15000.00 |
| 9. | Automatic Tissue Processor 1 L- 1.5 L Vol | 1 | 50000.00 | 50000.00 |
| 10. | Cyto Centrfuge | 1 | 200000.00 | 200000.00 |
| 11. | ELISA Washer | 1 | 100000.00 | 100000.00 |
| 12 | Coagulometer | 1 | 100000.00 | 100000.00 |
| 13. | Automatic Urine Strip Reader | 1 | 100000.00 | 100000.00 |
| 14. | Mini Vidas | 1 | 700000.00 | 700000.00 |
| 15. | Hb Variant Analaysis System (HPLC) Bio Rad | 1 | 2000000.00 | 2000000.00 |

सदरची उपकरणे खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३३,८०,०००/- पर्यत खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१८. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचारी वर्गांना ठराविक मानधन देणेबाबत.**

**निर्णय क्र. ६६७.** मा.व्यवस्थापन समितीचे **दि.१३/३/२००५** व **दि.१०/९/२००५** रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.**९३** व **५८०** नुसार रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञ यांची निवड करण्यात आलेली आहे. वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचे शिफारशीनुसार, निवड केलेल्या उमेदवारांमधील **२८** वैद्यकीय अधिकारी व १ तंत्रज्ञ यांना नेमणुका देण्यात आलेल्या आहेत. रुग्णालयाचे सेवक आकृतीबंधास अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे नेमणूकपत्र दिलेल्या उमेदवारांना वेतनश्रेणीवर नेमणूका न देता त्यांना केवळ संस्थानकडे हजर होण्यासाठी नेमणूक पत्रे देण्यात आलेली आहेत. नेमणूक पत्रांनुसार आतापर्यंत खालीलप्रमाणे कर्मचारी हजर झालेले आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी/<br>कर्मचाऱ्याचे नांव व हुदद्दा | शैक्षणिक/<br>व्यवसायिक पात्रता | कामावर हजर तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.प्रकाश चिं.मारपकवार,<br>वै.अधिकारी,(कार्डियाक) | एम.एस.एम.सी.एच | १७/१०/२००५ |
| ०२. | डॉ.अर्जुन जी वैगास<br>वै.अधिकारी (आर्थो) | एम.एस.(अर्थो) | १३/१०/२००५ |
| ०३ | डॉ.प्रताप पी गिरगुणे<br>वै.अधिकारी (आर्थो) | एम.एस.(अर्थो) | १३/१०/२००५ |
| ०४ | डॉ.कुलदिप आर.वाघ<br>वै.अधिकारी (स्त्री रोग व प्रसुतीतज्ञ) | एम.एस.(स्त्री रोग व प्रसुती) | ०६/१०/२००५ |
| ०५ | डॉ.शामकांत व्ही.शिंदे<br>वै.अधिकारी (बालरोग) | एम.डी.(बालरोग) | १७/१०/२००५ |
| ०६. | डॉ.दादासाो.एल.कांबळे<br>वै.अधिकारी ( त्वचारोग) | एम.डी.(स्कीन ॲन्ड व्ही.डी) | १४/१०/२००५ |
| ०७. | डॉ.सचिन दि.खोचीकर<br>वै.अधिकारी (भुलतज्ञ) | एम.बी.बी.एस.<br>(डी.ए) | ०६/१०/२००५ |
| ०८. | डॉ.स्नेहल दि.पाटील<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस.<br>(डी.ओ.आर.एल.) | ०४/१०/२००५ |
| ०९. | डॉ.सूर्यकांत आर.पाटील<br>वै.अधिकरी (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस. | ०७/१०/२००५ |
| १०. | डॉ.वैषाली ल.क्षीरसागर<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ) | एम.बी.बी.एस. डी.जी.ओ. | ०८/१०/२००५ |
| ११. | डॉ.दिनेश श्री.खोडसकर<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ) | एम.बी.बी.एस.<br>टि.डी.डी. | ०८/१०/२००५ |
| १२. | डॉ.उषा व्ही.कोळपे<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस. डी.जी.ओ. | १०/१०/२००५ |
| १३. | डॉ.सुभाष एस.शामकुंवर,<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस. | १७/१०/२००५ |
| १४. | डॉ.अजयकुमार बी.धोंगडे<br>वै.अधिकारी (आर.एम.ओ.) | एम.बी.बी.एस. डी.आर्थो | २२/१०/२००५<br>नंतर हजर होणार |
| १५. | डॉ.प्रतिभा डी.तिवडे<br>वै.अधिकारी (सर्जन) | एम.एस.(जन.सर्जरी) | ०६/११/२००५<br>(हजर होणार) |
| १६. | श्री अनिल आ.पवार<br>सी.टी स्कॅन टेक्निशियन | एच.एस्स.सी.<br>एम.आर.डी. | २४/०९/२००५ |

रुग्णालय आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळेपर्यंत सदरचे कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देता येणार नाही. संबंधीतांना मासिक मानधन देणे आवश्यक राहील. वेतनश्रेणीनुसार संबंधीतांना देय होणारे एकूण मासिक वेतन विचारात घेवून संबंधीतांना शासनाची मान्यता होईपावेतो खालीलप्रमाणे मासिक मानधन देण्यात यावे व आकृतीबंधास शासनाची मान्यता झालेनंतर संबंधीतांच्या नियुक्ती तारखेपासून त्यांना वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन देण्यात येवून त्यांच्या नेमणूका नियमीत करण्यात याव्यात. आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळेपर्यंत त्यांना खालीलप्रमाणे मानधन तत्वावर नेमणूका देणेबाबत वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी शिफारस केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

सदरचे मानधन खालील प्रमाणे असावे

१) वैद्यकीय शास्त्रातील स्नातकोत्तर पदवीधारकास पदवी नंतरच्या ५ वर्षाचा अनुभव असल्यास रु. २५,०००/-प्रतिमहा.

२) वैद्यकीय शास्त्रातील स्नातकोत्तर पदवीधारकास ५ वर्षाचा अनुभव नसणा-या उमेदवारास रु. २१,०००/-प्रतिमहा.

३) वैद्यकीय शास्त्रातील स्नातक (MBBS) उमेदवारास रु.१७,०००/- व त्यापुढील पदवीकाधारक जास्त अर्हतेच्या उमेदवारास रु. १८,०००/- प्रतिमहा

४) मेट्रन या पदासाठी रु.१०,०००/-प्रतिमहा

५) असि. मेट्रन या पदासाठी रु.९,०००/-प्रतिमहा

६) स्टाफ नर्स या पदासाठी रु.८०००/- प्रतिमहा

७) मायक्रोबायॉलॉजिस्ट / बायोकेमिस्ट या पदासाठी रु.१०,०००/-प्रतिमहा

८) आहारतज्ञ / क्ष-किरण तंत्रज्ञ / इ.सी.जी.तंत्रज्ञ/ प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी रु.८,०००/-प्रतिमहा

९) सीटी स्कॅन/कॅथलॅब/फिजिओथेरॉपिस्ट या पदाकरीता रु.८५००/-प्रतिमहा फार्मासिस्ट या पदाकरीता रु. ७,०००/-प्रतिमहा

१०) वाहनचालक/दूरध्वनीचालक/शिंपी/वीजतंत्री /नळ कारागीर या पदासाठी रु.५०००/-प्रतिमहा

११) स्वच्छता निरीक्षक/भांडार/वस्त्रपाल या पदासाठी रु.६,०००/- प्रतिमहा

१२) अभि लेखापाल या पदासाठी रु. ६,५००/-प्रतिमहा

१३) कार्यालय अधिक्षक या पदासाठी रु.८५००/-प्रतिमहा

१४) लघु टंकलेखक/वरिष्ठ लिपीक या पदासाठी रु.६५००/- प्रतिमहा

१५) कनिष्ठ लिपीक/ टंकलेखक रु. ५,०००/-प्रतिमहा

१६) रुग्णालय प्रचारक जनसंपर्क अधिकारी रु. १२,०००/-प्रतिमहा

१७) मुकादम/बाहयरुग्णसेवक/प्रयोगशाळा परिचर/पहारेकरी/माळी/ओ.टी.असिस्टंन्ट/ ड्रेसर/ सफाई कर्मचारी/ शिपाई रु.४०००/-प्रतिमहा

मानद वैद्यकीय अधिकाऱ्यांना :-

- रुग्णाला पहाण्यासाठी मुद्दाम द्याव्या लागणा-या भेटी (व्हिजीटसाठी ) हा दर १० किलोमीटर पर्यंत रु १५०/- प्रति व्हिजीट असावा.
- १० ते ३० किलोमीटर अंतरापर्यंत रु.२५० प्रति व्हिजीट असावा.
- या पुढील अंतरासाठी प्रत्यक्ष प्रवासाला लागलेला खर्च अधिक रु.१००/- असा असावा.
- तपासणी शुल्क ७० % व ऑपरेशन शुल्क ४० % रक्कम जॉब वर्क म्हणून देण्यात यावी.
- यात काही धर्मार्थ सवलत दिलेली असल्यास ती संपूर्ण जबाबदारी संस्थानकडे असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे खालील मुद्यांनुसार कार्यवाहीस मान्यता मिळावी.

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नियुक्त केलेल्या व यापुढे नेमणूक होणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून कर्मचारी आकृतीबंधास मान्यता होईपर्यंत मासिक मानधन तत्वावर नेमणूका करुन मानधन देण्यास तसेच,

(ब) कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधीतांच्या हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणारी फरकाची रक्कम आदा करण्यास तसेच,

(क) मानद वैद्यकीय अधिकारी यांचे व्हिजीट चार्ज तपासणी व ऑपरेशन शुल्काचे बाबतीत कार्यवाही करणेस मान्यता असावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.१७ येथे दर्शविलेले सफाई कामगार व शिपाई यांचे मानधन रुपये ४०००/-ऐवजी रुपये ३०००/- करण्यात येऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.१९. श्रीसाईबाबा हॉस्पिटल परिसरात कँटीन व औषधे दुकान सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६६८.** लवकरच नवीन श्रीसाईबाबा रुग्णालय सुरु होणार आहे. या परिसरात कर्मचारी व रुग्णांना सोयीस्कर व्हावे या दृष्टीने कॅन्टीन व औषधी दुकानासाठी इमारतीचे नियोजन करण्यात आले आहे. तरी या प्रकल्पांना तात्विक मंजूरी मिळवून कार्यान्वित करण्यासाठीचे नियोजन आवश्यक आहे.

**अ) कॅन्टीन** - या परिसरात एकावेळी अंदाजे २०० कर्मचारी वर्ग व अंदाजे ५०० रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना सोयीचे व्हावे यासाठी कॅन्टीन चालविणे आवश्यक आहे. हे कॅन्टीन निविदेव्दारे कंत्राटदाराला सवलतीच्या दरात देऊन त्याचे दरही संस्थान दराप्रमाणे ठेवण्यात यावेत अशी योजना असावी. या इमारतीच्या वरच्या मजल्यावर किमान ३०-३२ रेसिडेंट डॉक्टर्स प्रामुख्याने बॅचलर्स राहणे

अपेक्षित आहे. त्यांना सवलतीच्या दरात चांगल्या दर्जाचे जेवण व नाश्ता मिळावा असे अपेक्षित आहे. तरी या प्रकल्पाला तात्विक मंजुरी देऊन पुढील नियोजनाची व्यवस्था योग्य त्या खात्याकडून व्हावी ही विनंती.

**ब) औषधी दुकान-** श्री साईबाबा रुग्णालयात फक्त अत्यावश्यक अशा इंजेक्शनची व्यवस्था राहणार असल्यामुळे रुग्णांना औषधी विकत घ्यावी लागणार आहेत. हे दुकान संस्थानने खात्यामार्फत चालविणे जिकिरीचे होणार असून त्यातून उधारी व न होणारी वसुली याचे प्रमाण वाढेल व रुग्णांच्या औषधी मोफत मिळण्याच्या अपेक्षाही वाढतील यासाठी हे दुकान भाडे तत्वावर इतर यंत्रणेस चालविण्यास देणे संस्थानच्या दृष्टीने हिताचे राहील. हे दुकान २४ तास उघडे ठेवणे अपेक्षित आहे व यातून रुग्णाने औषधांची खरेदी परस्पर करणे अपेक्षित आहे. तरी या संबंधीच्या निविदा मागवून हे दुकान जास्तीत जास्त भाडे देऊ शकणा-या एजन्सीला देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात कॅंटीन व औषधी दुकान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन एजन्सीमार्फत एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२०. तातडीची औषधे खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ६६९.** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा, ऑपरेशन थिएटर विभाग व बाह्यरुग्ण विभाग, इत्यादी विभागांकरीता सर्जीकल मटेरियल, गोळ्या इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल शिरडी, कोपरगांव, नाशिक येथून खरेदी केलेले आहेत. सदर औषधे, केमीकल्स, सर्जीकल मटेरियल इत्यादींची २००५-०६ या वार्षिक खरेदीमध्ये मागणी केलेली असून पुरवठा आदेश देखील दि.०१.०८.२००५ रोजी देण्यात आलेला आहे. तथापि, नुकत्याच झालेल्या मुंबईतील अतिवृष्टीमुळे त्यांचेकडून माल वेळेवर उपलब्ध न झाल्याने तो तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.१४०५०.८० मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही वैद्यकीय अधिक्षिका यांना असलेल्या दरमहा रु.१००००/- चे तरतूदी व्यतिरीक्त केलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | दुकानदाराचे नांव | बील क्रमांक / दिनांक | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.विजय मेडीकल स्टोअर्स , शिर्डी | १६१५७- २४/०८/२००५ | २९२० | ०० |
| ०२. | मे.विजय मेडीकल स्टोअर्स , शिर्डी | १६१५६- २४/०८/२००५ | ६४०० | ०० |
| ०३. | मे.विजय मेडीकल स्टोअर्स , शिर्डी | १६१६३- २५/०८/२००५ | १४४० | ०० |
| ०४. | मे.जे.एस.पी.सर्जीकल,नाशिक | १६६४- १८/०८/२००५ | २५०० | ०० |
| ०५. | मे.जवाहर एजन्सीज,कोपरगांव | २०५४- ३१/०८/२००५ | ७९० | ८० |
| | | एकूण रक्कम रु. | १४०५० | ८० |

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२१. पाणी पुरवठा साहित्य खरेदीकामी आलेल्या कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र. ६७०.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०८.२००५ मधील निर्णय क्र.४१८ नुसार संस्थानचे नियोजीत प्रसादालय इमारतीचे बांधकामासाठी आवश्यक असणा-या पाणी पाईप लाईनसाठी जी.आय.पाईप व इतर साहित्य खरेदीसाठी येणारे रु.१,५४,२७१/-चे खर्चास तसेच निर्णय क्र.४२० नुसार कनकुरी येथील साठवण तलावासाठी कंपाउंड करणेकामी रु.२५ लाख खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.३०.०९.२००५ अखेर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. मुदतीअंती खालीलप्रमाणे प्राप्त निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.१०.२००५ मध्ये उघडणेत आलेल्या असून नियमानुसार सर्व निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. कागदपत्रांपैकी मे.काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड-कोपरगांव, एसएलएस स्कॉरोडाईट प्रा.लि.,-मुंबई व नितीन एन्टरप्राईजेस-नाशिक यांनी काही कागदपत्रे दिलेली नाहीत. निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता सर्व मा.सदस्यांना पुरविणेत येऊन खालील निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२ | भनसाळी मोटर्स, राहाता |
| ०३ | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव |
| ०४ | श्रीराम स्टील ट्रेडर्स, धुळे |
| ०५ | नितीन एंटरप्रायजेस, नाशिकरोड |
| ०६ | एसएलएस स्कॉरोडाईट प्रा.लिमीटेड, मुंबई |
| ०७ | रिलायन्स एक्झीम्पो द्वारा.एस.बी.ट्रेडींग कार्पोरेशन, मुंबई |

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दर स्वीकारणेत यावेत असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२२. उर्वरित बासमती तांदूळ खरेदीबाबत निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६७१.** सन २००५-०६ सालामध्ये प्रसादालयासाठी आवश्यक ५००० क्विंटल तांदूळ खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ निर्णय क्र.३८१ नुसार खालील प्रमाणे निविदाधारकांना प्रायोगिक तत्वावर प्रत्येकी १५० क्विंटल प्रमाणे पुरवठा आदेश देणेत आलेले होते

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | तांदुळ प्रकार | दर प्र.क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१. | मे.धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | सुपर कोहिनूर बासमती , दुबार | २५८०.०० |
| ०२. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | सुपर कोहिनूर बासमती मिनीदुबार | २०२५.०० |
| ०३. | मे.गणेश एजन्सी, वैजापूर | कोहिनूर फुटबॉल | २०९९.५० |
| ०४. | श्री सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक | फलाईंग हॉर्स नं. ३ अखंड | २२८५.०० |
| ०५. | धनराज छगनलाल ॲण्ड कं.वाशी | बासमती पिकरीक दुबार | २४५०.०० |
| ०६. | कोचर ब्रदर्स,अमृतसर | बासमती डबल बुल नं.१ | २२५०.०० |

वरील पैकी मे.कोचर ब्रदर्स, अमृतसर वगळता इतरांनी पुरवठा केलेला आहे.उर्वरीत ४००० क्विंटल तांदूळ खरेदीकामी खालीलप्रमाणे निविदाधारकांना प्रत्येकी १००० क्विंटल तांदूळासाठी पुरवठा आदेश देणेस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०९.२००५ निर्णय क्र.५०२ नुसार मान्यता देणेत आलेली आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | तांदुळ प्रकार | दर प्र.क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१. | मे.धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर. | श्री हॉर्स लॉंग ग्रेन अखंड | २०५०.०० |
| ०२. | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड. | सुपर कोहिनूर बासमती मिनीदुबार | २०२५.०० |
| ०३. | मे.गणेश एजन्सी, वैजापूर. | कोहिनूर फुटबॉल | २०९९.५० |
| ०४. | श्री सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक. | फलाईंग हॉर्स नं. ३ अखंड | २११०.०० |

उपरोक्तपैकी मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नासिक रोड यांनी ६०० क्विंटल व मे.सप्तश्रृंगी सप्लायर्स, नासिक यांनी ५३५.३६ क्विंटल तांदुळाचा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.गणेश एजन्सी, वैजापूर हे दिपावलीनंतर पुरवठा करणार आहेत. परंतु मे.धनेश ट्रेडींग कं. अहमदनगर यांनी त्यांचे पत्र दि.१६.०९.२००५ अन्वये टेंडर भरुन साडेतीन महिने झालेले आहेत. दरम्यानचे काळात मोटार भाडे व कंपनीचे दर वाढलेले आहेत. त्यामुळे त्यांनी भरलेले दर व सध्याचे वाढलेले दरात फारच तफावत आहे. तरी ते साडे तीन महिन्यानंतर डिलेव्हरी देण्यास बांधील राहू शकत नसल्याने बयाणा रक्कम परत मागितलेली आहे. तरी मे. धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर यांचा पुरवठा आदेश रद्द करुन त्यांचेकडील १००० क्विंटल तांदुळाचा पुरवठा उर्वरीत तीन पुरवठाधारकांना विभागून देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.धनेश ट्रेडींग कंपनी, अहमदनगर यांचा पुरवठा आदेश रद्द करुन त्यांचेकडील उर्वरित १००० क्विंटल तांदूळ मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड, श्री गणेश एजन्सी, वैजापूर, व श्री सप्तशृंगी सप्लायर्स, नाशिक यांचेकडून विभागून खरेदी करणेत यावा, तसेच खरेदी निर्णयास उशीर झाल्याने, तांदूळ निवडणेकामी आलेला खर्च वसूल करुन त्यांची बयाणा रक्कम परत करणेत यावी असे ठरले. (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२३. प्रसादालयाचे डिश वॉशिंग मशिनसाठी लिक्वीड खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७२.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.०३.२००५ निर्णय क्र.११६ नुसार सन २००५-०६ करीता प्रसादालय विभागासाठी आवश्यक असणारे लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर खरेदीस व त्याकामी येणारे रु.१,२३,९००/-पर्यतचे खर्चास मान्यता मिळालेली असून सदरील साहित्याची मागणी वार्षिक स्वच्छता साहित्य निविदेमध्ये समाविष्ट करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ मध्ये आमंत्रित करुन सूट पत्र देणेबाबत सांगणेत आलेले होते. निविदाधारकांनी दिलेले सूट पत्राचा तसेच प्रसादालय प्रमुखांचा अभिप्राय विचारात घेवून पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. प्रसादालय डिश वॉशिंग मशीनसाठी मे.रमण ॲण्ड वेल, मुंबई यांनी सोक्रेना व मे.युनायटेड टेक्नॉलॉजिस्ट, पुणे यांनी जॉन्सन डायव्हर्सी लिव्हर यांचे सुमोजन नोव्हा डी या ब्रॅण्डेड लिक्वीडचे दर सादर केलेले होते. यापूर्वी प्रायोगिक तत्वावर दोन्ही लिक्वीड वापरुन पाहिलेले आहेत. सोक्रेना दररोज १ लिटर व सुमोजन नोव्हा डी दररोज ३.५ लि.वापरावे लागते. दरम्यानचे काळात हिंदुस्थान लिवर यांचे वितरक मे.विक्रांत एजन्सीज, अहमदनगर यांचे प्रतिनिधीने प्रसादालयामध्ये समक्ष प्रात्यक्षिक देवून त्यांचेकडील डिश वॉशिंग लिक्वीड खरेदी करणेबाबतची विनंती केलेली होती.

मे.विक्रांत एजन्सी, अहमदनगर यांचेकडून रु.३७०.५० प्र.लिटर दराने ६७ लिटर डिश वॉशिंग लिक्वीड सोप खरेदी करणेत आलेले असून प्रसादालयास साधारणत दररोज ३/४ लिटर डिश वॉशिंग लिक्वीड आवश्यक आहे. त्यांचेकडील डिशवॉशिंग लिक्वीडने प्रसादालयाकडील ताटे स्वच्छ निघतात, चमकतात व त्यांना मंद सुवास येतो. प्रसादालय विभागास एप्रिल २००६ अखेर डिश वॉशिंगकरीता १३६ लिटर व इतर भांडयाकरीता ७० लिटर असे एकूण अंदाजे २०६ लिटरची गरज लागेल. सन २००५-०६ करीता मागविणेत आलेल्या ब्रॅण्डेड लिक्वीड सोपसाठी आलेले दर व प्रसादालयात प्रत्यक्ष वापरानुसार येणाऱ्या खर्चाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | ब्रॅण्ड | दर प्र.लिटर | दैनंदिन वापर | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रमण ॲण्ड वेल, मुंबई | सोक्रेना | रु.३३४.०० | १ लिटर | रु.३३४.०० |
| ०२ | युनायटेडटेक्नॉलॉजिस्ट,पुणे | सुमोजननोव्हाडी | रु.८८.०० | ३.५ लिटर | रु.३०८.०० |
| ०३ | विक्रांत एजन्सीज, अ.नगर | इजिशाईन | रु.३७०.५० | ३/४ लिटर | रु.२७७.८८ |

वरीलप्रमाणे तुलनात्मक खर्चावरुन मे.विक्रांत एजन्सीज, अहमदनगर यांचेकडील हिंदुस्थान लिव्हरचे लिक्वीड किफायतशीर असून त्याचे परिणाम चांगले आहेत. तरी त्यांचे लिक्वीड प्रसादालयाकरीता २१० लिटर खरेदीस रु.३७०.५० प्र.लि.दराने एकूण रु.७७,८०५/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२४. हनुमान मंदीराचे जीर्णोद्धाराबाबत.**

**निर्णय क्र. ६७३.** शिरडी येथील श्रीहनुमान मंदिर हे श्री साईबाबांचे काळापासून असून या मंदिराचे बांधकाम हे लाकडी खांब, लाकडी पट्‌ट्या व विटमातीचे आहे. यास अनेक वर्षे झाल्यामूळे पावसाळ्यात मंदिरामध्ये पाण्याची गळती होते. तसेच सदर मंदिर यापूर्वी नगरपंचायतीच्या ताब्यात असल्याने मंदिराची देखभाल योग्य प्रकारे न झाल्याने भिंती व दरवाजे अस्वच्छ झाले आहेत. सदरचे हनुमान मंदिर सध्या संस्थानचे ताब्यात देण्यात आले असून दैनंदिन देखभाल, पूजाअर्चा संस्थानमार्फत करण्यात येत आहे. या संपूर्ण मंदिराचा कायापालट (जिर्णोध्दार) करणे आवश्यक आहे. यासाठी लागणारा सर्व खर्च सुरत येथील साईभक्त श्री महेश व मेहूल गुप्ता (शगुन साडी ॲण्ड ड्रेसेस, सुरत) हे करण्यास तयार असलेबाबत त्यांनी दिनांक २२.०९.२००५ चे पत्रान्वये कळविले आहे. मंदिराचे जिर्णोध्दाराची गावकऱ्यांची तोंडी मागणी आहे.

तरी मंदिराचा जिर्णोध्दार करणेस मान्यता मिळालेस श्रीहनुमान मंदिराचा आराखडा व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचे एस्टिमेट तयार करुन याकामी येणारे अंदाजित खर्चाचे एस्टिमेट साईभक्त श्री महेश व मेहूल गुप्ता, सुरत यांना कळविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. संस्थान आर्किटेक्ट पॅनलवरील आर्किटेक्टकडून मंदिराचा प्लॅन व एस्टिमेट तयार करुन घेण्यात यावे असेही ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,मंदिर विभाग)

**विषय नं.२५. दर्शनलाईन हॉलमध्ये वातानुकूलीत यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७४.** "श्री" चे दर्शनाला येणा-या श्री साईभक्तांचे दर्शनरांगेकरीता शांतीनिवास इमारतीत दोन हॉल, भक्तनिवास इमारतीत दोन हॉल, व भूयारी मार्ग बनविण्यात आलेला आहे. शाळांच्या सुट्‌टीच्या दिवसात भक्तांची गर्दी वाढत असते. व याच काळात उन्हाळा असल्याने या दर्शन रांगेच्या हॉलमधून " सफोकेशन "जाणवते. भक्तांची गर्दी, त्यांचे श्वासोश्वास, बाहेरील तापमान यामुळे हॉलमधील तापमानात आणखी वाढ होते. व भक्तांना गुदमरणे, श्वासाला त्रास होणे, चक्कर येणे, उलटी होणे हे प्रकार होऊ लागतात. हे प्रकार टाळण्यासाठी या हॉलमधून थंड हवा खेळती राहणे गरजेचे आहे. याकरीता त्याठिकाणी बसवाव्या लागणा-या २८ नग एअरकुलर खरेदीसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. दिनांक १७-०४-२००५ च्या मा.व्यवस्थापन समितीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन एअरकुलर ऐवजी फ्लोअरस्टॅंडींग टॉवर टाईप एअरकंडीशनर बसविण्यासंबंधी ठरले आहे.

हे सर्व हॉल बंदिस्त स्वरूपाचे नसून उघड्या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे एअरकंडीशनरमधून निघालेली थंड हवा बाहेरील वातावरणात जाण्याची शक्यता गृहीत धरून बसवाव्या लागणाऱ्या मोठया क्षमतेच्या एअरकंडीशनरमुळे, त्यांच्या किंमतीमुळे व भविष्यातील वीज दरात होणारी वाढ लक्षात घेऊन प्रथम याठिकाणी एअरकंडीशनर बसविण्याअगोदर समक्ष पाहणी करून घेऊन त्यानुसार एअरकंडीशनरची संख्या, टाईप व जागा निश्चित करणेसाठी अहवाल देण्यासाठी गेल्या २० वर्षापासून संस्थानला एअरकंडीशनरमधील विनामूल्य मार्गदर्शन देणारे या शाखेतील तज्ञ श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.सपदा कन्सल्टंट, मुंबई यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती. तसेच एअरकंडीशनर बनविणाऱ्या ब्लू स्टार व व्होल्टास यांचेशी, या कंपन्यांच्या इंजिनिअर्सकडून या ठिकाणी किती व कोणत्या टाईपचे एअरकंडीशनर्स बसवावे लागतील तसेच या प्रकल्पासाठी किती खर्च येईल याबाबत कोटेशन (दरपत्रकासह) देण्यासाठी, लेखी संपर्क साधला होता.

(१) श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई  यांनी समक्ष पाहणी करून ऊपरोक्त हॉलमधून तसेच भूयारी मार्गातून इव्हॅपोरेटींग कुलींग सिस्टीम्व टॉवर युनिट् स्प्लिट टाईप एअरकंडिशनर ऐवजी एअरकुलड् चिलर्स सह चिलड् वॉटर सर्क्युलेशन टाईप एअरकंडिशनर सिस्टीम बसविणे योग्य राहील असे लेखी कळविले आहे. या सिस्टिमसाठी तसेच यासाठी कराव्या लागणा-या विद्युत यंत्रणेच्या बदलासह/नवीन इन्स्टॉलेशनसह रु.०१,३७,५०,०००.०० ( रू. एक कोटी सदतीस  लाख पन्नास हजार) इतका खर्च तसेच या सिस्टीमसाठी ३३५ किलोवॅट इतका विद्युत भार लागेल म्हणून कळविले आहे.

३३५ किलोवॅट इतका विद्युत भार उपलब्ध करण्यासाठी सध्याच्या विद्युत यंत्रणेत बदल करावे लागतील. तसेच प्रसादालय आवारातील सबस्टेशनपासून ३३५ किलोवॅट इतका विद्युत भार वाहू शकेल या क्षमतेच्या अंडरग्राऊंड केबल नव्याने अतिरिक्त टाकाव्या लागतील, तसेच जनरेटर रूममधील व मंदीर परिसरातील डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये बदल  याकरीता करणे शक्य नसल्याने नवीन डिस्ट्रिब्युशन पॅनेल प्रस्तावित करावा लागेल व हा वाढीव विद्युत भार महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी यांचेकडून मंजूर करून घ्यावा लागेल.

(२) मध्यंतरीच्या काळात मे.ब्लू स्टार यांचे नासिक येथील अधिकृत डिलर  मे.गारवा एन्टरप्राईझेस, नासिक यांचे दिनांक:- १९-०५-२००५  पत्रानुसार  त्यांनी सर्व एरिया मिळून ४.५ टन क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे ३४ नग - एकूण १३६ टन (४.५ टनX३४ नग) क्षमतेचे स्प्लिट टाईप एअर कंडीशनिंग युनिट्स लागतील व या मशिन्सचा तसेच डक्टींगचा खर्च मिळून रु. २९,५२,३०८ इतका येईल. हॉल बंदिस्त करणे तसेच इतर सिव्हील व इलेक्ट्रिकल्सच्या कामाचा खर्च अतिरीक्त राहील म्हणून कळविले असून मशिन सप्लायची ऑर्डर मे.ब्लू स्टार लि., दादरा यांचे नांवे व लेबर कामाची ऑर्डर मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांचे नांवे द्यावी, असे कळविले आहे. या सिस्टीमसाठी २०४ किलोवॅट इतका विद्युत भार लागेल व हा विद्युत भार वाहू शकेल या क्षमतेच्या अंडरग्राऊंड केबल नव्याने अतिरिक्त टाकाव्या लागतील, तसेच जनरेटररूममधील व मंदीर परिसरातील डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये बदल आता याकरीता शक्य नसल्याने नवीन डिस्ट्रिब्युशन पॅनेल प्रस्तावित करावा लागेल. व हा वाढीव विद्युत भार महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी  यांचेकडून मंजूर करून घ्यावा लागेल.

या प्रस्तावावर मार्गदर्शन करावे म्हणून मे.सपदा कन्सल्टंट, मुंबई  यांना पत्र पाठविण्यात आले होते. या पत्रावर सस्थान कन्सल्टंट श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई यांचा अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे.यात त्यांनी खालीलप्रमाणे सुचविले आहे.

०१).   फ्रेश एअर व डी- ह्युमिडिफाईड एअर चे गुणोत्तर पाहता ४.५ टन क्षमतेच्या मशिनऐवजी ८.० टन क्षमतेचे युनिट लावणे योग्य राहील.

०२).मशिनरीचे कार्यक्षमतेकरीता बाहेरील मोकळी हवा आत येऊ नये म्हणून हॉल बंदिस्त करावे लागतील.

०३).   सध्या ही सिस्टीम्ट्रायल बेसीसवर फक्त एकाच हॉलमध्ये - भक्तनिवासच्या तळमाळयावर बसवून बघणे योग्य राहील.

०४).   या एअर कंडिशनरद्वारा बाहेरून घेण्यात येणाऱ्या  हवेचे प्रमाण तसेच हॉलमधील खुली जागा पाहता ४.५ टन मशिनच्या कॉंप्रेसरवर कायम लोड राहून कॉंप्रेसर वारंवार खराब होण्याची शक्यता आहे.

०५).   ज्या हॉलमध्ये ही सिस्टीम्लावण्यात येईल त्या हॉलच्या एरीयाकरीता डीबीटी आणि आर.एच.व्हॅल्यू ही पीक समर तसेच पीक मान्सूनमध्ये स्थीर राहील याची लेखी हमी मे.ब्लू स्टार लि.यांचे अधिकृत डिलर मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांचेकडून घेण्यात यावी.

०६).   जोपर्यंत ही सिस्टीम पूर्णत: समाधानकारक ( पूर्ण उन्हाळयात ) काम देईपर्यंत / चालू होईपर्यंत बीलातील २५% ( पंचवीस टक्के ) रक्कम ही राखून ठेवण्यात यावी.

०७). (अ)जर भक्तनिवास तळमाळयावर ही सिस्टीम्उन्हाळयात समाधानकारकपणे चालली तरच पुढील हॉलमधून ही सिस्टीम्बसविण्यात यावी.

( ब )   जर भक्तनिवास तळमाळयावर लावलेली ही सिस्टीम भर उन्हाळयात समाधानकारक चालली नाही तर मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांनी जादा रक्कम न घेता ही सिस्टीम त्या ठिकाणाहून काढून घेऊन दुसरीकडे  ( संस्थान सांगेल त्याठिकाणी ) बसवावी.

(१)   श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई  यांनी कळविलेली एअरकुलड् चिलर्स सह चिलड् वॉटर सर्क्युलेशन टाईप एअरकंडिशनर सिस्टीम लावणेसाठी तसेच यासाठी कराव्या लागणा-या विद्युत यंत्रणेच्या बदलासह/नवीन इन्स्टॉलेशनसह रु. ०१,३७,५०,०००.०० ( रू.एक कोटी सदतीस लाख पन्नास हजार ) इतका खर्च येईल.

(२)   मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांनी  (अ) सर्व एरिया मिळून ४.५ टन क्षमतेचे प्रत्येकी एक याप्रमाणे ३४ नग - एकूण १३६ टन (४.५ टन X ३४ नग) क्षमतेचे स्प्लिट टाईप एअर कंडीशनिंग युनिट्स लागतील (ब) त्यांचा तसेच डक्टींगचा खर्च मिळून रु. २९,५२,३०८ इतका येईल. (क) हॉल

बंदिस्त करणे तसेच इतर सिव्हील कामाचा खर्च अतिरीक्त राहील. (ड) मशिन सप्लायची ऑर्डर मे.ब्लु स्टार लि., दादरा यांचे नांवे व लेबर कामाची ऑर्डर मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांचे नांवे द्यावी असे कळविले आहे. (इ) या सिस्टिमसाठी २०४ किलोवॅट इतका विद्युत भार लागेल व हा विद्युत भार वाहू शकतील या क्षमतेच्या अंडरग्राऊंड केबल नव्याने अतिरिक्त टाकाव्या लागतील, तसेच जनरेटररूम मधील व मंदिर परिसरातील डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये बदल आता याकरीता शक्य नसल्याने नवीन डिस्ट्रिब्यूशन पॅनेल प्रस्तावित करावा लागेल. व हा वाढीव विद्युत भार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडून मंजूर करून घ्यावा लागेल. (फ) सिव्हील कामात मशिनरी शेड, बाहेरील मोकळ्या भिंती प्लायवूडने बंद करणे , फॉल सिलींग करणे , मशिनरी फाऊंडेशन, होल सिमेंटींग वगैरे कामाचा समावेश आहे. (ग ) एकूण खर्च मशिनरी + इलेक्ट्रीकल + सिव्हील मिळून अंदाजे रू. ७४,००,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त विषयावर समक्ष चर्चेसाठी एअरकंडीशनरमधील तज्ज्ञ श्री.प्रशांत चितळे तसेच ब्लू स्टार यांचे वतीने कोटेशन सादर केलेले मे.गारवा एन्टरप्राईझेस, नाशिक यांना बोलविण्यात आलेले होते.

आजचे सभेत श्री.प्रशांत चितळे, हे सभेस समक्ष उपस्थित होते. त्यांनी एअरकुल्ड चिलर्स सह चिल्ड वॉटर सर्क्युलेशन टाईप एअरकंडिशनर सिस्टीमबाबत सभेस माहिती दिली तसेच सभेने त्यांना विचारलेल्या प्रश्नांची समर्पक व समाधानकारक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सभेने श्री.प्रशांत चितळे, यांना याकामी टेंडर तयार करण्यास व कंपन्यांची शॉर्ट लिस्टिंग तसेच वर्तमानपत्रातील द्यावयाच्या जाहीरातीचा नमूना तयार करण्याविषयी सांगितले. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.२६. नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या नव्या कॅथलॅबसाठी लागणाऱ्या केबल व पॅनेलसाठी आलेली कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७५.** नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या नव्या कॅथलॅबसाठी केबल व पॅनेलसाठी आवश्यक असणाऱ्या इलेक्ट्रीक मटेरीअल खरेदीसाठी ३,१२,७००.०० इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी दिनांक १८-०९-२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता. दिनांक १८-०९-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदर प्रस्तावावर चर्चा होऊन या मटेरीअलचे खरेदीसाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला आहे. त्यानुसार इलेक्ट्रीक मटेरीअल खरेदीसाठी कोटेशन मागविण्यात आले होते. व खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक |
| ०२ | मे.तिरुमल मार्केटींग, नाशिक |
| ०३ | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक |
| ०४ | मे. ऐश्वर्या इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक |
| ०५ | मे. साई-सॅन इन्टरनॅशनल, मुंबई |
| ०६ | मे.अवधूत इंजिनिअर्स, मुंबई |
| ०७ | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे आलेली कोटेशन्स उघडणेसाठी व त्यावर निर्णय होणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार उपरोक्त कोटेशन्स सभेपूढे उघडण्यात आले. कोटेशनधारकांनी नमूद केलेले दर खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव | केबलींग व वायरींग मटेरीअलची किंमत अ | पॅनेलची किंमत ब | एकुण ( अ + ब ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | रु. २,००,०८२.०० | रू.६६,९२४.०० | रू. २,६७,००६.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम डी.डी.द्वारे भरलेली आहे. |
| ०२) | मे.तिरुमल मार्केटींग, नाशिक | रु. ३,६३,७०५.०० | रु.१,३५,७००.०० | रु.४,९९,४०५.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम चेक द्वारे भरलेली आहे. |
| ०३) | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स , नासिक | रु. ३,३०,९३१.०० | रु.१,१६,८३०.०० | रु.४,४७,७६१.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम डी.डी.द्वारे भरलेली आहे. |
| ०४) | मे.ऐश्वर्या इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | रु. ३,४८,४६०.०० | रु.१,२५,४०५.०० | रु.४,७३,८६५.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नाही. |
| ०५) | मे.साई-सॅन इन्टरनॅशनल , मुंबई | निरंक | रु.०,७५,१००.०० | रु.०,७५,१००.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नाही. |
| ०६) | मे.अवधूत इंजिनिअर्स , मुंबई | निरंक | रु.०,८८,०२६.०० | रु.०,८८,०२६.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नाही. |
| ०७) | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | रु. २,१०,१००.०० | निरंक | रु. २,१०,१००.०० | अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नाही. |

(०१) मे.ऐश्वर्या इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉट्रॅक्टर्स, नाशिक , मे.साई-सॅन इन्टरनॅशनल , मुंबई , मे.अवधूत इंजिनिअस, मुंबई, मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर यांनी टेंडरसोबत अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम भरलेली नाही. त्यामुळे त्यांच्या कोटेशन्सचा विचार करता येणार नाही.

(०२)कोटेशनसोबत अर्नेस्ट मनी डिपॉझीट भरलेल्यांपैकी मे. श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे निविदा दर निम्नतम असून त्यांनी एकत्रित दर रू. २,६७,००६.०० इतके नमूद केलेले आहेत.

यावर चर्चा होऊन, निम्नतम दर दिलेले मे. श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना कार्यादेश देणेस व येणाऱ्या रु. २,६७,००६.०० इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.२७. धर्मशाळा (२०० रुम)गेट ते म्हाळोबा मंदीर पर्यंतची ड्रेनेज पाईप लाईन बदली करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७६.** नवीन धर्मशाळा (२०० रुम) चे गेट पासून ते म्हाळोबा मंदिरापर्यंत नगरपंचायतचे चेंबरला जोडणेसाठी पूर्वीची ड्रेनेज पाईप लाईन असून ती कमी व्यासाची आहे. त्यामुळे आपले धर्मशाळेकडून येणारे ड्रेनेज लाईनचे पाणी तसेच नांदुर्खी रोडचे, नगरपंचायतचे, श्रीकृष्णनगरचे पाणी हे सदरच्या पाईप लाईन मध्ये बसत नाही त्यामुळे धर्मशाळेकडे जाणेसाठी असणा-या रोडवर पाणी साचते. तशातच पाऊस झाल्यावर पाण्याचे प्रमाण फारच वाढते व जाणे-येण्याचे रस्त्यावर मोठया प्रमाणावर पाणी साचून राहते. याचा प्रत्यय श्रीगणेश उत्सव काळात आलेला आहे. त्यामुळे नवीन धर्मशाळेत येणारे साईभक्त व रुग्णालयात रुग्णास भेटावयास येणारे नातेवाईक यांना फारच त्रास होतो. त्यासाठी तेथे असलेली पूर्वीची पाईप लाईन ही बदली करुन मोठया व्यासाची पाईपलाईन (३ फुटी व्यासाची) टाकणे आवश्यक आहे. ही ३ फुटी पाईपलाईन नवीन धर्मशाळेचे पूर्व- दक्षिण कोप-यापासून रोडचे कडेने म्हाळोबा मंदिर नगरपंचायतचे चेंबरपर्यंत टाकावी लागणार असून त्यासाठी खालील प्रमाणे एकूण रुपये ५,२०,५००.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं | तपशील | आवश्यकता | अंदाजे दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३ फुटी आर.सी.सी.पाईप | १३३ नग | २,५००/-प्रती नग | ३,३२,५००/- |
| ०२ | ३ फुटी कॉलर | ८० नग | २,५०/- प्रती नग | २०,०००/- |
| ०३ | ३ फुट x ३ फुट आर.सी.सी. चेंबर कव्हर | १६ नग | २,२५०/-प्रती नग | ३६,०००/- |
| ०४ | ४ फुट x ४ फुट चेंबर खोदाई बांधकाम प्लास्टर पी.सी.सी. मजुरीसह | १६ नग चेंबर | ५,०००/-प्रती नग चेंबर | ८०,०००/- |
| ०५ | ३ फुटी पाईप फिट करणे खोदाईसह मजुरी. | १३० पाईप | ४,००/- प्रती पाईप | ५२,०००/- |
| | | एकूण- | | **५,२०,५००/-** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, धर्मशाळा (२०० रुम) गेट ते म्हाळोबा मंदीर पर्यंतची ड्रेनेज पाईप लाईन निविदा मागवून बदली करणेस व याकामी येणारे अंदाजे रूपये **५,२०,५००/-** चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमख/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२८. पुस्तके/फोटो छपाई व कॅसेट/सीडी तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७७.** खाली दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व कॅसेट/सीडी यांचा भांडार विभागात आज मितीस अल्प प्रमाणात साधारणत: २ ते ६ महिने पुरेल एवढाच साठा शिल्लक असल्याने सदरचे पुस्तके/फोटो छपाई करून घेणे व कॅसेट/सीडी तयार करून घेणे आवश्यक असल्याने तत्संबंधीत तपशील खाली "अ","ब" व "क" प्रमाणे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसत्चरित्र | कन्नड | २१.३.०५ | १९.०० | १०,००० | २३.०० | २,३०,०००/- |
| ०२ | साईसत्चरित्र | तेलगू | ०६.२.०२ | १९.०० | १,००,००० | २३.०० | २३,००,०००/- |
| ०३ | साईसत्चरित्र | तामिळ | १२.९.०२ | ३३.३८ | १५,००० | ४०.०० | ६,००,०००/- |
| ०४ | श्रीसदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | २५.०१.०५ | १.६९ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०५ | श्री साईस्तवन मंजरी | मराठी | ०६.०२.०२ | १.५० | २५,००० | २.०० | ५०,०००/- |
| ०६ | श्रीसाई रूद्राध्याय (११ अध्याय) | मराठी | ०७.०६.०४ | १.५५ | ५,००० | २.०० | १०,०००/- |
| ०७ | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | ०५.०२.०५ | ५३.०० | १०,००० | ६५.०० | ६,५०,०००/- |
| ०८ | श्रीसाईबाबांची शिकवण व तत्वज्ञान | मराठी | ०५.०७.०४ | ९.५० | ५,००० | १२.०० | ६०,०००/- |
| | | | | | | एकूण रूपये | ४१,००,०००/- |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | आकार | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | द्वारकामाई ४ रंगात | १४"X २०" | ६.२.०२ | १.५० | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | द्वारकामाईत बसलेले बाबा ४ रंगात | १४"X २०" | १२.९.०२ | २.३० | १,००,००० | ३.०० | ३,००,०००/- |
| ०३ | श्रीसाईबाबा मूर्ती फोटो ४ रंगात | १४"X २०" | ६.२.०२ | १.७० | २,००,००० | २.०० | ४,००,०००/- |
| ०४ | श्रीसाईबाबा मूर्ती फोटो ४ रंगात | ०२"X ०३" | १९.६.०४ | ०.०८ | ५,००,००० | ०.१० | ५०,०००/- |
| ०५ | श्रीसाईबाबा मूर्ती फोटो ४ रंगात | ०४"X ०६" | ९.६.०४ | ०.१९ | ५०,००० | ०.२५ | १२,५००/- |
| | | | | | | एकूण रूपये | ९,६२,५००/- |

**क) कॅसेट/सी.डी.**

| अ.नं | तपशिल | वर्णन | तयार केल्याची तारीख | मागिल दर | संख्या | अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरूपाठाचे अभंग ऑडिओ -२ सीडीचा संच | सी.डी | १४.१.०५ | २८.१४ | ३,००० | ३५.०० | १,०५,०००/- |
| ०२ | ओंकार साधना मार्गदर्शिका - पुस्तीकेसह | कॅसेट | २२.३.०५ | १२.२२ | १,००० | १५.०० | १५,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी | सी.डी. रोम | १५.४.०५ | १३.२६ | ५,००० | १५.०० | ७,५०००/- |
| | | | | | | एकूण रूपये | १,९५,०००/- |

**उपरोक्त "अ ", "ब" व "क" नुसार**

| **अ.नं** | **तपशील** | **एकूण रक्कम रुपये** |
|---|---|---|
| ०१ | "अ " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ८ पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये - | ४१,००,००० /- |
| ०२ | "ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ५ प्रकारचे फोटो छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये | ९,६२,५००/- |
| ०३ | "क" या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे कॅसेट व सी.डी. तयार करणेकामी अपेक्षित खर्च | १,९५,०००/- |
| | एकूण रूपये - | ५२,५७,५००/- |

वरील तपशिलाप्रमाणे "अ ", "ब" व "क" मिळून अंदाजे रूपये ५२,५७,५००/- (अक्षरी रूपये बावन्न लाख,सत्तावन्न हजार, पाचशे ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २००५-२००६ मंजूर बजेट तरतूद रूपये-१,००,००,०००/- तसेच कॅसेट/सी.डी तयार करणेसाठी मंजूर बजेट तरतूद रूपये १५,००,०००/-मधून करता येईल.

तरी वरील "अ" व "ब" यात दर्शविलेप्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई ही मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार संबंधीत १८ निवडक प्रेसधारक तसेच दि.०६.०८.२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२३ निर्णय क्रमांक ४११ नुसार मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे व मे. निर्मल ऑफसेट, नाशिक रोड यांचेसह निवडक २० प्रेसधारकांकडून करून घेणेस व कॅसेट/सी.डी निर्मिती मुंबई येथील नामांकित सी.डी निर्मात्यांकडून करून घेणेस व याकामी अंदाजे रूपये ५२,५७,५००/- (अक्षरी रूपये बावन्न लाख,सत्तावन हजार, पाचशे ) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२९. संस्थान पुस्तके/फोटो दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी नवीन प्रेसधारकांची नावे निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६७८.**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशीत प्रकाशने विभागातील पुस्तके/फोटो/दैनंदिनी व दिनदर्शिकेचे उत्कृष्ट छपाईसाठी तसेच प्रकाशनांचा दर्जा सुधारणेसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार खालील १८ निवडक प्रेसधारकांची निवड करण्यात आली आहे.

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नाव** |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |

| | |
|---|---|
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १८ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर. |

वरील एकूण १८ निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामे करुन घेण्यात येत आहेत. तथापि, पुस्तके, फोटो व श्रीसाईबाबा दैनंदिनी-दिनदर्शिकाची छपाई कामासाठी १८ निवडक प्रेसधारकांना छपाई कामाचे कोटेशन्स पाठविले नंतर फक्त ५-६ प्रेसधारकांकडूनच छपाई कामांचे सिलबंद कोटेशन्स प्राप्त होतात. त्यामुळे मर्यादित प्राप्त झालेल्या कोटेशन्स मध्ये निर्णय घेणे भाग पडते. तेव्हा निवडक प्रेसधारकांचे यादीत वाढ होणेसाठी तसेच लेखापरिक्षणाच्या (ऑडिटच्या) दृष्टीने अडचण निर्माण होवू नये म्हणून त्यांचे प्रेसची माहिती (बायोडाटा) व वार्षिक उलाढाल आपले अटीप्रमाणे पहाणे आवश्यक असल्याने त्यांचेकडून छपाईकामाचे प्रेसचे माहितीपत्रक संबंधीत नामांकित प्रेसधारकांकडून जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/६३६७/२००५ दि.१७.०६.२००५ अन्वये संपूर्ण तपशिलासह माहितीपत्रक मागविण्यात आले होते.यात संबंधीत प्रेसधारकांची वार्षिक उलाढाल १ कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असावी अशी अट टाकण्यात आली होती. तद्नुसार निवडक प्रेसधारकांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार प्रेसधारकांची छाननी करुन तत्संबंधीत तपशील खालील **"अ"** व **" ब"** यात दर्शविला आहे.

## अ) वार्षिक उलाढाल १ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असलेले प्रेसधारक.

| अ.नं | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | सेफ ऑफसेट प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |
| ०२ | न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई |
| ०३ | नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |
| ०४ | कल्याणी कार्पोरेशन ,पुणे |
| ०५ | ओनस इम्प्रेशन,मुंबई |
| ०६ | निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक रोड. |
| ०७ | दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| ०८ | ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि. वडाळा,मुंबई |
| ०९ | उच्चिता ग्राफिक प्रिटर्स प्रा.लि., मुंबई |
| १० | एस.व्ही.एंटरप्राईझेस् ,मुंबई |
| ११ | प्रेमियर प्रेस, सिकंदराबाद |

## ब) वार्षिक उलाढाल १ कोटीपेक्षा कमी व अपूर्ण माहिती असलेले प्रेसधारक.

| अ.नं | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|
| १२ | इगल प्रेस, चेन्नई |
| १३ | डिजीटल प्रेस सिस्टम ॲण्ड सोलुशन प्रा.लि.,अ.नगर |
| १४ | साईताज ग्रुफ ऑफ कंपनी, हैद्राबाद |
| १५ | श्री.रामण प्रोसेस प्रा.लि., सिकंदराबाद |
| १६ | रोहन प्रिंटर्स, पुणे |
| १७ | गणेश ऑफसेट, मुंबई |
| १८ | निर्मिती एंटरप्राईझेस, कोपरगांव |

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१-३/४/२००१ चे सभेतील विषय नं.३८ निर्णय क्रमांक १४५ तसेच मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्रमांक १३८ यात संस्थानची प्रकाशने छपाईकामी कोटेशन मागवितांना छपाई कर्त्याची वार्षिक उलाढाल ही १ कोटी रूपये किंवा त्यापेक्षा जास्त असावी अशी अट घालण्यात आली होती. सदरच्या अटीनुसार वरील **"ब"** यात दर्शविल्याप्रमाणे अ.नं. १२ ते १८ यांचेकडून त्यांचेद्वारा माहितीपत्रकात पूर्णपणे माहिती प्राप्त झाली नसल्याने तसेच त्यांचे वार्षिक उलाढाल १ कोटीपेक्षा कमी असल्याने त्यांचा विचार करता येणार नाही.

वरील **"अ"** यात दर्शविलेप्रमाणे अ.नं. १ ते ११ यात नमूद केलेप्रमाणे प्रेसधारकांची वार्षिक उलाढाल ही १ कोटी व त्यापेक्षा जास्त आहे.तसेच त्यातील अ.नं.१,२ व ११ यांनी यापूर्वी संस्थानची छपाईची कामे केलेली आहेत. अ.नं.११ यात दर्शविलेले संबंधीत प्रेमियर प्रेस, सिकंदराबाद यांचे नांव मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २१-२२/०२/२००४ चे सभेततील विषय नं.३३ निर्णय क्रमांक ७४ नुसार त्यांनी श्रीसाईबाबा दैनंदिनी २००४ मध्ये केलेल्या चुका तसेच दैनंदिनीची बायडींग व फोटो छपाई निकृष्ट दर्जाची केल्याने त्यांचे नांव काळया यादीत टाकण्यात आले आहे. तथापि, संबंधीत प्रेसधारकाने दिनांक २७.०४.२००५ रोजी दाखल केलेल्या पत्राद्वारे त्यांचे नांव काळया यादीतून काढून टाकणे विषयी विनंती करून सध्या त्यांचेकडे अद्ययावत संगणकीय व्यवस्था,बायडींग मशिनरी,उपलब्ध झाली असल्याने पुस्तक छपाई कामाची संधी देणेबाबत इच्छा प्रकट केली आहे. त्यांनी यापूर्वी श्रीसाईसत्चरित्र तेलगू, श्रीसाईनाथ तेलगू पूजाविधी आरती या पुस्तकांची छपाईची कामे चांगल्या

प्रकारे करून दिली आहेत. तरी त्यांचेकडून मराठी भाषेव्यतिरिक्त इतर भाषेतील पुस्तके छपाई करणेस पूर्नविचार होणेस हरकत नाही.

तरी **अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे अ.नं.१ ते ११ याप्रमाणे एकूण ११ प्रेसधारकांची संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाईकामी निवडक प्रेसधारक म्हणून निवड करणेविषयी निर्णय होवून त्यांचे नाव संस्थानचे वर नमूद केलेले १८ निवडक प्रेसधारक यादीत समाविष्ट करून घेणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रकाशने विभागाकडील पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन पाठवून छपाईचे काम करून घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३०. हिन्दी,इंग्लिश व तेलगू भाषेतील माहितीपत्रक छपाईकामाचे कोटेशन उघडणे व निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ६७९.** उपरोक्त विषयी संस्थानसाठी आवश्यक असणारे हिंदी,इग्लिश,तेलगू भाषेत माहितीपत्रिका व इंग्लिश भाषेतील देणगी पत्रिका छपाई करून घेणे असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक-०२.१०.२००५ चे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस-वशी-प्रकाशने-१०९५४/२००५ दिनांक-०३.१०.२००५ अन्वये अहमदनगर, श्रीरामपूर, राहूरी,राहाता, कोपरगांव या ठिकाणाहून हिंदी, इंग्लीश, तेलगू भाषेत माहितीपत्रिका व इंग्लिश भाषेतील देणगी पत्रिका छपाई करून घेणेसाठी १० प्रेसधारकांना कोटेशन पत्र पाठवून ते भरून देणेकामाची अंतिम मुदत दिनांक- ११.१०.२००५ अखेर देण्यात आली होती.

अहमदनगर जिल्हा परिसरातील प्रेसधारकांची यांदी

| अ.न. | प्रेसधारकाचे ाांव व गांव | अ.न. | प्रेसधारकाचे नांव व गांव |
|---|---|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स,अहमदनगर | ०२ | लक्ष्मी प्रिटर्स, कोल्हार भगवती |
| ०३ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर | ०४ | श्री साई समर्थ प्रिंटींग प्रेस, मु.पो. साकुरी, |
| ०५ | डिजीटल प्रिंट सिस्टीम ॲण्ड सोलुशन प्रा.लि.अहमदनगर ४१४ १११ | ०६ | निर्मिती एटरप्राईझेस, मु.पो.ता. कोपरगांव |
| ०७ | रामकृष्ण प्रिंटींग प्रेस, मु.पो. शिवाजीगर, राहुरी कारखाना, | ०८ | मे.गोपाल प्रिंटींग प्रेस,मु.पो.ता. श्रीरामपुर |
| ०९ | मे.भारत प्रिंटर्स, मु.पो.ता. श्रीरामपुर | १० | सुपर प्रिंट प्रा.लि.अहमदनगर |

उपरोक्त १० प्रेसधारकांपैकी मुदतीत खालील प्रमाणे ६ प्रेसधारकांची कोटेशन पत्र प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | निर्मिती एन्टरप्राईझेस,कोपरगांव |
| ०२ | सुपर प्रिन्टस्,अहमदनगर |
| ०३ | भारत प्रिंटर्स, श्रीरामपूर |
| ०४ | डिजिटल प्रिंट सिस्टम सोल्यूशन प्रा.लि.,अ,नगर |
| ०५ | श्री साई समर्थ प्रिंटर्स, साकुरी ( राहाता ) |
| ०६ | मे.निट प्रिंटर्स्,अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | हिंदी माहितीपत्रिका (रुपये) | इंग्लिश माहितीपत्रिका (रुपये) | तेलगू माहितीपत्रिका (रुपये) | इंग्लिश देणगी माहितीपत्रिका (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | १०,००० नग | १०,००० नग | १०,००० नग | १०,००० नग |
| ०१ | निर्मिती एन्टरप्राईझेस,कोपरगांव | २.५० | २.५० | २.५० | २.५० |
| ०२ | सुपर प्रिन्टस्,अहमदनगर | २.०५ | २.०५ | २.०५ | २.०५ |
| ०३ | भारत प्रिंटर्स, श्रीरामपूर | २.८५ | २.८५ | २.८५ | २.८५ |
| ०४ | डिजिटल प्रिंट सिस्टम सोल्यूशन प्रा.लि. अ,नगर | १.९८ | १.९८ | १.९८ | १.९८ |
| ०५ | श्री साई समर्थ प्रिंटर्स, साकुरी ( राहाता | २.२० | २.२० | २.२० | २.२० |
| ०६ | मे.निट प्रिंटर्स्,अहमदनगर | २.०० | २.०० | २.०० | २.०० |

वरील तुलनात्मक तक्त्यातील मे.डिजीटल प्रिंट सिस्टीम ॲण्ड सोल्युशन प्रा.लि.अहमदनगर यांचे हिंदी,इंग्लीश, तेलगू माहितीपत्रक व इंग्लीश देणगी माहितीपत्रिका छपाई कामाचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना छपाई कामाचा आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३१. श्रीसाईसच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) पुस्तक छपाई कामाचे कोटेशन उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८०.** प्रकाशने विभागाकडील दि.०४.०८.२००५ चे मान्यताप्राप्त प्रस्तावानुसार '' श्रीसाई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)'' श्री शिवनारायण टुवानी, इन्दौर यांचे मार्गदर्शनाखाली इन्दौर येथील नामांकित प्रेसधारकांकडून छपाई करुन घेण्यात यावी,असे ठरले होते. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी/

प्रकाशने/८४११/२००५. दि.०९.०८.२००५ अन्वये इंदौर व भोपाल येथील ६ नामांकित प्रेसधारकांना छपाई कामाचे कोटेशन्स पाठविण्यात येवून ते दि.२५.०८.२००५ अखेर जमा करणेविषयी कळविण्यात आले होते.त्यानुसार ४ प्रेसधारकांची कोटेशन्स उघडण्यात येवून त्यांना वाटाघाटीसाठी दि.०२.१०.२००५ मा.व्यवस्थापन समितीचे सभेत बोलाविण्यात आले होते त्यात त्यांनी **"श्रीसाई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)"५०००** प्रती प्रथम आवृत्ती छपाईकामी खालील प्रमाणे दर देवू केलेले आहे.

**अ) "श्रीसाई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली)"**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | कोटेशन मधिल दर | वाटाघाटीत देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीरंग ऑफसेट, इंदौर | ६३.०० | ६२.०० |
| ०२ | वर्धमान काम्प्युटर्स, इंदौर | ९८.२५ | ९५.०० |
| ०३ | वर्धमान प्रिंटर्स, इंदौर | ९४.०० | ९४.०० |
| ०४ | श्री ऑफसेट प्रिंटर्स, भोपाळ | ७५.८३ | अनुपस्थित |

वरील तुलनात्मक तक्त्यातील श्रीरंग ऑफसेट, इंदौर यांचे वाटाघाटीतील दर निम्नतम रु.६२.०० दिले होते. परंतू इतर प्रेसचे दरात तफावत दिसून आल्याने परिसरातील प्रेसधारकांकडून छपाई कोटेशन्स घेणेबाबत निर्णय झाल्यामुळे परिसरातील प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/११०९४/०५ दि.०५.१०.२००५ ने पाठविण्यात येवून ती दि.२०.१०.०५ पर्यंत जमा करणे विषयी कळविण्यात आले त्यानुसार खालील चार प्रेसधारकांची कोटेशन्स प्राप्त झाली. प्राप्त झालेली कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजीचे सभेत समक्ष उघडण्यात आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

ब)

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | कोटेशन मधील दर |
|---|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | ७२.०० |
| ०२ | डिजिटल प्रिंट सीस्टीम अॅन्ड सोलुशन प्रा.,अहमदनगर | ६८.०० |
| ०३ | निर्मिती एंटरप्राईझेस, कोपरगांव | १०२.०० |
| ०४ | भारत प्रिंटर्स, श्रीरामपूर | ९५.०० |

कोटेशनमधील डिजिटल प्रिंट सिस्टम अॅन्ड सोलुशन प्रा.,अहमदनगर यांचा दर रुपये ६८.०० पैसे हा निम्नतम आहे.

तथापि, उपरोक्त ''अ'' व ''ब'' मधील दर विचारात घेता ''अ'' मधील श्रीरंग ऑफसेट, इंदौर यांनी वाटाघाटीत दिलेला दर रुपये ६२.००पैसे हा निम्नतम दिलेला असल्याने त्यांचेकडून श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) छपाईचे काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३२. संस्थान रुग्णालयाकरिता वापरात असलेल्या रुग्णवाहिकेच्या दराबाबत.**

**निर्णय क्र. ६८१.** अ)श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी तर्फे साईनाथ रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजु रूग्णांकरीता "ना-नफा-ना-तोटा" या तत्त्वावर रुग्णवाहीकांचा वापर होत आहे. मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२५/०२/२००३ चे सभेतील विषय क्रं.२२ निर्णय क्रं.६६ अन्वये डिझेल वाहना करीता प्रती कि.मी. रु.३/- प्रमाणे व पेट्रोल वाहनांकरीता प्रती कि.मी. रु.४/- प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/१२/२००४चे सभेतील विषय क्रं.१८, निर्णय क्रं.१८९ अन्वये कार्डियाक रूग्णवाहीका या ए.सी.वाहनांचा दर प्रति कि.मी.रू.५/- ठरविण्यात आलेला आहे. दर निश्चिती नंतर डिझेल व पेट्रोल दरातील वाढ, तसेच वाहनांचे अॅव्हरेज लक्षात घेता इंधन खर्च ही मिळत नाही. त्यामुळे वाहन भाडे दरात वाढ करणे आवश्यक आहे.

दर निश्चिती नंतर डिझेल तसेच पेट्रोलचे दरातील वाढ त्यावेळचे वाहन भाडे दर, आजचे दर व आजचे अपेक्षीत वाहन भाडे दर यांचा तुलनांत्मक तक्ता खालील प्रमाणे.

| तपशील | दि.२५/०२/०३ चे दर (रूपये) | | आज रोजी इंधन दर (रूपये) | इंधन दरातील वाढ (%) | अपेक्षीत वाहन भाडे दर (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| | इंधन | वाहन भाडे | | | |
| डिझेल | २५.३० | ३.०० | ३६.७५ | ४५ % | ४.५० |
| पेट्रोल | ३६.७९ | ४.०० | ४७.४७ | २९ % | ५.५० |

| | दि. २७/१२/२००४ चे दर (रूपये) | | आज रोजी इंधन दर (रूपये) | इंधन दरातील वाढ (%) | अपेक्षीत वाहन भाडे दर (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| | इंधन | वाहन भाडे | | | |
| कार्डियाक रूग्णवाहीका ए.सी. | ३१.६४ | ५.०० | ३६.७५ | १६% | ७.०० (इंधन खर्च व अॅव्हरेज विचारात घेता) |

साईनाथ रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजू रूग्णांकरीता फक्त डिझेलचा खर्च लक्षात घेता तुलनात्मक तक्त्या नुसार खालील प्रमाणे दर ठेवावे असे वाटते.

०१) डिझेल वाहन प्रति कि.मी. रु. ४.५० प्रमाणे.

०२) पेट्रोल वाहन प्रति कि.मी. रु. ५.५० प्रमाणे.

०३) कार्डियाक रूग्णवाहीका ए.सी. प्रति कि.मी. रू.७.०० प्रमाणे.

**ब)** तसेच आपल्या हॉस्पिटलच्या रूग्णवाहीका व शववाहिका बऱ्याच वेळा परराज्यात (आंध्रप्रदेश, राजस्थान, गुजरात, कर्नाटक, दिल्ली इ.) ठिकाणी नेहमी जात असतात. प्रवास रात्री अपरात्री करावा लागतो. त्यामुळे संरक्षणाची हमी नसते. वाहनाला अपघात झाल्यास अथवा बिघाड झाल्यास भाषेची व इतर अनेक अडचणी निर्माण होतात. तरी सदर वाहने महाराष्ट्राबाहेर पाठवाव्यात किंवा कसे या बाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयाकरीता वापरात असलेल्या रुग्णवाहिकेच्या दरात सध्या कोणताही बदल करणेत येऊ नये, असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.३३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये मध्यवर्ती संगणक प्रशिक्षण विभाग विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८२.** श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडील खालील प्रमाणे पांच संगणक अभ्यासक्रम १९९९ पासून सुरु केलेले आहेत.

अ )

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश क्षमता | प्रशिक्षण शुल्क संस्थेचा वाटा प्रती विद्यार्थी | संभाव्य एकूणमहसुल | वर्षाचा संभाव्य एकूणमहसुल |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Certificate in Office Computing | 6 Month | 20 | 1200/- | 24000/- | 48000/- |
| 02 | Certificate in Computerized Financial Accounting | 6 Month | 20 | 1450/- | 29000/- | 58000/- |
| 03 | Certificate in D.T.P. | 6 Month | 20 | 1200/- | 24000/- | 48000/- |
| 04 | Diploma in Computerized Financial Accounting | One Year | 20 | 2750/- | 55000/- | 55000/- |
| 05 | Diploma in Office Computing | 6 Month | 20 | 2250/- | 45000/- | 90000/- |
| | एकुण | | 100 | 8850/- | 1,77,000/- | 2,99,000/- |

ब ) तसेच जानेवारी २००५ पासुन संस्थेमध्ये महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे यांचे मार्फत सुरु असलेला MS-CIT हा तीन महीने कालावधीचा लोकप्रिय अभ्यासक्रम आपले संस्थेमध्ये सुरु करणेत आला आहे. त्याची प्रवेश क्षमता या आधी २४० विद्यार्थी एवढी होती. चालू सत्रापासून महामंडळाने आपल्या संस्थेची प्रवेश क्षमता २४० ऐवजी ३७० एवढी वाढविलेली आहे. या बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कोर्स | कालावधी | प्रवेश क्षमता | प्रती विद्यार्थी संस्थेचा प्रवेश शुल्क वाटा | संभाव्य एकूणमहसुल | वर्षाचा संभाव्य एकूणमहसुल |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MSCIT Regular | 3 Month | 336 | 1300/- | 436800/- | 17,47,200/- |
| 02 | MSCIT Self Study | 3 Month | 34 | 100/- | 3400/- | 13,600/- |

क ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्र शासनाच्या सी.टी.एस.स्किम अंतर्गत सुरु असलेल्या नियमित दहा पैकी नऊ व्यवसायांच्या अठरा तुकडयांमधील ३०० विद्यार्थ्यांना समाज शारत्र विषयाच्या अभ्यासक्रमात शासनाने केलेल्या बदलानुसार २० गुणांसाठीचा संगणक अभ्यासक्रम समाविष्ट करुन तो अनिवार्य केलेला आहे. या विद्यार्थ्यांकडून संपूर्ण प्रशिक्षणासाठी ( अर्थात त्या-त्या व्यवसायाचे प्रात्यक्षिक व चार सैध्दांतीक विषयांसह ) शासकिय नियमानुसार आपण प्रतिवर्षी रु.१५००/- प्रशिक्षण शुल्क घेतो. त्यापोटी संस्थेकडे सुमारे ४ लाख पन्नास हजार रुपये जमा होतात.

सध्या संस्थेमध्ये २० फुट X २० फुट क्षेत्रफळाच्या खोलीमध्ये फक्त १० संगणकाच्या मदतीने सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. तथापि, मोठया विद्यार्थी संख्येमुळे सध्याच्या संगणक लॅबमध्ये असलेल्या सुविधेनुसार प्रभावी संगणक प्रशिक्षण देणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे सर्व अभ्यासक्रमांसाठी संस्थेकडे सध्या उपलब्ध असलेल्या ४० फुट X २० फुट क्षेत्रफळाच्या हॉलमध्ये ३४ संगणकसह अद्यावत संगणक प्रयोगशाळा विकसीत करणे गरजेचे आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रमाचे संगणक प्रशिक्षण देण्यासाठी सध्या संस्थेमध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने तीन संगणक प्रशिक्षक नियुक्त करणेत आलेले आहेत.

३४ विद्यार्थ्यांची संगणक लॅब विकसीत करणेचे दृष्टीने संस्थेने आवश्यक तो आराखडा तयार केलेला आहे व त्यासाठी येणा-या अंदाजे खर्चाची माहिती बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडून

दि.२७/०९/२००५ रोजी सध्याच्या प्रचलित डी.एस.आर. दरानुसार काढणेत आलेली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Qty. | Rate | Unit | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing & erecting in position in equired foam 4 mm thick plain A.C.Sheet or equivalent quality waterproof decorative sheet. False ceilling of approved make with teak wood frame of 1 inch X 2 inch batton suspended steel flat | 80.00 | 850/- | 2 | 68000.00 |
| 02 | Constructing 24 inch deep work top counter as free drawing in 19mm the machine ply. All inside & external exposed surface to finished with laminate of approved make | 37.50 | 600/- | Sqft. | 22500.00 |
| 03 | Providing & fixing in position anodise extruded alluminium partition having frame made out of alluminium extruded tubular section of size 65 mm X 40 mm with 12mm thick partical based with 5 mm thick float glass. | 432.00 | 165/- | Sqft. | 71280.00 |
| 04 | Providing & fixing 18 inch deep 24 inch high over head storage. | 40.00 | 600/- | Sqft. | 24000.00 |
| 05 | Aluminium Partision | 200.00 | 165/- | Sqft. | 33000.00 |
| 06 | Carpet 76 Sqm. X 250 | | | | 19000.00 |
| 07 | Computer Chair without handle Revolving | 34 | 500/- | | 17000.00 |
| 08 | Chair with writingpad | 20 | 600/- | | 12000.00 |
| 09 | Computer Table | 24 | 1500/- | | 36000.00 |
| | | | | Total | 302750.00 |
| | Add 5 % Conteng | | | | 15137.50 |
| | | | | Total | 317917.50 |

संगणक लॅबसाठी लागणारे संगणक साईभक्त देणगीदारांकडुन देणगी रुपाने उपलब्ध होऊ शकतील त्यानुसार ते उपलब्ध करता येतील. त्यामुळे लागणा-या संगणकाचा वरील खर्चामध्ये अंतर्भाव केलेला नाही.

वरीलपैकी यंशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या तसेच MS-CIT या अभ्यासक्रमा अंतर्गत संस्थेस साधारणत: वर्षास रु.२,२५,०००/-महसुल प्राप्त झाला आहे. तो अद्यावत संगणक लॅब सुविधा झालेनंतर आणखी वाढण्याची शक्यता आहे. शासनाचे दर्जानिहाय निरीक्षणामध्ये महसुल प्राप्त करण्याच्या प्रक्रियेस १५ गुण निश्चित केलेले आहेत.

वरील बाबींचा विचार करता वर उल्लेख केलेप्रमाणे संस्थेची मध्यवर्ती संगणक लॅब अद्यावत करणेकामी अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.३,२०,०००/- ( रुपये तिन लाख विस हजार मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे कामाची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करता येईल.

उपरोक्तप्रमाणे लॅबसाठी आवश्यक असणारे संगणक देणगी घेण्याबाबत तसेच मध्यवर्ती संगणक लॅब विकसीत करण्याबाबत रक्कम रु.३,२०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय/बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३४. कनिष्ठ महाविद्यालयासाठी इमारत बांधणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३५. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय शिर्डी या विद्यालयास संगणक संच (प्रिन्टर व यु.पी.एस.सह) देणगी देणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८४.** अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित, श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी, जिल्हा अहमदनगर या विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी मा.अध्यक्ष यांना संबोधीत केलेल्या संदर्भ क्रमांक ०१ चे पत्रानुसार, सध्या शाळेला कॉम्प्युटर्सची खूप गरज आहे. प्रशासकीय कामकाजासाठी आपण २/३ कॉम्प्युटर्स त्वरीत मंजूर करुन देण्यात यावेत, त्यामुळे शाळेचे कामकाज व्यवस्थित करता येईल. अशी विनंती केली आहे.

मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दिनांक २१ सप्टेंबर,२००५ रोजी विद्यालयाचे मुख्याध्यापकांशी झालेल्या समक्ष चर्चेनंतर, विद्यालयाच्या मुख्याध्यापक यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांना संबोधित केलेल्या संदर्भ क्रमांक ०२ चे पत्रानुसार, विद्यालयाच्या कार्यालयीन कामकाजासाठी एक संगणक (युपीएस व प्रिंटरसह) संच आम्हाला दिल्यास आमची हरकत नाही. तरी कृपया एक पूर्ण संगणक संच त्वरीत मिळण्यास हरकत नाही . अशी विनंती केली आहे.

उपरोक्त दोन्ही संदर्भीय पत्रास अनुसरुन, विश्वस्तव्यवस्थेमार्फत श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांना त्यांचे मागणीप्रमाणे एक संगणक संच देणगी देण्यास मान्यता मिळाल्यास, आपणांकडे

उपलब्ध असलेल्या संगणकातून प्रिंटर व युपीएससह एक संगणक संच देणगीदाखल देता येईल. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

1. Computer Set : PIII or PIV, 20 GB HDD with 14" Color Monitor
2. U.P.S. : 500va or 600va
3. Printer : 80 Col. Dot Matrix Printer (Epson LQ 300+)

उपरोक्तप्रमाणे देणगी देण्याचा निर्णय झाल्यास हे साहित्य सध्या आपणांकडे वापरात व चालू स्थितीत असलेल्या उपलब्ध साहित्यातून देता येईल.

श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांना एक संगणक संच (प्रिंटर व युपीएससह) देणगी देण्यास तसेच संगणक व इतर साहित्य देणगी दिलेनंतर त्याच्या नोंदी संबंधीत विभागाच्या जंगम मालमत्ता नोंदवहीतून कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.३६. संस्थानचे कार्यालयीन कामकाजासाठी झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८५.** श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापनाकडे कार्यालयीन कामकाजाकरीता सध्या खालील प्रमाणे झेरॉक्स मशिन्स कार्यान्वित आहेत.

०१) कोरस कंपनीचे शार्प केएस-११०१ मॉडेलचे ॲनॉलॉग झेरॉक्स मशिन.
०२) गेस्टेटनर कंपनीचे -३२२० मॉडेलचे डिजीटल फोटो कॉपीअर झेरॉक्स मशिन.
०३) मोदी कंपनीचे डीसी-४०० मॉडेलचे डिजीटल फोटो कॉपीअर झेरॉक्स मशिन.
०४) गेस्टेटनर कंपनीचे -५३२३ मॉडेलचे कॉपी प्रिंटर . ( एखाद्या पेपरच्या ३० किंवा ३० पेक्षा जास्त कॉपीज् काढण्यासाठी या मशिनचा उपयोग होतो.)

उपरोक्त पैकी अ.नं.१ चे कोरस (मॉडेल केएस १११०) कंपनीचे झेरॉक्स मशिन सन १९९० मध्ये खरेदी करणेत आलेले असून त्यावर माहे डिसेंबर २००४ अखेर ७ लाख ५० हजार झेरॉक्स प्रती काढणेत आलेल्या आहेत. सदरचे मशिन १४ वर्षापूर्वीचे असून रुपये ८०,०००/- इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आलेले होते. कोरस कंपनीने या मॉडेलच्या मशिनचे उत्पादन बंद केल्यामुळे या मशिनचा दुरुस्ती व देखभाल खर्च खूपच वाढलेला आहे. मशिनचे स्पेअर पार्ट कंपनीकडे वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे मशिन बंद स्थितीतच आहे. तसेच या कोरस झेरॉक्स मशिनचे तंत्रज्ञान ही जुने झालेले आहे. सदर कोरस कंपनीच्या मशिनचे जवळजवळ आयुष्य संपल्यातच जमा आहे.

अ.नं.२ चे गेस्टेटनर कंपनी-३२२० हे डिजीटल फोटो कॉपीअर झेरॉक्स मशिन सन १९९८ मध्ये रुपये २,४८,१६१/- इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आलेले आहे.सदर मशिन ८ वर्षापूर्वीचे असून त्यावर माहे फेब्रुवारी -२००५ अखेर ६ लाख २१ हजार झेरॉक्स प्रती काढणेत आलेल्या आहेत. हे मशिन पूर्णतः डिजीटल असून या मशिनमध्ये एन्लार्जमेंन्ट-रिडक्शन तसेच अे-३ साईज (स्टेटमेंटसाईज ) झेरॉक्स काढण्याची सोय असून या मशिनचा वेग प्रती मिनीटांस २० कॉपीज असा आहे. सदर कंपनीने या मॉडेलच्या मशिनचे उत्पादन बंद केल्यामुळे मशिनचा दुरुस्ती व देखभाल खर्च खूप वाढलेला आहे. मशिनचे स्पेअर पार्ट कंपनीकडे वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे मशिन ब-याच काळ बंद राहते.

अ.नं. ३ चे मोदी कंपनीचे डीसी-४४० हे झेरॉक्स मशिन सन २००२ रोजी रुपये- ४,७५,०००/- इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आलेले असून आज अखेर ६ लाख ४० हजार इतक्या झेरॉक्स कॉपीज झालेल्या आहेत. एकदा फोटो कॉपीअर मध्ये स्कॅनिंग केल्यावर त्याच्या एका वेळेस ९९९ कॉपीज काढता येतात. तसेच कॉपीअरमध्ये काढलेल्या झेरॉक्स प्रती ऑफसेट प्रिंटर्सवर केलेल्या प्रिंटीग प्रमाणे दिसतात.

सदरचे मशिन चांगल्या स्थितीत आहे व सध्या या एकाच मशिनवर संस्थानच्या सर्व विभागाकडील कार्यालयीन कामकाजाच्या झेरॉक्स प्रती काढल्या जात आहेत. परंतु मिटिंग विभाग, शैक्षणिक संकुल, लेखाशाखा, बांधकाम, खरेदी आदि विभागांचे कामकाज सध्या मोठया प्रमाणावर असल्याने या मशिनवर जास्त कामाचा भार पडून, हे मशिन वेळोवेळी बंद पडते. तसेच हे मशिन पुर्णतः डिजीटल स्वरुपाचे असल्याने मशिन दुरुस्त होणेसाठी नेहमी कंपनीच्या इंजिनिअर्सचीच वाट पहावी लागते. कंपनीच्या इंजिनिअर्सकडे इतर ठिकाणचे कॉल्स असल्यास, ते संस्थानला वेळेवर सर्व्हिस देऊ शकत नाहीत. सदर मशिनचे स्पेअर पार्टस् कंपनीच्या विभागीय कार्यालयातच (पुणे, नाशिक,औरंगाबाद या ठिकाणी) उपलब्ध असल्याने एखादा स्पेअरपार्ट निकामी झाल्यास, तो स्पेअरपार्ट येईपर्यन्त वाट पहावी लागते. तोपर्यन्त कार्यालयीन कामकाजाच्या झेरॉक्स प्रती काढण्यास विलंब होतो, त्यामुळे साहजिक कार्यालयीन कामकाजात व्यत्यय येऊन, विभागांमध्ये गैरसमज निर्माण होतात.

अ.नं.४ चे गेस्टेटनर कंपनीचे -५३२३ कॉपी प्रिंटर हे झेरॉक्स मशिन सन १९९५ रोजी रुपये ३,७५,०००/- इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आलेले असून आज अखेर (एप्रिल २००५ ) सदर मशिनवर २२ लाख ४० हजार इतक्या झेरॉक्स प्रती काढण्यात आलेल्या आहेत. ज्या कागदाच्या जादा

प्रती म्हणजे ०१ पानाच्या ३० पेक्षा जास्त प्रती काढावयाच्या आहेत, असेच काम या कॉपी प्रिंटरवर करणेत येते. हे कॉपी प्रिंटर एक प्रकारचे सेमीअॅटोमॅटिक असे सायक्लोस्टाईलिंग मशिन असून यावर कॉपी रिडॅक्शन करण्याची सोय आहे.

या मशिनवर मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावयाच्या विषयांच्या टिपण्या व निर्णयासंबंधीचे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती, शैक्षणिक संकुलातील तीनही संस्थांचे प्रश्नपत्रिकाच्या झेराक्स प्रती काढणे, खरेदी विभागाचे वेळोवेळी जाहीर निविदांच्या कॉपीज काढणे, श्रींचे उत्सवकाळातील कार्यालयीन कागदपत्रांच्या झेराक्स व संस्थानसंबंधीत इतर शासकीय खात्यांच्या, संस्थानसंबंधीत कामकाजाच्या कागदपत्रांच्या झेराक्स प्रती मोठया प्रमाणावर काढल्या जातात.

उपरोक्त कार्यालयीन कामकाजाकरीता, अ.नं. १ व २ हया झेरॉक्स मशिनचा वापर केला जातो. परंतु मशिन बंद पडल्यावर स्पेअर पार्ट वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे कामकाजात व्यत्यय येतो.या झेरॉक्स मशिन्सचे तंत्रज्ञान बरेच जुने झालेले असून, या तंत्रज्ञानावरील झेरॉक्स मशिन्स सध्या बाजारपेठेतून बाद झालेल्या आहेत व आपल्याकडील मशिन्सचेही आयुष्य जवळजवळ संपल्यात जमा आहे.

त्यामुळे, संस्थानचे कार्यालयीन कामकाजाचा बोजा पाहता तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दरमहा होणाऱ्या सभांचे कामकाजाचा व्याप लक्षात घेतां, (मिटिंग विभागाकरीता-०१ व संस्थान कार्यालयीन कामकाजाकरीता-०१) अशा कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढणेसाठी नामांकित कंपनीचे नवीन ०२ (दोन ) अद्ययावत असे डिजीटल झेरॉक्स मशिन्स खरेदी करणे आवश्यक आहे. सध्या बाजारात कॅनन, मोदी , कोरस, रिको इत्यादी नामांकित उत्पादक कंपन्यांचे झेरॉक्स मशिन्स उपलब्ध आहेत.

या कंपन्यांचे एक मशिनसाठी अंदाजे रुपये सहा लाख याप्रमाणे दोन झेरॉक्स मशिनसाठी अंदाजे रुपये बारा लाख मात्र इतका खर्च अपेक्षित असून नेहमीच्या विहित पध्दतीने उत्पादक कंपनी/त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून दरपत्रके/निविदा मागवून, खरेदी विभागामार्फत या झेरॉक्स मशिन्स खरेदी करता येतील.

तरी, उपरोक्तप्रमाणे अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत दोन डिजीटल झेरॉक्स मशिन्स खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये बारा लाख मात्र पर्यन्तचे खर्चास तत्वतः मान्यता मिळणेस व झेरॉक्स मशिन्सच्या उत्पादक कंपन्यांकडून/अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने निविदा/दरपत्रके मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत, कॅनन कंपनीच्या दोन डिजीटल झेरॉक्स मशिन्स, झेरॉक्स मशिन्सच्या उत्पादक कंपन्यांकडून/अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,००,०००.०० (अक्षरी रुपये बारा लाख मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-१२/अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३७. साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान इमारतीसाठी फायबर खुर्च्या खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८६. अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था समितीची मासिक सभा ही साईनिवास अतिथीगृहात घेतली जाते, मासिक सभेच्या वेळी उपस्थित राहणारे माल पुरवठा धारक तसेच कंत्राटदार व संस्थान कामकाजसाठी सभेच्यावेळी आमंत्रित केलेले असत, तसेच या वेळेस इतर मान्यवर देखील उपस्थित असतात, तसेच संस्थानचे विभाग प्रमुख व कर्मचारी सभेशी संबंधीत विषयाकरीता उपस्थित असतात. अशा वेळी अतिथिगृहाकडे फार मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येते, सध्या चौकशी व निवासस्थान विभागकडे साधारण २५० नग फायबर खुर्च्या उपलब्ध आहेत. व त्या इमारतीत रुम्स् , तसेच व्ही.आय.पी.कक्षाकडील होणरे सभेसाठी तेथे ठेवाव्या लागतात, अशा वेळेस सदर विभागाकडे असलेल्या खुर्च्या कमी पडतात. करीता साईनिवास अतिथिगृहासाठी नवीन २०० नग चांगल्या कंपनीच्या फायबर खुर्च्या निलकमल अथवा चांगल्या नामांकित कंपनीच्या खुर्च्या खरेदी करणे आवश्यक आहे. प्रति खुर्ची अंदाजे किंमत ३००.०० या प्रमाणे एकूण रक्कम रुपये ६०,०००.०० खर्च अर्पेक्षित आहे.

**ब)** साईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्यांमध्ये, उपहारगृहामध्ये व संस्थानचे विविध कार्यक्रमाकरीता फायबर खुर्च्यांचा वापर होत असतो. सदर खुर्च्या सन १९९४ पासुन भक्तनिवासस्थान साईभक्तांचे वापरात सुरु करणेत आले, त्यावेळीस प्रारंभी सन १९९४ मध्ये १२४० नग खुर्च्या व सन १९९८ मध्ये २५० नग खुर्च्या, अशा एकूण१४९० नग खुर्च्या खरेदी करण्यात आलेल्या होत्या. पैकी १०४ नग खुर्च्या इतर विभाग व रेकॉर्ड विभागाकडे असून काही नुकसान भरपाईने कमी झालेल्या आहेत. उर्वरीत १३८६ नग खुर्च्यांचा वापर जवळपास १० वर्षापासून होत असलेने, सारख्या वापरामुळे लवचीक, व झीज झालेने वापरात असतांना त्यांचे पाय फाकतात, तसेच ब-याच खुर्च्यांना चिरा

पडलेल्या आहेत. त्यामुळे रुममधील तसेच कॅन्टीनकडे असलेल्या खुर्च्यांच्या भक्तांकडून सारख्या तक्रारी येतात. सदर खुर्च्यांवर बसणे धोकादायक होत आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थानकडील प्रत्येक खोलीसाठी २ खुर्च्या याप्रमाणे एकूण५५० खोल्यांसाठी एकूण११०० नग खुर्च्या, कॅन्टीन साठी ४०० नग खुर्च्या व साईबाबा भक्तनिवासस्थान तसेच इतर ठिकाणी होणा-या कार्यक्रमांसाठी देवाण-घेवाणसाठी अंदाजे ३०० खुर्च्या अशा एकूण१८०० नग खुर्च्या नवीनभक्तनिवासस्थान विभागासाठी नव्याने खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. सदर खुर्च्या निलकमल कंपनी अथवा नामांकित कंपनीच्या खरेदी करता येतील. याकामी एका नगास अंदाजे रु.३००.०० प्रमाणे एकूणखुर्च्या नग १८०० साठी एकूणरक्कम रु.५,४०,०००.०० मात्र चा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त 'अ' व 'ब' साठी एकूण खर्च रुपये ६,००,०००.०० अक्षरी रुपये सहा लक्ष मात्र अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या फायबर खुर्च्या खरेदीकामी निलकमल कंपनीकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत. कोटेशन्स मागणी करतांना कोटेशन्समध्ये वजनाचा उल्लेख करावा. तसेच साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या खुर्च्या वेगवेगळया रंगाच्या घ्याव्यात. याकामी अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभागप्रमुख/भक्तनिवासस्थान विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय न.३८.** **संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या एका नातेवाईकास संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८७.** श्रीमती यशोदा भगवान ठाकरे (कै.भगवान दयाराम ठाकरे यांची पत्नी) यांनी, त्यांचे पतीचे संस्थान सेवेत असताना दिनांक ०६/०७/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचे कुटूबावर मोठें आर्थिक संकट कोसळले असून, उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसलेने अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत त्यांना घेणेबाबत विनंती केली आहे.

श्रीमती यशोदा भगवान ठाकरे, यांची जन्मतारीख दि.०१/०६/१९७४ आहे व त्यांचे वय 31 वर्षे असून शिक्षण इ.४ थी पास असें आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ, मंत्रालय, मुंबई-३२, दि.२८/०३/२००१ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याच्या एका पात्र नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेमध्ये घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याचे नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थानच्या नोकरीत घेण्यात येते.

या सर्व परिस्थितीचा विचार करता, श्रीमती यशोदा भगवान ठाकरे (कै.भगवान दयाराम ठाकरे यांची पत्नी) यांना, वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून, प्रस्थापित अटींनुसार (पहिल्या वर्षासाठी दरमहा रुपये २,०००/- एकत्रित नियत वेतनावर) संस्थान सेवेत घेण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही- आस्थापना प्रमुख)

**विषय नं.३९.** **श्री.गीताराम साबळे वगैरे १३ वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र. ६८८.** खालील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी नियत वेतनावर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. संस्थान नियमाप्रमाणे त्यांना पहिल्या वर्षी दरमहा प्रत्येकी रु.२०००/- एकत्रित नियतवेतन देण्यात आले असून,दुसरे वर्षी दरमहा रु.२५००/- एकत्रित नियत वेतन देण्यात येत आहे. सदरचे वर्ग-४ कर्मचा-यांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे असून त्यांचा दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी खालील तपशीलात नमूद केलेल्या तारखेअखेर संपुष्टात येत आहे.

| अ.नं | कर्मचा-याचे नांव | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपल्याची तारीख | वैद्यकिय अधिक्षिका यांचे वैद्यकियदृष्टया पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.गिताराम सो.साबळे<br>मदतनीस,चौकशी निवासस्थान | १०वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | १३/१०/२००४ |
| ०२.. | श्री. सुभाष एकनाथ रुकारे<br>मदतनीस,चौकशी निवासस्थान | ९ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | १२/१०/२००४ |
| ०३. | श्री. बबन छबू अडांगळे<br>मदतनीस,कँन्टीन विभाग | ९ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | ०३/०४/२००४ |
| ०४. | श्री.बापू बाबूराव गायके<br>मदतनीस,कॅन्टीन विभाग | १०वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | ०९/०४/२००४ |
| ०५. | श्री.प्रविण शांताराम जगताप<br>मदतनीस,प्रसादालय | १० वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | १९/१०/२००४ |
| ०६. | श्री. वेणूनाथ भाऊसाो डांगे<br>मदतनीस प्रसादालय | ११ वी पास | २१/१०/०४ | २०/१०/२००५ | २७/०६/२००५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०७. | श्री.सुनिल बाबूराव कोते<br>मदतनीस प्रसादालय | ८ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | ०७/०६/२००५ |
| ०८. | श्री.चंद्रकान्त दौलत बागुल<br>मदतनीस प्रसादालय | ९ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | १५/१०/२००५ |
| ०९. | श्री.शिवाजी बाळा आरणे<br>मदतनीस प्रसादालय | ९ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | १९/१०/२००४ |
| १०. | श्री.मुस्ताक शेखलाल शेख<br>मदतनीस प्रसादालय | २ री पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | ०४/१०/२००५ |
| ११. | श्री. गणेश तुकाराम बागुल<br>मदतनीस प्रसादालय | ६ वी पास | २१/१०/०३ | २०/१०/२००५ | २९/०९/२००५ |
| १२. | श्री. भाऊसाो.रघुनाथ अहिरे<br>मदतनीस प्रसादालय | ४ थी पास | २३/१०/०३ | २२/१०/२००५ | २९/०९/२००५ |
| १३. | श्री.शेखर विजयराव कुलकर्णी<br>मदतनीस ध्वनीक्षेपन विभाग | १०वी पास I.T.I. | ३०/१०/०३ | २९/१०/२००५ | ०६/११/२००३ |

उपरोक्त अ.नं. १ ते १३ या कर्मचा-यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असून, ते हूकमाप्रमाणे कामे करतात, ते प्रामाणिक असून त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही. असे अभिप्राय संबंधीत विभाग प्रमुख/अधिक्षक यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त अ.नं.१ तें १३ वरील कर्मचारी यांचेबाबतीत संबंधीत विभागप्रमुख/अधिक्षक व प्रशासकिय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखे (परिवीक्षाधीन कालावधी संपलेचे तारखेअखेर) पासून रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० ही वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस असाही धोरणात्मक निर्णय घेण्यात आला की, यापूर्वी संस्थानमध्ये सेंवेत असतांना शारिरिक दृष्ट्या अपात्र कर्मचाऱ्यास त्यांचेऐवजी त्यांचे वारसास संस्थान सेवेत घेण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. परंतू येथून पुढे शारिरिक दृष्ट्या अपात्र कर्मचाऱ्यास त्यांचेऐवजी त्याचे वारसास संस्थान सेवेत घेण्यात येऊ नये. तसेच वर्ग-४ चे पदांवर कर्मचाऱ्यांना नेमणूका देतांना त्यांना द्यावयाचे परिविक्षाधीन कालावधीबाबत तसेच नेमणूका देतांना त्यांना द्यावयाचे नियत वेतनाबाबत संस्थान कायदे सल्लागार श्री अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४०. कर्मचारी अनुशेष रोस्टरपध्दतीचे अंमलबजावणीसाठी कंत्राटी अनुभवी "सल्लागार" नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र. ६८९.** श्री साईबाबा संस्थाान ही धर्मादाय नोंदणीकृत संस्था असून बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० नूसार ई-६९, १९५२ अहमदनगर हा संस्थेचा नोंदणी क्रमांक आहे. श्रीं च्या दर्शनासाठी जगभरातून दैनंदिन हजारो साईभक्त शिरडीस येतात. श्री साईभक्तांना दर्शन,प्रसादभोजन,निवास इत्यादी सर्वांगीण सुविधा पुरविणेसाठी एकूण ३० विभाग कार्यरत आहेत. संस्थान आस्थापनेवर सध्या एकूण १०३५ कायम कर्मचारी सेवेत आहेत.

महाराष्ट्र शासनाने ऑगष्ट २००४ साली संस्थानसाठी नवीन कायदा केला असून दि०१/०९/२००४ पासून संस्थानचा कारभार शासनाचे विधी व न्यायविभागाचे अधिपत्याखाली सुरु झालेला आहे. सन २००४ मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागास व इतर मागास वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणे बाबत आदेशीत केलेले आहे. व कार्यवाहीच्या सुचना दिलेल्या आहेत. श्री साईबाबा संस्थान हे विनाअनुदान तत्वावर चालू असलेली धर्मादाय संस्था असल्याने याआधी संस्थानला मागासवर्गीय अनुशेष लागू केलेला नव्हता. परिणामी आतापर्यंत मागासवर्गीयांच्याबाबत स्वतंत्र रेकॉर्ड ठेवण्यात आलेले नाही.

आता,संस्थानसाठी शासनाने मागासवर्गीयांचे आरक्षणाबाबत अधिनियम केलेला असून नियमातील तरतूदीनुसार मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेऊनच संस्थानसेवेत कर्मचा-यांच्या नेमणूका करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शासकिय कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या रेकॉर्ड प्रमाणे बिंदू नियमावलीनुसार सरळसेवा व पदोन्नतीबाबतची कार्यवाही करणे आहे. तत्संबधी शासकिय विहीत नमुन्यात कार्यालयीन रेकॉर्ड तयार करणे आहे. व या कारणासाठी अनुभवी व माहीतगार कर्मचारी आस्थापनेकडे असणे आवश्यक आहे.

विधी विभागाकडील कामाची व्याप्ती विचारात घेऊन नायब तहसीलदार पदावर सेवानिवृत्त झालेल्या तीन उमेद्वारांना सल्लागार म्हणून दरमहा रु.७०००/-एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणेच,महसूल अथवा शासनाचे अन्य विभागातून निवृत्त झालेल्या व आरक्षण विषयक परिपूर्ण माहिती असलेल्या व्यक्तीकडून मागास वर्गीयांचे अनुशेषाबाबत कार्यालयीन रेकॉर्ड तयार करुन घेणे आवश्यक आहे.

तरी याकामी अनुभवी सल्लागार कंत्राटी पध्दतीने दरमहा रु.७०००/- एकत्रित मानधनावर तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. शासन सेवेतील समाजकल्याण विभागाकडील किंवा संबंधित विषयाची माहिती असलेला अधिकारी एक वर्षासाठी घेण्यात यावा. याबाबत मा.समिती सदस्य श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पा.यांना माहिती घेऊन नाव सुचविणेबाबत केलेली विनंती त्यांनी मान्य केली. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.४१. संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक आदेशात दुरुस्ती होणेबाबत.**

**निर्णय क्र. ६९०.** श्री.रमेशचंद्र ठोळे.ॲडव्होकेट कोपरगांव यांनी त्यांचे दि.२४/०९/२००५ रोजीचे पत्राने संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती केलेली होती. त्यांनुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२८ (०६) अन्वये त्यांचे संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करण्यात आलेली असून तसे पत्र त्यांना पाठविण्यात आलेले आहे. सदरचे नेमणूकीबाबत पत्र त्यांना मिळालेले असून त्यांनी संस्थान व्यवस्थापन समितीचे आभार मानलेले आहेत.

तसेच त्यांनी "मी सन १९७८ पासून वकील म्हणून प्रॅक्टीस करीत आहे व एक सिनिअर ॲडव्होकेट आहे. परंतु माझ्या नेमणुकीत फक्त कोपरगांव कोर्ट असे नमूद केले आहे.तरी मला राहाता कोट, कोपरगांव सिनीयर डिव्हीजन व डिस्ट्रिक्ट कोर्ट तसेच लेबर कोर्ट तसेच आपण सोपवाल त्या कोर्टात काम करणे,कायदेशीर मदत करणेस तसेच बाहेरगांवी औरंगाबाद हायकोर्ट इ. ठिकाणी काम करणेची इच्छा आहे. मी आतापर्यंत प्रामाणिकपणे कोर्टात कामे केली आहेत व करीत आहे. मला या निमित्ताने श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी मिळणार आहे. तरी मला राहाता ज्युनिअर डिव्हीजन कोपरगांव सिनियर डिव्हीजन कोर्ट व डिस्ट्रीक्ट कोर्ट तसेच लेबर कोर्ट इ. ठिकाणी संस्थानचे वतीने काम करण्याची संधी मिळावी " अशी विनंती केलेली असून त्यावर मा.विश्वस्त श्री.अशोक खांबेकर सो। यांनी "श्री.ठोळे हे जेष्ठ वकील आहेत त्यांना कोपरगांव कोर्टा व्यतिरीक्त उपरोक्त राहाता कोर्ट ज्युनिअर डिव्हीजन कोपरगांव सिनीयर डिव्हीजन कोर्ट व डिस्ट्रिक्ट कोर्ट तसेच लेबर कोर्ट इ.ठिकाणी काम करण्याची इच्छा आहे. कृपया तशी दुरुस्ती व्हावी मानद सेवी (मानधन) काम करण्यास तयार आहेत. "असे अभिप्राय दिले आहेत.

तरी उपरोक्त श्री.ठोळे ॲडव्होकेट यांनी केलेली विनंती व मा.व्यवस्थापन समितीचे मा.सदस्य श्री. खांबेकर यांचे अभिप्रायाप्रमाणे दुरुस्ती होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४२. कार्यकारी संपादक साईलीला यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र. ६९१.** श्री. विद्याधर ताठे, पत्रकार पुणे यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/१५४९२/९५ दि.०४/१२/१९९५ चे नेमणूक पत्राने श्री साईलीला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादक या पदावर कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर प्रथमतः एक वर्षासाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यापुढे वेळोवेळी कंत्राटी सेवेची मुदतवाढ करण्यात आलेली आहे. दि.३०/०९/२००५ अखेर सदरची मूदतसंपुष्ठात आलेली आहे.

श्री साईलीला या द्वैमासिकाचे कामकाज यापुढे शिरडी कार्यालयातून चालणार असल्यामुळे काही अडचणीमुळे दि.३०/०९/२००५ नंतर कार्यकारी संपादक म्हणून काम करणे शक्य होणार नसलेबाबत श्री ताठे यांनी दि.२६/०८/२००५ रोजीचे पत्राने कळविले होते. त्यानुसार कार्यकारी संपादक या पदावर अन्य उमेदवाराची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्दीस देणेबाबत मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०९/२००५ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर केला होता. तथापि याच दरम्यान शिरडी येथे श्री साईलीलाचे संपादक म्हणून यापुढेही काम पहाण्यास तयार असलेबाबत श्री.ताठे यांनी दि.२७/०९/२००५ रोजी फोनवरुन खुलासा केला होता. त्यापुढे श्री. ताठे यांनी तसे लेखीही लिहून दिलेले आहे.

श्री.ताठे यांनी सादर केलेल्या अर्जामध्ये आठवडयातील ३ दिवस ते श्री साईलीलाचे काम मुंबई येथे करीत आहेत. आता, नवीन रचनेत साईलीला कार्यालय शिरडी येथे स्थलांतरीत होत आहे परंतु छपाई मात्र मुंबई येथेच होणार आहे. त्यामुळे कार्यकारी संपादक म्हणून शिरडीपेक्षा मुंबईत अधिक वेळ द्यावा लागणार आहे. त्यादृष्टीने मुंबई येथे आठवडयातील दोन दिवस व शिरडी येथे एक दिवस हे काम करता येईल. त्यासाठी सध्याच्या प्रचलीत पध्दतीप्रमाणे त्यांना पुणे-मुंबई प्रथम वर्गाचे रेल्वे पासासह पुणे शिरडी प्रवासाचा खर्च मिळावा. तसेच गेल्या तीन वर्षात त्यांचे मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली नसल्याने मानधनात वाढ करुन मिळावी. अशी मागणी केलेली आहे.

श्री ताठे यांना गेल्या अडीच वर्षापासून ,प्रतिमहा रु.७०००/- एवढे मानधन व पुणे मुंबई येणे-जाणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या पासखर्चासह आठवडयातून किमान तीन दिवस काम करण्याचे

अटीवर नेमणूक देण्यात आलेली आहे.आता त्यांचे मानधनवाढीच्या विनंतीचा विचार केल्यास, सध्याचे महागाईचे मानाने त्यांना प्रतिमहा रु.७०००/- ऐवजी रु.८०००/- एवढी वाढ करावी. तसेच साईलिला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिर्डी येथे स्थलांतरीत होत असल्यामुळे व साईलिला अंकाची छपाई मात्र मुंबई येथूनच होणार असल्याने,सदर कामासाठी पुणे ते मुंबई येथे जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे पास खर्चासह, आठवडयातून किमान दोन दिवस मुंबई कार्यालयात काम करण्याचे व शिर्डी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडयाचे खर्चासह आठवडयातील एक दिवस शिर्डी कार्यालयात काम करण्याचे अटीवर श्री ताठे यांची पुढील एक वर्षासाठी मूदत वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. दिनांक २८. १०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक सभेचे इतिवृत्त..**

**निर्णय क्र.६९२.** दिनांक २८.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे स्थानिक सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, ते सोबत परिशिष्ट "ब" म्हणून ठेवण्यात आले होते, त्याची नोंद घेण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. सन २००५-०६ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांचे नेमणूकी बाबत.**

**निर्णय क्र.६९३(अ)** महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२३ ऑगष्ट, २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी), अधिनियम-२००४ हा कायदा अस्तित्वात आला असून, या कायद्यातील कलम नं. ५ पोटकलम १ व २ अन्वये संस्थानचे व्यवस्थापन शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीकडून सुरु आहे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २९ (१) व (२) मध्ये वार्षिक अहवालाबाबत व लेखापरिक्षणाबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे. पोट कलम (१) समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा-खर्चाचा तपशील दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षकाचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणा-या संस्थांची (संपूर्ण पत्त्यासह) तपशीलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम यांबाबतची माहिती सोबत जोडलेला छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्यशासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील.

पोट कलम (२) राज्य शासन, पोट कलम (१) खाली प्राप्त झालेली अहवालाची प्रत, ती प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवील आणि त्याची प्रत किंवा त्यामधील कोणतेही उतारे, त्यांची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला, समिती निर्धारित करील अशी वाजवी फी किंवा आकार प्रदान केल्यावर, विश्वस्तव्यवस्थेकडून दिले जातील.

तसेच लेखापरिक्षकांचे नियुक्तीबाबत अधिनियम-२००४ मधील कलम १७(२)(ग) मध्ये मा.व्यवस्थापन समितीने करावयाच्या कार्यवाहीविषयी पुढीलप्रमाणे तरतूद आहे, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशेबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील.

**(ब)** उपरोक्त तरतुदींन्वये सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल दि.३० जून, २००६ पूर्वी तयार होणे बंधनकारक असल्याने, या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८ सप्टेंबर, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५४५ अन्वये मे.एस.आर. बाटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स, नवी दिल्ली यांची नेमणूक करणेबाबत ठरविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने संस्थान जा.नं.एसएसएस/वशी/लेखा/१०४०४/ ०५ दि.१९ सप्टेंबर, २००५ चे पत्रान्वये मे.एस.आर. बाटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स, नवी दिल्ली यांना संस्थान कामकाजाच्या पाहणीसाठी शिर्डी येथे प्रत्यक्ष भेट देणेस, लेखापरिक्षण कामकाजाची फी व इतर शर्ती/अटी, तसेच या कामी संमती कळविणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी दि.२६ सप्टेंबर, २००५ चे पत्रान्वये सदर नेमणूकीसाठी संमती कळविली असून, याकामी ते कोणत्याही प्रकारची फी आकारणी करणार नसून, फक्त प्रवास भाडे व प्रत्यक्ष होणा-या खर्चाची प्रतिपूर्ती (Out of Pocket Expenses) संस्थानकडून करण्यात यावी, असे कळविले आहे.

तरी वरील अटीवर मे.एस.आर. बाटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स, नवी दिल्ली यांची सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव राज्य

शासनाकडे पाठविणेस व त्यास मान्यता प्राप्त झाल्यास तातडीने लेखापरिक्षणासंबंधीत कामकाज सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एस.आर.बाटलीबॉय ॲण्ड असोसिएटस्, नवी दिल्ली यांची सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करणेस व शासन मान्यतेसाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी सक्षम संस्थांची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९४. (अ)** सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८ सप्टेंबर, २००५ रोजीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.५४५ अन्वये, सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी पुढीलप्रमाणे नेमणूका करण्याचे ठरले आहे.

अ. वैधानिक लेखापरिक्षक (Statutory Auditor)
मे.बाटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स (ए.एन.वाय.), दिल्ली

ब. व्यवस्थापकीय लेखापरिक्षक (Management Auditor)
मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, पुणे

क. अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor)

१. मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, पुणे
२. श्री.ए.जी.लोंगाणी, कोपरगांव
३. श्री.शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी, मुंबई
४. मे.अनिल कोल्हे, नाशिक
५. श्री.गिरीश घैसास ॲण्ड कंपनी, अहमदनगर

उपरोक्त पैकी "ब" व "क" या संस्थांना, गटप्रमुख-वरिष्ठ लेखापरिक्षक यांचेकरीता रु.४००/- प्रति मनुष्यदिन व कनिष्ठ लेखापरिक्षक (आर्टिकलशीप करणारे प्रशिक्षणार्थी) यांचेकरीता रु.२००/- प्रति मनुष्यदिन, या दराने मानधन देण्यात यावे. जाणे-येणेकामी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी. तसेच लेखापरिक्षणाच्या कालावधीत त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था, संस्थान निवासस्थान व प्रसादालयात मोफत करण्यात यावी, आणि प्रत्येक कामकाजासाठी मनुष्यदिन (Mandays) निश्चित करुन देण्यात यावेत, असेही ठरले आहे.

त्या अनुषंगाने, उपरोक्त एकूण ०७ संस्थांना लेखापरिक्षण कामकाजाच्या नियुक्तीसाठी संमती कळविणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. पैकी व्यवस्थापकीय लेखापरिक्षक मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, पुणे हे वगळता, इतर सर्वच संस्थांचे संमतीपत्रे प्राप्त झालेली आहेत.

तद्नंतर दि.०२ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार पुढीलप्रमाणे आणखी दोन संस्थांची, अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजासाठी नियुक्ती करणेबाबत निर्णय झालेला आहे.

०१. बी.जी.गायकवाड ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, अहमदनगर
०२. पी.आर.भंडारी ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव

परंतु, तद्नंतर आणखी काही संस्थांचे अर्ज प्राप्त झाले असून, त्यांची नांवे अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्तीसाठीच्या यादीमध्ये समाविष्ट करणेबाबत मा.सदस्यांकडून कळविण्यात आले आहे. त्याची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे:-

| अ.नं. | संस्थेचे नांव | शिफारस करणाऱ्या मा.विश्वस्तांचे / अधिका-याचे नांव |
|---|---|---|
| ०१. | पाटील हिरण जाजू ॲण्ड कंपनी, नाशिक | मा.अध्यक्ष |
| ०२. | खर्डे-सदावर्ते ॲण्ड कंपनी, कोल्हार | मा.उपाध्यक्ष |
| ०३. | श्री.दत्ता बी खेमनार, कोपरगांव | मा.कार्यकारी अधिकारी |

उपरोक्त दोन्ही सभेतील निर्णयांचा, तसेच निर्णय झाल्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करता, सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण कामकाजासाठी पुढीलप्रमाणे एकूण १२ संस्थांची नांवे नियुक्तीसाठी सुचविण्यात आलेली असून, त्यापैकी एकट्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी एकूण १० संस्थांची नावे सुचविण्यात आलेली आहेत.

| अ.नं. | संस्थेचे नांव | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|
| ०१ | मे.बाटलीबॉय ॲण्ड असोसिएट्स, नवी दिल्ली | वैधानिक लेखापरिक्षण |
| ०२ | मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, पुणे | व्यवस्थापकीय लेखापरिक्षण |
| ०३ | शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, पुणे | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ०४ | ए.जी.लोंगाणी, कोपरगांव | अंतर्गत लेखापरिक्षण |

| | | |
|---|---|---|
| ०५ | शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी, मुंबई | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ०६ | अनिल कोल्हे, नाशिक | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ०७ | गिरीश घैसास ॲण्ड कंपनी, अहमदनगर | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ०८ | बी.जी.गायकवाड ॲण्ड कंपनी, अहमदनगर | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ०९ | पी.आर.भंडारी ॲण्ड असोसिएटस्, कोपरगांव | अंतर्गत लेखापरिक्षण |
| १० | पाटील हिरण जाजू ॲण्ड कंपनी, नाशिक | अंतर्गत लेखापरिक्षण |
| ११ | खर्डे-सदावर्ते ॲण्ड कंपनी, कोल्हार | अंतर्गत लेखापरिक्षण |
| १२ | श्री.दत्ता बी. खेमनार, कोपरगांव | अंतर्गत लेखापरिक्षण |

**(ब)** ०१) व्यवस्थापकीय लेखापरिक्षकाच्या नियुक्तीसाठी अ.नं.०२ यांचे नाव सुचविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी/लेखा/१०४९४/०५ दि.२१ सप्टेंबर, २००५ अन्वये संमती कळविणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. परंतु अद्याप त्यांचेकडून संमतीपत्र प्राप्त झालेले नाही.

०२) अंतर्गत लेखापरिक्षकाच्या नियुक्तीसाठी अ.नं.०३ ते १२ असे एकूण १० संस्थांची नांवे सुचविण्यात आलेली आहेत. परंतु सदरील कामकाजासाठी १० संस्थांची नियुक्ती खूपच जास्त वाटत असून, लेखापरिक्षण कामकाजात अडचणी येऊन क्लिष्टता निर्माण होईल. त्यासाठी अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी १० संस्थांऐवजी, संस्थानच्या कामकाजाची माहिती असलेल्या, फक्त ०२ सक्षम संस्थांची नियुक्ती करण्यात यावी, असे मत आहे. उर्वरित संस्थाचा पुढील वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या नेमणूकीचे वेळी विचार करता येईल.

अंतर्गत लेखापरिक्षणासाठी दोन सक्षम संस्थांची नियुक्ती केल्यास, संस्थानमधील सर्व विभागांची पुढीलप्रमाणे दोन भागात विभागणी करुन, नियुक्त केलेल्या ०२ संस्थांकडे अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम सोपविता येतील, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| विभागाचे नांव (भाग-१) | | विभागाचे नांव (भाग-२) | |
|---|---|---|---|
| ०१. | रुग्णालय विभाग | ०१. | बांधकाम |
| ०२. | लेखाशाखा | ०२. | विद्युत विभाग |
| ०३. | कॅन्टीन विभाग | ०३. | प्रशासन शाखा |
| ०४. | वाहन विभाग | ०४. | पाणी पुरवठा |
| ०५. | स्वच्छता विभाग | ०५. | शैक्षणिक संकुल |
| ०६. | रेकॉर्ड विभाग | ०६. | प्रकाशने |
| ०७. | मुंबई कार्यालय | ०७. | प्रसादालय विभाग |
| ०८. | ध्वनिक्षेपण | ०८. | खरेदी विभाग |
| ०९. | माहिती तंत्रज्ञान | ०९. | भांडार विभाग |
| १०. | चौकशी विभाग | १०. | मंदीर/नैवेद्य |
| ११. | धर्मशाळा | ११. | संरक्षण |
| १२. | नवीन भक्त निवास | १२. | बगीचा |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएटस् पुणे व ए.जी.लोंगाणी, कोपरगांव यांची नियुक्ती करण्यात यावी. असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. श्री एन.साईबाबा, सिकंदराबाद यांच्या विनामूल्य लेखाविषयक सेवा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६९५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. आयकर अधिनियमाअंतर्गत ३५ एसी च्या प्रकल्प अहवालातील रकमेत वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.६९६.** आयकर अधिनियमाअंतर्गत ३५ एसी चा प्रकल्प अहवाल दिनांक ९ मे २००५ रोजी Hon. Secretary, National Committee for Promotion of Social and Economical Welfare department of Revenue Ministry of Finance Government of India, North Block, New Delhi- 110001 यांना सादर केला आहे. या प्रकल्प अहवालामध्ये एकूण प्रकल्पाची रक्कम रुपये ८०.२५ कोटी दाखविण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत देणगीदार भक्तांचा मोठा प्रतिसाद विचारात घेता ही रक्कम सदर प्रकल्पासाठी कमी पडत आहे. सदर प्रकल्प अहवालावर मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दिनांक ४ नोव्हेंबर २००५ रोजी प्रकल्प अहवालाचा पाठपुरावा करण्यासाठी नेमणूक केलेले मानद सल्लागार श्री अभय शास्त्री, पुणे यांचेशी मा.कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा केली असता या प्रकल्प अहवालात जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या बाकांचा खर्च विचारात घेऊन प्रकल्प अहवालात सुधारित रक्कम रुपये ११४.९६ कोटी करण्यात यावी जेणे करुन या प्रकल्प अहवालाअंतर्गत जास्तीत जास्त देणगीदार साईभक्तांचा समावेश त्यांना आयकर अधिनियम ३५ एसी

अंतर्गत १०० टक्के सूट मिळू शकेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. श्री.लढ्ढा शिवराम भिकचंद, रा.पिंपळवाडी, श्री.बुरुगंले खंडु सयाजी, रा.अंभोरे, श्री.वाघ ज्ञानदेव मोहीनीराज, वाघाचा आखाडा, राहूरी, श्री.पिंपळे विलास विनायक, रा.राळेगण (म्हसोबा), श्री.भोर नामदेव दादाभाऊ, रा.अहमदनगर, श्रीमती प्रमिलाबाई दिगंबर तांबट, कोपरगांव यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज.**

**निर्णय क्र.६९७.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. मशिनरी /उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६९८.** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे मशिनरी / उपकरणे / सर्जिकल इन्स्टुमेंट इत्यादीसाठी अंदाजे रु. १,५१,९०,०००/- चे खर्चास व खरेदीस तसेच सदरची खरेदी ही वर्तमान पत्रात जाहीरात देवून निविदा मागविण्यास मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/१०/२००५ चे सभेत निर्णय क्रमांक ६१४ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार दि. ०४/१०/२००५ चे मंजुर टिपणीन्वये सदरचे खरेदीकामी दैनिक सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दैनिक सामना, टाईम्स ऑफ इंडिया व इंडियन एक्सप्रेस, मुंबई आवृत्तीमध्ये जाहीरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मूदतदि. १७/१०/२००५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिर्डी कार्यालय मिळून एकंदर ३२ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. मुंबई येथे एकूण१९ निविदांची विक्री झालेली आहे व १८ प्राप्त झालेल्या आहेत. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे. युनिक डायग्नोस्टीक ॲन्ड सायंटीफिक, मुंबई | १० | मे. इमरजन्ट मेडीटेक इं.प्रा.लि.,मुंबई |
| ०२ | मे. ॲनालॅटीकल ॲटोमेशन, मुंबई | ११ | मे. व्हॅसक्युलर कनसेप्ट प्रा.लि.,मुंबई |
| ०३ | मे. रेसकेअर मेडी. इं.प्रा.लि., मुंबई | १२ | मे. इलाईट हेल्थकेअर इं. प्रा. लि., नवी दिल्ली |
| ०४ | मे. फ्रेसेनीयस काबी इं. प्रा. लि., पुणे | १३ | मे. बायोमेडीकॉन सिस्टीम इं.प्रा.लि, मुंबई |
| ०५ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई | १४ | मे. पराग एन्टरप्रायजेस, मुंबई |
| ०६ | मे. चिमको बायोमेडीकल इंजि.,मुंबई | १५ | मे. आर्क डायग्नोस्टीक प्रा. लि., मुंबई |
| ०७ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई | १६ | मे. ॲस्टर बायोलॉजीकल्स, मुंबई |
| ०८ | मे. ए.जी. डायग्नोस्टीक, सिकंदराबाद | १७ | मे. इमको मेडीटेक, मुंबई |
| ०९ | मे. जनक हेल्थकेअर प्रा.लि.मुंबई | १८ | मे. प्रेसीशियस सर्जिकल कं.,मुंबई |

वरीलपैकी अ.नं.१८ मे. प्रेसीशियस सर्जिकल कं., मुंबई यांनी त्यांचेकडे असलेल्या सर्व प्रकारच्या इन्स्टुमेंटची दर पत्रक पाठविलेले आहे. त्यांनी आपले जाहीरातीस अनुसरुन निविदा भरलेली नाही. त्यांचे दरपत्रक हे प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळालेले आहे.

सदरच्या १७ बंद निविदा ह्या स्थानिक विश्वस्त सभा दि. २८.१०.२००५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेस सादर करणेत आला होता. सदर तक्त्यामधील -

**(अ)** सिरींज पंप / इन्फ्युजन पंप यासाठी चार निविदाधारकांनी दर दिलेले आहे. **(ब)** लॅप्रोस्कोपसाठी मे. चिमको, मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. **(क)** कार्डियाक ऑपरेशन टेबलसाठी फक्त एकच निविदाधारक मे. जनक हेल्थ केअर कंपनी, मुंबई यांचीच निविदा प्राप्त झालेली आहे. मे.जनक हेल्थ केअर कंपनी, मुंबई यांनी त्यांचे यापुर्वीचे दरपत्रक दि.२१.०९.२००५ मध्ये ३४५००/- युरो इतकी किंमत देऊ केली होती. मा. विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दि.२१.०९.२००५ चे दरपत्रकावर त्यांचेशी केलेल्या चर्चा / वाटाघाटीनंतर ८% सूट देऊ केलेली होती. त्यानंतर सदर टेबल ची किंमत ३३५००/- युरो इतकी होते. यासाठी संस्थानला त्यांना L/C व्दारे पेमेंट करावे लागेल. **(ड)** एअर व वॉटर बेड व सिलेंडर्स यासाठी कोणाचीही निविदा प्राप्त झालेली नाही. **(इ)** सेल कांउटर मशिन यासाठी पाच निविदाधारकांनी दर दिलेले आहते. **(फ)** सर्जिकल इन्स्टुमेंट संबंधी तुलनात्मक तक्ता तयार करण्याचे काम चालू आहे.

तथापि, कार्डियाक ऑपरेशन टेबलची एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे मे.जनक मॅन्युफॅक्चरींग हेल्थकेअर कं.,मुंबई यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ चे सभेपुढे बोलवण्यात येत आहे.

इन्फ्युजन पंप व सेल कांउटर मशिनसाठी प्राप्त झालेल्या निविदा सादरकर्त्यांना चर्चा / वाटाघाटीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ चे सभेपुढे बोलविण्यात यावे असे नम्र मत आहे.

सर्जीकल इन्स्ट्रुमेंटसाठी देखील निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तथापि, अद्याप आपणाकडे संबंधीत तज्ञ डॉक्टर कामावर रुजू झालेले नाही. ते कामावर रुजू झालेवर त्यांची सविस्तर मागणी घेउन त्यांचेशी विचार विनिमय करुन नंतरच त्याबाबत खरेदीबाबतचा प्रस्ताव ठेवता येईल. असा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर चर्चा होवून व्यवस्थापन समितीने मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी व मा. डॉ. ए. भा. गोंदकर यांना नियुक्त करुन आलेल्या निविदासादरकर्त्यांशी चर्चा / वाटाघाटी कराव्यात असे ठरले.

त्यानुसार आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी एकूण१० निविदाधारक उपस्थित होते.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई |
| ०२ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई |
| ०३ | मे. इमको मेडीटेक, मुंबई |
| ०४ | मे. चिमको बायोमेडीकल इंजि.,मुंबई |
| ०५ | मे. जनक हेल्थकेअर प्रा.लि.मुंबई |
| ०६ | मे. ॲस्टर बायोलॉजीकल्स, मुंबई |
| ०७ | मे. आर्क डायग्नोस्टीक प्रा. लि., मुंबई |
| ०८ | मे. ॲनालॅटीकल ॲटोमेशन, मुंबई |
| ०९ | मे. युनिक डायग्नोस्टीक ॲन्ड सायंटीफिक, मुंबई |
| १० | मे. ए.जी. डायग्नोस्टीक, सिकंदराबाद |

वरील पुरवठाधारकांशी खालील मशिनरी/उपकरणे खरेदीबाबत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या.

**अ) १) सिरींज पंप -**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. फ्रेसेनीयस काबी लि., पुणे | रु. ६७६०३.१५ | रु. ६७६०३.१५ | अनुपस्थित |
| २ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई<br>Model SP 500 | 118000 YEN App. Price in<br>Rs. 46610.00 | 108900 YEN App. Price in<br>Rs. 43000.00 | Custom Duty 5.1% Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| ३ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई<br>Model Perfusor Compact | Rs. 42500.00 | Rs. 40500.00 | 12.5% VAT Extra |
| ४ | मे. इमको मेडीटेक, मुंबई<br>Model Infusor 850 | Rs. 35887.50 | Rs. 29000.00 | 10% CST 1 Year Additional Warranty |

**अ) २) इन्फ्युजन पंप -**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. फ्रेसेनीयस काबी लि., पुणे | Not Quoted | Not Quoted | अनुपस्थित |
| २ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई<br>Model O.T. 701 | 158000 YEN App. Price in<br>Rs. 62410.00 | 144300 YEN App. Price in<br>Rs. 57000.00 | Custom Duty 5.1% Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| ३ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई<br>Model Infomat P | Rs. 58000.00 | Rs. 56000.00 | 12.5% VAT Extra |
| ४ | मे. इमको मेडीटेक, मुंबई<br>Model Infusor 950 | Rs. 40837.50 | Rs. 33000.00 | 10% CST 1 Year Additional Warranty |

वरील उत्पादक कंपन्यांनी इतर रुग्णालयात केलेला पुरवठा तसेच सदर कंपन्याच्या मालाचा दर्जा, वापरल्याचा अनुभव व विक्रीनंतरची सेवा इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन निम्नत्तम दर न स्विकारता नामांकित कंपन्यांकडून खरेदी करण्यात यावी तसेच दोन प्रकारचे आय.सी.यू., कॅथलॅब, ओ.टी. वॉर्ड, शस्त्रक्रिया विभाग इत्यादींसाठी मूळ मागणी २० ऐवजी ४० करण्यात यावी. त्यानुसार खालीलप्रमाणे पुरवठा आदेश विभागून देण्यात यावा, असे ठरले.

**अ) १) सिरींज पंप -**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | नग | किंमत प्रती नग |
|---|---|---|---|
| १ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई | १० | 108900 YEN App. Price in Rs. 43000.00 + |

| | | | |
|---|---|---|---|
| | Model SP 500 | | Custom Duty 5.1% Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| २ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई<br>Model Perfusor Compact | १० | Rs. 40500.00 + 12.5 % VAT |

**अ) २) इन्फयुजन पंप -**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | नग | किंमत प्रती नग |
|---|---|---|---|
| १ | मे. अलवीन लाईफकेअर, मुंबई<br>Model SP 500 | १० | 144300 YEN App. Price in Rs. 57000.00 + Custom Duty 5.1% Clearance Charges 1% is Extra payment through L/C |
| २ | मे. बी.ब्रॉन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई<br>Model Infomat P | १० | Rs. 56000.00 + 12.5 % VAT |

**ब) लॅप्रोस्कोप सेट - १ नग**

याकामी मे. चिमको बायोमेडीकल इंजिनिअरींग कं., मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. त्यांनी कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे दर दिलेले असून त्याची किंमत त्यांनी निविदेमध्ये रु. २१,३५,२६६/- इतकी दिलेली होती. त्यांना दि. ०५/११/२००५ चे (आजचे) मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. चर्चा / वाटाघाटीनंतर त्यांनी सदरचा सेट हा पुर्णांकित एकूण रु. २०,००,०००/- (अक्षरी वीस लाख मात्र) इतक्या रुपयात देऊ केला आहे. मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी हया कंपनीचे इन्स्ट्रुमेंट ही आपल्याकडे असून ती नामांकित कंपनीची आहे आतापर्यंत ती समाधानकारकपणे काम देत असून त्यांची विक्रीनंतरची सेवा देखील चांगली आहे. त्यामुळे सदर लॅप्रोस्कोप सेटसाठी आलेली एकमेव निविदा स्वीकारण्यात येवून त्यांना १ सेटचा पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.

**क) कार्डियाक ऑपरेशन टेबल - १ नग**

कार्डियाक ऑपरेशन टेबलसाठी मे. जनक हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार त्यांना दि. ०५/११/२००५ चे (आजचे) मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यांनी मॅक्वेट या जर्मन कंपनीचे मॉडेल ११३१.१२ PO या टेबलचे दर दिलेले आहेत. निविदेमध्ये त्यांनी त्यांचे दर युरोमध्ये ३३५००/- इतके दिलेले होते. त्याची भारतीय किंमत रुपयात प्रती युरो ५५/- प्रमाणे अंदाजे रु. १८,१५,०००/- इतकी होते. वाटाघाटीनंतर ३३,०००.०० युरो या किंमतीस खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. याशिवाय संस्थानला कस्टम डयुटी, क्लियरन्स चार्जेस इत्यादी वेगळे अदा करावे लागणार आहेत. यावर सविस्तर चर्चा होवून, मे. मॅक्वेट कंपनीचा कार्डियाक ऑपरेशन टेबल हा उत्कृष्ट दर्जाचा आहे. मुंबईमध्ये बऱ्याचशा नामांकित रुग्णालयात सदरचा टेबल असून तो समाधानकारक काम देत आहे असे मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी सभेपुढे सांगितले तसेच याकामी एकमेव निविदा प्राप्त झालेली असल्याने ती स्विकारण्यात यावी असे ठरले. मे. जनक हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई यांना टेबलचे पेमेंट हे L/C व्दारे युरोमध्ये करण्यात येवून कस्टम डयूटी, क्लियरन्स चार्जेस इत्यादी वेगळे अदा करण्यात यावेत, असे ठरले.

**ड) एअर बेड, वॉटर बेड, ऑक्सिजन, नायट्रस सिलेंडर्स -**

याकामी कोणाचीच निविदा प्राप्त न झाल्याने उप्तादक कंपन्या/अधिकृत विकेते यांचेशी थेट संपर्क साधून त्यांचेकडून दरपत्रके मागवून, मालाची पाहणी करुन, त्यानुसार विश्वस्तांचे संमतीने खरेदी करावी, असे ठरले.

**इ) सेल काऊंटर मशिन -** याकामी एकूण पाच निविदा प्राप्त झालेल्या असून त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे (सर्व दर हे जुन्या मशिनची किंमत (Buyback) वजा करुन आहे).

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अस्टर बायोलॉजिकल्स, मुंबई | Rs. 430312.00 | Rs. 430312.00 | मॉडेल BC 1800 |
| २ | मे. आर्क डायग्नोस्टीक, मुंबई | Rs. 388125.00 | Rs. 341000.00 | मॉडेल Abacus Junior सर्व कर व डयुटींसहीत |
| | मे. आर्क डायग्नोस्टीक, मुंबई | Rs. 427500.00 | Rs. 382000.00 | मॉडेल Abacus सर्व कर व डयुटीसह |
| ३ | मे. ॲनालॅटीकल ऑटोमेशन, मुंबई | Rs. 400000.00 | Rs. 400000.00 | मॉडेल Mythic 18 Rs. 50000.00 मोफत केमीकलसह |
| ४ | मे. युनिक डायग्नोस्टीक, मुंबई | Rs. 500000.00 | Rs. 485000.00 + Rs. 10000.00 चे केमीकल मोफत | मॉडेल Act Diff 2 tm |
| ५ | मे. अे. जी. डायग्नोस्टीक, सिकंदराबाद | Rs. 400000.00 | Rs. 400000.00 + 5000 Test Chemical Free | मॉडेल Erma PCE - 210 |

यावर चर्चा होवून, मे. अे.जी. डायग्नोस्टीक, सिकंदराबाद कंपनीचे मशिन तांत्रिक दृष्टया चांगले असून त्यांच्या मशिनची मूळ किंमत रु. ५,५०,०००/- इतकी आहे व ते आपल्या जुन्या मशिनची किंमत रु. १,५०,०००/- इतकी देत आहेत जी इतर कंपन्यापेक्षा जास्त आहे.

दोन रुग्णालये राहणार असल्याने कामकाजाचे दृष्टीने सदर कंपनीचे अजून एक मशिन रु. ५,५०,०००/- इतक्या किंमतीत अधिक ५००० टेस्टचे केमिकल्स मोफत घेवून याशिवाय बायबॅक पध्दतीने जुने मशिन परत देवून रु. ४,००,०००/- किंमतीत व सोबत ५००० टेस्टचे केमिकल मोफत घेवून दुसरे मशिन खरेदी करावे, असे ठरले.

**फ) सर्जिकल इन्स्ट्रूमेंट** -दिनांक ०२/१०/२००५ च्या सभेत निर्णय क्र. ६१४ प्रमाणे रु.५० लाख पर्यंतच्या खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी जाहिरातीस अनुसरुन पाच निविदा प्राप्त झालेल्या होत्या व त्यानंतरही काही निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन हत्यारांचा दर्जा व किंमतीनुसार निर्णय घ्यावा. उपलब्ध झालेल्या निविदांपैकी ज्या प्रकारच्या हत्यारासाठी निविदा आलेली नसेल त्यासाठी देखील इतर नामांकित कंपनींकडून दरपत्रके मागवून निर्णय घ्यावा, असे ठरले. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई, सिंथेसिस मेडिकल प्रा.लि.मुंबई, पराग एंटरप्रायजेस, मुंबई, मनमन, पुणे यांना चर्चा /वाटाघाटीसाठी आजचे सभेपूढे बोलाविले होते. त्यापैकी पराग एंटरप्रायजेस,मुबई यांनी आपल्या जाहिरातीस अनुसरुन निविदा भरलेली होती. तर उर्वरित पुरवठाधारकांनी आजचे सभेपूढे समक्ष दरपत्रके दिलेली आहेत. मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांनी आजचे सभेपूढे किती रुपयापर्यन्तचे खरेदीवर किती टक्के सूट देणार असे लेखी पत्र दिलेले आहे.मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई, यांनी रुपये १० लाखपर्यन्तचे खरेदीवर ३ टक्के सूट व रुपये १० लाखाचे वरील खरेदीवर ५ टक्के सूट देऊ केली आहे. त्यानुसार सूट विचारात घेऊन पुढील खरेदीसंबधी निर्णय घेणेत यावा असे ठरले. या हत्यारांची यादी एकाचवेळी परिपूर्ण होऊ शकत नसल्यामुळे किमान डिसेंबर,२००६ पर्यत वरचेवर लागेल तशी हत्यारे खरेदी करण्यात यावीत. इतर पुरवठाधारकांनी आपणास काय सवलत देता येईल याबद्दल पत्राने कळवावे, असे सांगणेत आले. व त्यांचेकडून सूट प्राप्त झालेनंतर दर्जात्मक व किंमतीस योग्य असतील अशा पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात यावा, रुग्णालय तातडीने सुरु करण्याचे असल्याने या संबंधीचा निर्णय मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी, व मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८.** **पूर्णवेळ विशेष तज्ञांना खास अनुदान देणेबाबत**
**निर्णय क्र.६९९.** नवीन नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी डिसेंबर २००४ पासून तीन वेळा जाहिरात देऊनही आवश्यक तो प्रतिसाद मिळू शकला नाही. पूर्ण वेळ विशेषज्ञांना आपण देऊ केलेली शासकीय वेतन श्रेणी देखील आकर्षित करु शकत नाही. त्यांची अर्हता इतर तज्ञ स्नातकोत्तर उमेदवारापेक्षा जास्त असते जसे D.M., M.Ch. इत्यादी.

या कारणासाठी त्यांना प्रत्यक्ष व्यवसायात खूपच आर्थिक लाभ होण्याची खात्री असते. अशा उमेदवारांना आपल्या संस्थेत पूर्ण वेळ पदावर आकर्षित करण्यासाठी शासकीय वेतन श्रेणीच्या एकूण उपलब्धी व्यतिरीक्त खास विशेष सेवा अनुदान (Incentive) देण्यात यावे अशी शिफारस आहे. हे अनुदान किमान रु.२०,०००/- ते कमाल रु.३०,०००/- पर्यंत असावे. प्रत्येक उमेदवाराची अर्हता, तांत्रिक क्षमता इत्यादी लक्षात घेऊन रक्कम नक्की करता येऊ शकेल. **<u>यातील विचारार्थ राहणा-या श्रेणी खालील प्रमाणे -</u>**

| अ.नं | पदाचे नाव | अर्हता |
|---|---|---|
| ०१ | कार्डियॅक फिजिशियन | D.M. (कार्डियॉलॉजी) |
| ०२ | कार्डियॅक सर्जन | M.Ch./FRCS (कार्डियॅक सर्जरी) |
| ०३ | नेफ्रॉलॉजिस्ट | D.M. (नेफ्रॉलॉजी) |
| ०४ | युरॉलॉजिस्ट | M.Ch. (युरॉलॉजी) |
| ०५ | न्यूरो फिजिशियन | D.M. (न्युरॉलॉजी) |
| ०६ | न्यूरो सर्जन | M.Ch. (न्युरो सर्जरी) |
| ०७ | सर्जन प्लॅस्टिक सर्जरी | M.Ch. (प्लास्टिक सर्जरी) |
| ०८ | पेडियॅट्रिक सर्जन | M.Ch. (पेडियॅट्रिक सर्जरी) |
| ०९ | व्हॅस्कुलर सर्जन | M.Ch (CVTS) |
| १० | रेडीओलॉजिस्ट | सी.टी.स्कॅन व एम आर आय तज्ञ,सोनॉलॉजी तज्ञ |
| ११ | आय सर्जन | रेटायनल सर्जरी |
| | | लेसर सर्जरी |
| | | फेको सर्जरी |
| १२ | मॅक्सिलो फेशियन सर्जन | M.D.S. (Maxillo facial Surgery) |

या व्यतिरिक्त यापुढील काळात येऊ शकणारे इतर विषयातील विशेष तज्ञांना यात समावेश करता येऊ शकेल.

वरील तज्ञ त्यांच्या विषयात उच्च अर्हता असलेले व किमान त्या विषयात ५ वर्षे अनुभव असलेले गृहीत आहेत. अशा तज्ञांच्या सेवा आपल्या संस्थेस निष्ठेने मिळण्यासाठी वरील नियोजन आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये, यांनी संबंधितांची अनुदान निश्चिती करावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९. प्रसादालय गावरान तूप खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७००.** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०१.२००५ निर्णय क्र.१६ नुसार सन २००५-०६ करीता प्रसादालय विभागातील प्रसाद लाडूसाठी आवश्यक असणारे ३५०० क्विंटल गावरान तूप-लूज ३५ कि. ग्रॅ. कॅन व १५ कि.ग्रॅ.पॅकींग डब्यातील ॲगमार्क तूप दोन टप्प्यात प्रत्येक सहामाहीसाठी निविदा मागणी करुन खरेदी करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार पहिल्या सहामाहीसाठी आवश्यक असणारे १७५० क्विंटल गावरान तूप किराणा मालाच्या वार्षिक खरेदी निविदामध्ये समाविष्ट करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. प्राप्त निविदामधील निविदाधारकांशी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ मध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन मे.नारायण उदेराम वैश्य, नाशिक यांना मिल्कमास्टर ॲगमार्क तूपासाठी रु.१०१/-प्रति किलो अधिक १२.५ टक्के व्हॅट असा एकूणरु.११३.६२ प्र.कि.ग्रॅ. या न्यूनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. निविदेवरील निर्णय घेणेस उशीर झाल्याने त्यांना पहिल्या सहामाहीसाठी १२०० क्विंटल तूप पुरविणेचा आदेश दिलेला आहे. मे.नारायण उदेराम वैश्य यांनी दि.३१.१०.२००५ अखेर ८७२ क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केलेला असून ३२८ क्विंटल तूपाचा पुरवठा डिसेंबर २००५ मध्यापर्यंत पुरेल. उर्वरित एप्रिल २००६ अखेरच्या कालावधीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागणी करणेस व पुरवठा आदेश देणेस साधारणतः एक ते दीड महिना लागण्याची शक्यता पाहता डिसेंबर २००५ ते एप्रिल २००६ अखेर अशा ५ महिन्यांकरीता सुमारे १४५० क्विंटल गावरान तूपाची मागणी करावी लागेल.

मा.व्यवस्थापन समिती मधील निर्णयानुसार गावरान तूपाची दुसऱ्या सहामाहीसाठी १७५० क्विंटल मागणी शिल्लक आहे. मात्र निविदेचा कालावधी ५ महिन्यांचा असल्याने १४५० क्विंटल गावरान तूपाची मागणी करावी असे नम्र मत आहे. तरी डिसेंबर २००५ ते एप्रिल २००६ अखेर अशा ५ महिन्यांकरीता १४५० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. निवासस्थान विभागाकरीता सोलापूर चादरी खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७०१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०८.२००५ मधील निर्णय क्र.४१५ नुसार संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान रुमसाठी आवश्यक असणा-या सोलापूरी चादरी ३००० नग, गादीपाट कापड व गादी खोळीसाठी आवश्यक असणारे कापड खरेदीसाठी ३-४ विश्वस्तांनी सोलापूर येथे समक्ष जावून, प्रत्यक्ष नमूना पाहून उच्च प्रतीच्या व दर्जेदार चादरी खरेदी करणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु.११,२५,०००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.१५.१०.२००५ रोजी मा. विश्वस्त डॉ.एकनाथराव गोंदकर, श्री पांडूरंग गमाजी अभंग यांचेसमवेत अधिक्षक, खरेदी विभाग, श्री. पी. बी. बोरावके हे सोलापूर येथे समक्ष गेले होते. सोलापूर येथील प्रसिद्ध असलेल्या खालील तीन मिल्सला प्रत्यक्ष भेट देवून त्यांचेकडील मालाची डिझाईन, पोत तसेच इतर नमूने पाहून चादरीवर संस्थेचे नांव आवश्यक असल्याचे त्यांचे मालकास सांगितले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देवू केलेले आहे.

| अ.नं | मिलचे नांव | दर प्र.नग | छपाई खर्च | पेमेंट | पोहोच |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | क्षिरसागर टेक्सटाईल मिल | रु.२१०/- | वेगळा | त्वरीत | सोलापूर |
| ०२. | पुलगम टेक्सटाईल मिल | रु.२१५/- | समावेशक | त्वरीत | सोलापूर |
| ०३. | बुर्गूल टेक्सटाईल मिल | रु.१९६/-<br>(सूट वजा जाता) | समावेशक | १०टक्के<br>ॲड. | सोलापूर |

उपरोक्तपैकी मे.बुर्गूल टेक्सटाईल मिल यांनी १३०० ते १३२० ग्रॅमचे चादरीसाठी रु.२१०/-प्रती दर दिलेले होते. मात्र मागणी जास्त असल्याने रु.१४/-प्र.नग सूट देवू केलेली असल्याने त्यांचेकडील चादरीचा दर रु.१९६/- प्रती नग आलेला आहे. तसेच मे. बुर्गूल टेक्सटाईल मिल यांनी संस्थानचे नाव टाकणेचा दर आकारलेला नाही. मात्र चादरची डिलेव्हरी ही सोलापूर येथून घ्यावी लागेल अथवा

वाहतूक भाडे संस्थानने आदा करण्याचे समक्ष तसेच दि.१५.१०.२००५ चे पत्राने सांगितलेले आहे. सोबतच्या पत्राने त्यांनी चादरीचा दर दिलेला असून ते पूजा/चंद्रकांत आणि वसुंधरा या ब्रॅण्डच्या सोलापूरी चादरीचा पुरवठा करणार आहेत. तसेच त्यांनी तीन टप्प्यात म्हणजेच डिसेंबर २००५, जानेवारी व फेब्रुवारी २००६ मध्ये अनुक्रमे ५०० नग, १००० नग व १५०० नग चादरीचा पुरवठा करण्याची तयारी दर्शविलेली असून त्यांना १० टक्के रक्कम पुरवठा आदेशासोबत अॅडव्हॉन्स म्हणून दयावी लागेल.

त्यानुसार मे. बुर्गूल टेक्सटाईल मिल, सोलापूर यांचे दर रु.१९६/-प्रती नगाने ३००० नग सोलापूरी चादरी खरेदीस रु.५,८८,०००/-खर्च येईल. मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार सोलापूरी चादरीसाठी रु.६ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता आहे. मे.बुर्गूल टेक्सटाईल मिल, सोलापूर हे संस्थानचे मागणीनुसार नाव टाकून नमूना चादर तयार करुन पुरवठा करणार आहेत.

तरी वरीलप्रमाणे सोलापूर चादरी ३००० नग मे. बुर्गूल टेक्सटाईल मिल, सोलापूर यांचेकडून खरेदीस व त्यांना मागणीनुसार १० टक्के रक्कम अॅडव्हान्स देणेस तसेच वाहतूक भाडे संस्थानने आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/भक्तनिवासस्थान प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११. तेलगू भाषेतून साईलीला प्रकाशित करणेबाबत.**
**निर्णय क्र. ७०२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२. श्रीसाईबाबा समाधीचे बाजूने असलेल्या मार्बलचे पट्टीला चांदीकाम करणेबाबत.**
**निर्णय क्र.७०३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३. १५० ग्रॅम वजनाचे लाडूस मागणी नसल्याने बंद करणेबाबत.**
**निर्णय क्र.७०४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४. सौर उर्जा प्रकल्पाकरीता स्वतंत्र पाणी शुध्दीकरण यंत्रणा खरेदी करुन बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.७०५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५. नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल नर्सिंग स्टेशन सिस्टमसाठी पॉवर पॉईंट बाबत.**

**निर्णय क्र.७०६.** नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या आय.सी.सी.यु.मध्ये सेंट्रल नर्सिंग स्टेशन सिस्टीम्बसविण्याचे काम चालू आहे. सदरच्या सिस्टीम्व पेशंटसाठी लागणा-या इतर इक्विपमेंट आणि मॉनीटर्ससाठी प्रत्येक बेडच्या बाजूला एकूण चार पॉवर पॉईंटची मागणी असून पहिल्या मजल्यावरील आय.सी.सी.यु.मध्ये १८ बेडसाठी एकूण७२ पॉवर पॉईंट आणि दुस-या मजल्यावरील २० बेडसाठी ८० पॉवर पॉईंटची मागणी आहे. तरी अशा एकूण **१५२ नग पॉवर पॉईंटसाठी** खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | पॉलीकॅब /फिनिलेक्स मेक वायर<br>साईज - ४.० स्क्वेअर एम.एम., | २३<br>बंडल | रू.०९००/-<br>(प्रती बंडल ) | रू. २०,७००.०० |
| ०२) | पॉलीकॅब /फिनिलेक्स मेक वायर<br>साईज - २.५ स्क्वेअर एम.एम., हिरवा कलर | १२<br>बंडल | रू.०७००/-<br>(प्रती बंडल ) | रू. ०८,४००.०० |
| ०३) | पॉलीकॅब/ॲल्युमिनिअम आर्मड पी.व्ही.सी.केबल,<br>३ . १/२ x २५ स्क्वेअर एम.एम. | ५०<br>मीटर | रू.०१२५/-<br>(प्रती मीटर) | रू. ०६,२५०.०० |
| ०४) | ॲंकर मेक,<br>पॉवर प्लेट, १६ ॲम्पीअर (मल्टी सॉकेट ) | १५२<br>नग | रु. ०१२०/-<br>( प्रति नग ) | रू. १८,२४०.०० |
| ०५) | मोदी मेक,<br>कॅसिंग कॅपींग पट्टी, ३० एम.एम. | ५००<br>मीटर | रू.००२५/-<br>(प्रती मीटर) | रू. १२,५००.०० |
| ०६) | रावळ प्लग, २५ x ८ | ०३०<br>पुडे | रू.००१०/-<br>(प्रती पुडा) | रू. ००,३००.०० |
| ०७) | स्क्रूबॉक्स , ३५ x ८ | ०१५<br>बॉक्स | रू.०१२०/-<br>(प्रती बॉक्स) | रू. ०१,८००.०० |
| ०८) | स्क्रू बॉक्स , ७५ x ८ | ००३<br>बॉक्स | रू.०१५०/-<br>(प्रती बॉक्स) | रू. ००,४५०.०० |
| ०९) | सनमाईक फोल्डींग बोर्ड,<br>१२ x १६ (फुल बिजागिरी) | ०३८<br>नग | रू.०१५०/-<br>(प्रती नग) | रू. ०५,७००.०० |
| १०) | स्टॅंडर्ड / सिमेन्स मेक, | ००३ | रू.१५००/- | रू. ०४,५००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३ फेज - 6 Way-Double Door D.B. | नग | (प्रती नग) | |
| ११) | M.C.B.20 AMP. | ५४ नग | रू.०१५०/- (प्रती नग) | रू. ०८,१००.०० |
| १२) | स्टँडर्ड / सिमेन्स मेक, 63 Amp. E.L.C.B. 3 phase | ०८ नग | रू.२६००/- (प्रती नग) | रू. २०,८००.०० |
| | | | एकुणरक्कम :- | रू. १,०७,७४०.०० |
| | +२५ %(लेबर चार्जेस +ओव्हरहेड चार्जेस) | | | रु. ०,२६,९३५.०० |
| | | | एकुणरक्कम :- | रु. १,३४,६७५.०० |

सध्या नवीन सुपस्पेशालिटी रुग्णालयाच्या कॅन्टीन इलेक्ट्रीफिकेशनचे काम मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांना मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८-०९-२००५ चे सभेत आयत्या वेळेचा विषय क्र.१० निर्णय क्र.५४२ अन्वये देण्यात आलेले असून त्यांचे काम चालू आहे. सदर कामात पॉवरपॉईंटच्या वायरींगचा समावेश असून हे काम फक्त कॅन्टीनपुरते मर्यादित आहे. मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांचे पॉवरपॉईंटचे व वायरींगचे दर गृहीत धरल्यास कामाची रक्कम रु. १,२९,५७०/- इतकी होते. याकामी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांनी लेखी पत्र व कोटेशन देऊन काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या आय.सी.सी.यु.मध्ये पॉवरपॉईंट वायरींगचे काम विभागामार्फत जर केले तर मटेरीअल खर्च तसेच लेबर चार्ज धरुन एकुण रक्कम रुपये १,३४,६७५/- इतका खर्च येतो. शिवाय कोटेशन मागवून मटेरीअल खरेदी करण्यात एक ते दीड महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. यामुळे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या कामात वेळ लागण्याची शक्यता आहे. मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांचे काम सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकडे चालूच आहे. तरी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव व विभागामार्फत कामाच्या खर्चाचे येणारे रक्कमेचा तुलनात्मक तसेच वेळेचा विचार करता सदरचे काम मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांना दिल्यास काम लवकर होऊन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या कामात खंड न पडता काम लवकरात लवकर पूर्ण होईल. असा मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६. ANTI VIRUS पॅकेज खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७०७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७. मा.व्यवस्थापन समितीचे ठराव/निर्णय संस्थानच्या संकेतस्थळावर (Website) उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.७०८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८. अहमदनगर जिल्हा ज्येष्ठ नागरिकांच्या मेळाव्याकरिता आर्थिक सहाय्य मिळणेबाबत ॲडव्होकेट रामराव चव्हाण, अध्यक्ष, जिल्हा जेष्ठ नागरिकांचा मेळावा, अहमदनगर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७०९.** ॲड.रामराव चव्हाण, अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा - २००५, अहमदनगर यांचे अहमदनगर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांचा जिल्हा मेळावा रविवार, दि.१३/११/२००५ रोजी अहमदनगर येथे सकाळी १०.०० ते सायं. ५.०० पर्यंत होणार असून या मेळाव्यास सुप्रसिध्द मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे, नगर शहरात ५ ज्येष्ठ नागरिक संघ असून ते सर्व मेळाव्याची व्यवस्था करणार आहेत. तसेच संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यात ४२ संघ असून सुमारे ७०० प्रतिनिधी मेळाव्यास हजर राहतील असा अंदाज आहे. प्रतिनिधीकडून जमा होणा-या निधीत प्रतिनिधींचे नाश्ता, भोजन, चहा, कार्यालय व इतर व्यवस्था होणे शक्य नसलेने काही भरघोस अर्थसहाय्य संस्थांनकडून मिळवावे म्हणून प्रयत्न चालू आहेत. त्या हेतूनेच ॲड.श्री राजाभाऊ झरकर यांनी मा.अध्यक्ष, यांची दि.०६/१०/२००५ रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन विनंती केली.

प्रस्तावित प्रकरण " ग्रँट इन एड" स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२)(एक) (अध्यादेशान्वये सुधारित) मधील तरतूदीअन्वये शैक्षणिक/धार्मिक/सामाजिक संस्थेस छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने मदत देण्याची तरतूद आहे.

तथापि, दि.१३/०३/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३७, निर्णय क्र.१२९ अन्वये यापुर्वी देण्यात आलेल्या अनुदानास शासनाची मान्यता घ्यावी, ही मान्यता मिळालेनंतरच यापुढे अनुदान मागणीकामी आलेले अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत असें ठरले आहे. तसेच दि.१८/०७/२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३७, निर्णय क्र.३६८ अन्वये प्रशासकीय बाबी आणि /किंवा विश्वस्तनिधीच्या विनियोगाबाबत शासनाची विहीत पूर्व मंजूरी घेणे आवश्यक असलेबाबत म्हटले आहे.

तसे प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत आले असून त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

ॲड.रामराव चव्हाण, अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा - २००५, या रविवार, दि.१३/११/२००५ रोजी अहमदनगर येथे होणा-या जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या जिल्हा मेळाव्यास रु.२५,०००/- पर्यंतचा शिधा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९.** **प.पू.स्वामी रामदेवजी महाराज, हरिव्दार, यांचे निवासी प्राणायाम, योग व चिकित्सा विज्ञान शिबीराबाबत.**

**निर्णय क्र.७१०.** दि.०३/०५/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.३३ मधील निर्णय क्र.२०८ ने प.पू.रामदेवजी महाराज, दिव्य योग मंदिर ट्रस्ट, हरिद्वार, यांचे प्राणायाम व योगसाधना शिबीर भरवणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/- पर्यंतचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४मधील कलम क्र.१७(०२)(ण) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद केलेली आहे. "मानवजातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल"

त्यानंतर, दिव्ययोग मंदिर ट्रस्ट, हरिव्दार यांनी दि.१४/१०/२००५ रोजीच्या पत्राने शिबीर भरविणेसंबंधी श्री साईबाबा संस्थानला काय पूर्तता करावी लागेल याबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

**०१)** शिबीरासाठी तीन लाख चौरस फूट विस्तीर्ण सपाट मैदान.

**०२)** साऊंडप्रूफ व्यवस्थेसह ६२ किलोवॅटचे दोन जनरेटर.

**०३)** सदर शिबीरात जास्तीत जास्त लोकांनी भाग घ्यावा म्हणून त्यांचे विहीत नमुन्यात होर्डींग-१००, बॅनर-४०० ते ८००, हँडबिले - १ ते २ लाख, पोस्टर - १० ते २० हजार, तसेच त्यांचे विहीत नमुन्यात वर्तमानपत्रातून जाहिरात प्रसिध्दी करणे.

**०४)** व्यक्तींची तपासणी करणेकामी एक हॉल व ५ रुम्स असणे आवश्यक आहे. व्याधीग्रस्तांच्या तपासणीची व्यवस्था शिबीर स्थळाच्या ५०० मीटर चे आत करणे.

**०५) महाराजांची निवास व्यवस्था** :- ही शिबीर स्थळापासून २ ते ५ कि.मी. अंतरावर करावी. त्यांचेसाठी सर्व सोयींनी युक्त एक स्वतंत्र रुम व त्यांचे सोबतच्या व्यक्तीसाठी शेजारीच ४ खोल्या, स्वयंपाकघर, प.पू.स्वामींच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी विशिष्ट श्रेणीतील राज्य अतिथींसाठी (state guest) प्रांतीय सरकारला संपर्क साधणे आवश्यक आहे. स्वतः स्वामीजी कोणत्याही प्रकारची चिकीत्सा देत नाहीत, त्यांचे सोबत आलेले वैद्य हे सर्वांना चिकीत्सेबद्दल माहिती देतील.

**०६) महाराजांसाठी भोजन व्यवस्था :-** सकाळचा नाष्टा - सकाळी ८.३० ते ९.०० चे दरम्यान बिगरसाखरेचे गाईचे दूध, फळ असा अल्पोपहार देण्यात यावा. दुपारच्या जेवणाची वेळ - १२.०० वाजताची - गाईचे दूध किंवा दही, मोसमानुसार हिरव्या पालेभाज्या ( सेंधा नमक टाकून विना मसाले थोड्याशा गाईच्या कमी तूपातील) व फळे. रात्रीच्या जेवणाची वेळ ७.३० ते ८.०० चे दरम्यान अशी असेल या जेवणात गाईचे दूध, कमी तूपात केलेल्या पालेभाज्या,फळ भाज्या व या मोसमातील फळे इ.

**०७) स्टाफची निवास व्यवस्था :-** आस्था चैनलचे स्टाफसाठी ४ खोल्या, श्री अरुणजी, निदेशक, टी.व्ही. टीमसाठी एक खोली, वैद्यांसाठी १० खोल्या, संगीतकारांसाठी २ खोल्या, सर्व खोल्या अटॅच बाथरुमच्या असाव्यात. स्क्रीन, टेंट, वीज, ध्वनी इ.चे स्टाफसाठी ४ रुम्स तसेच औषधालयाचे ३५ स्टाफसाठी दोन मोठे हॉल किंवा १० साध्या खोल्या कॉमन संडास बाथरुम असलेल्या, जाणे-येण्याच्या सोईच्या दृष्टीने शिबीर स्थळाजवळ असाव्यात.

**०८) स्टाफची भोजन व्यवस्था :-** अल्पोपहार सकाळी ८.०० ते ९.०० चे दरम्यान - दूध, फळे (केळी, पपई, सफरचंद, चिक्कू, पेरु , मोसमानुसार फळे) दलिया, पोहे इ., दुपारच्या जेवणाची वेळ १२.०० ते १.०० चे दरम्यान, रात्रीच्या जेवणाची - वेळ - रात्रौ ८.०० ते ९.०० चे दरम्यान - डाळ, भात, चपाती, दही, मौसमानुसार हिरव्या पालेभाज्या इ. असावे.

**०९) वाहन व्यवस्था :-** पूज्य स्वामीजींच्या साठी स्कॉर्पिओ /टाटा सफारी चालू स्थितीतील एका वाहनाची व्यवस्था, आस्था चॅनलचे स्टाफसाठी एक टाटा सूमो किंवा क्वालिस वाहनाची व्यवस्था, वैद्य लोकांसाठी एक टाटा सूमो किंवा क्वालिस वाहनाची व्यवस्था, गायक व अन्य लोकांसाठी एक गाडीची व्यवस्था करावयाची आहे.

**१०)** इतर महत्वाच्या आयोजकांनी स्थानीय स्तरावर कोणतीही प्रवेश पत्रे छापू नयेत. विविध प्रकारची प्रवेश पत्रे तसेच आवश्यक बाबी आश्रमाकडून देण्यात येतील. आमंत्रित प्रवेशपत्रासाठी कोणतीही जाहिरात देऊ नये. फक्त विशिष्ट किंवा साधारण प्रवेशपत्रांसाठी जाहिरात देण्यात यावी. सर्व

प्रचार/प्रसार व्यवस्था ही त्यांनी निर्देश केलेप्रमाणे विहीत नमून्यात करावी. ज्यावर परम पूज्य स्वामी रामदेवजी महाराज चे नावांप्रमाणेच छपाई करावयाची असून त्यावर बाबा रामदेवजी, योगीराज रामदेवजी इ. शब्दांचा वापर करु नये. मैदानाचे प्रवेशद्वारावर सुरक्षा व्यवस्था ही प्रशिक्षित सुरक्षा गार्ड किंवा पोलीसांचे सहाय्याने करावी कार्यकर्त्यांच्या द्वारे करु नये. शिबीर आयोजनासाठी स्थानिक प्रशासन व स्थानिक पोलीस यंत्रणेकडून अगोदरच परवानगी घ्यावी व त्याची पूर्वसूचना आश्रमाला द्यावी. शिबीर सुरू होणेपूर्वी शिबीर स्थानावर औषधे, व्ही.सी.डी व ऑडीओ कॅसेट विक्री करणेकामी जिल्हास्तरीय प्राधिकृत अधिकारी यांची पूर्व परवानगी घ्यावी. शिबीर समाप्तीनंतर संबंधित अधिका-यांकडे विक्रीबाबतचे रिटर्न भरणेबाबत आश्रमाच्या लोकांना मदत करावी. शिबीर आयोजनाचे पूर्वीच ध्वनीक्षेपक, वीज इ.बाबत संबंधीतांची पूर्वपरवानगी घेऊन त्याबाबत आश्रमाला कळविणे. शिबीरासाठी ८ ते १० मोबाईल वेगळया नंबरचे पुरवावेत त्यातील काही नंबर टि.व्ही चॅनलवर प्रक्षेपीत करावयाचे असल्याने असे नंबर आश्रमाला शिबीर सुरु होणेपूर्वीच कळवावेत. शिबीर स्थळाचे नांव चॅनेल प्रक्षेपीत करणेचे असलेने त्याबाबत वेळीच त्यांना कळविणे.

वरील बाबी विचारात घेता सदर शिबीर अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडणेकामी सर्व अधीक्षक/ विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. सर्व संबंधीत विभागाच्या कामात सुसूत्रता राखणे, शिबीर संदर्भात इच्छूकांना माहिती देणे, शिबीरार्थींचे डिमांड ड्रॉफ्ट, अर्ज स्वीकारुन त्यांची नोंदणी करणे वगैरेकामी शिबीरार्थींच्या सोईसाठी टेलीफोन, मोबाईल, फॅक्स, इंटरनेट, कॉम्प्यूटर अशा अद्ययावत सुविधांसह माहिती केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. शिबीरार्थींच्या सोयीसाठी सदर माहिती केंद्राच्या कामकाजाची वेळ सकाळी ६.०० ते दुपारी २.०० व दुपारी २.०० ते रात्रौ १०.०० अशी ठेवण्यात आलेली असून रविवारीसुध्दा कार्यालय सुरु ठेवण्यात आलेले आहे.

सदर निवासी शिबीराचे नियोजन व त्यासाठी संस्थानला आतापावेतोच्या खर्चाची माहिती खालील प्रमाणे.

| **अ)** | **निवास व्यवस्था** | **अप्रत्यक्ष खर्च** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ०१ | नवीनभक्तनिवासकडील ४८६ खोल्या व हॉल अंदाजे १७८८ शिबीरार्थीसाठी विनामुल्य साईप्रसाद नं.०२ इमारतीतील ७५ खोल्या अंदाजे १९२ शिबीरार्थीसाठी विनामुल्य साईनिवास इमारतीतील ब्लॉक विनामुल्य देणे प.पू.स्वामीजींसाठी ०१ प.पू. स्वामीजीं समवेत ०४ असणारांसाठी एक हॉल | ८,२३,०१०.०० | |
| ब) | **अंदाजे २५०० शिबीरार्थीसाठी अल्पोपहार व जेवण तसेच प.पू.स्वामींजीसाठी दररोज गावरान गाईचे दूध,तूप,** दररोज सकाळी अल्पोपहार २ वेळेच जेवण २ वेळेच दूध प्रत्येकी २००मिली प्रमाणे गाईचे दूध,स्वयंपकासाठी लागणारा किराणा, भाजीपाला, वगैरे पदार्थ संस्थानने केटरींग कॉन्ट्रक्टरला पुरविणेचे आहे. | ४,५०,९६२.५० | |
| | **एकूण अप्रत्यक्ष खर्च** | | **१२,७३,९७२.५०** |

संस्थानला उपरोक्त बाबीं खेरीज खालील इतर बाबींसाठी प्रत्यक्ष खर्च करावा लागणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | प्रसादालयाचे दैनंदिन कामकाजावर परिणाम होऊ नये तसेच २५०० शिबीरार्थीच्या सोईच्या व वेळेचे दृष्टीने त्यांना अल्पोपहार व वेळेचे दोन वेळेचे जेवण तयार करणे व वाढणे यासाठी टेबल खूर्च्या भांडी पुरविणे वगैरे काम शिबीर स्थळाजवळ कॉन्ट्रक्टरकडून करुन घेणे. गॅस | प्रत्यक्ष खर्च<br>०३,००,०००.००<br>७५,०००.०० | |
| ०२ | जेवणासाठी १००फुट X १५०फुटाचा मंडप टाकणे. | ०१,००,०००.०० | |
| | विद्युत आकार | ०१,००,०००.०० | |
| ०३ | कंत्राटी कामगारांचे वेतन<br>सुरक्षा गार्ड,स्वच्छता कामगार,विद्युत,पाणी पुरवठा, बगीचा वगैरे | ०१,००,०००.०० | |
| ०४ | जाहीरात-<br>वर्तमान पत्र,<br>वेगवेगळया शहरातून टिव्ही केबलव्दारे प्रसिध्दी<br>होर्डींग, बॅनर इ. छपाई खर्च | ०१,००,०००.००<br>२८,४७७.००<br>७६,०४०.०० | |
| ०५ | प.पू.स्वामीजीसह२ व्यक्तीचे १ बाजूचे विमान भाडे | ३०,०००.०० | |
| ०६ | इतर तसेच ऐन वेळेचा खर्च | ०१,००,०००.०० | **१०,०९,५१७.००** |
| | अद्याप पावेतोच्या अंदाजनुसार एकूण अंदाजे खर्च | | **२२,८३,४८९.५०** |

पतंजली योगपीठ (न्यास) हरिव्दार, रु.६०००/- देणगी घेऊन मर्यादित फक्त २००० शिबीरार्थ्यांना प्रवेश देणार आहेत. त्याखेरीज त्यांचेकडील ५०० देणगीदारांनाही ते प्रवेश देणार आहेत.

उर्वरित २५०० व्यक्तींशिवाय संस्थानला, संस्थान ठरवेल त्या निकषानुसार ३००० व्यक्तींना प्रवेश देता येणार आहे. म्हणजेच उपलब्ध मैदानाची क्षमता विचारात घेता एकूण फक्त ५५०० या मर्यादेतच प्रवेश देता येणार आहेत.

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी, यांनी दि.२०/१०/२००५ च्या पत्राने संस्थानने यापूर्वी आयोजित केलेल्या शिबीरात संस्थान कर्मचाऱ्यांना विनामूल्य प्रवेश दिला होता. संस्थान कर्मचारी व त्यांची पत्नी यांना विनामूल्य प्रवेश द्यावा अशी विनंती केलेली आहे. संस्थान मध्ये साधारणपणे १०५० कायम पुरुष/स्त्री कर्मचारी आहेत. अर्जात नमूद केल्याप्रमाणे पुरुष कर्मचारी व त्यांची पत्नी आणि स्त्री कर्मचारी व त्यांचे पती असे अंदाजे एकूण २१०० व्यक्तींना विनामूल्य प्रवेश द्यावा अगर कसे याबाबत विचार करावा लागेल.

मोफत प्रवेश द्यावयाचा असल्यास ३००० पेक्षा मोठया संख्येने असणारे इच्छूक विचारात घ्यावेत त्यापैकी कोणत्या ३००० ना प्रवेश द्यावा व कोणाला नाकारावा अशा अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. काही संस्थान कर्मचारी, स्थानिक नागरीक तसेच शिर्डीच्या आसपासच्या गावातील व्यक्तींना निवासी शिबीराच्या (निवासाच्या/जेवणाच्या) सोईंची आवश्यकता नसलेने ६००० पेक्षा योग्य कमी प्रमाणात देणगी देऊन प्रवेश मिळेल काय याबाबत विचारणा केलेली आहे. या सर्व बाबींचा सर्वार्थाने विचार करता या शिबीरासाठी संस्थानला मोठया प्रमाणावर खर्च करावा लागणार आहे. याबाबी विचारात घेता ३००० व्यक्तींकडून प्रत्येकी रु.१०००/-ची श्री साईबाबा संस्थानला देणगी जमा करुन प्रवेश द्यावा. कोणालाही विनामूल्य प्रवेश देऊ नये, जेणे करुन संस्थानचा या शिबीरासाठी होणारा बराचसा खर्च भरुन निघेल असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेले आहेत.

सदर ३००० पासेस पैकी ५०० पासेस व्हि.आय.पी. व्यक्तींना देणेचे आहेत, उर्वरीत २५०० पासेस इतर व्यक्तींना द्यावयाचे आहेत. ३००० व्यक्तींपेक्षा अधिक इच्छूक असण्याची शक्यता आहे. सदर ५०० पासेस तसेच २५०० पासेस कोणाला द्यावेत याबाबत काय निकष असावेत असे पास वाटप करणेकरीता मार्गदर्शन करणेकामी मा.विश्वस्त महोदय तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, या कार्यक्रमासाठी पतंजली योगपीठ ट्रस्ट, हरिव्दार यांनी श्री साईबाबा संस्थानला मोफत वितरणासाठी ३००० पासेस दिलेले होते. तथापि सदर पासेस विनामूल्य वितरण करण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेता प्रती पास रुपये एक हजार मात्र संस्थानला देणगी घेऊन देण्यात यावा अशी चर्चा करण्यात आली. तथापि, पतंजली योगपीठ, हरिव्दार यांनी सदर पासेसची विक्री न करता सदर पासेस मोफत देण्यात यावेत. हे पासेस अनिवासी व्यक्तींसाठीच असल्याने याचा उपयोग प्रामुख्याने स्थानिक व परिसरातील ग्रामस्थांना होऊ शकेल त्यामुळे सदर पासेस प्राधान्याने मा.मंत्री महोदय, मा.आमदार, मा.खासदार, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, पत्रकार, स्थानिक पोलिस विभागाचे कर्मचारी, नगरपालिका पदाधिकारी, कर्मचारी, संस्थान कर्मचारी, तसेच इतर इच्छुकांना मोफत पास देण्यात यावेत असा आग्रह धरल्याने, लोककल्याणाचा हेतू विचारात घेता त्याप्रमाणे धोरणात्मकरित्या विनामूल्य पास देण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५/अधिक्षक,दप्तर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ६०० शिक्षकांना प.पू.स्वामी रामदेवजी महाराज, यांचे निवासी शिबीरात प्रवेश मिळणेबाबत**

**निर्णय क्र.७११.** जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अंदाजे ६०० शिक्षक-शिक्षिका व प्रशिक्षणार्थी या शिबीरात प्रवेश देणे तसेच त्यांचे निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करणेबाबत अहमदनगर दक्षिण विभागाचे खासदार मा.श्री तुकाराम गडाख यांनी संस्थानचे अध्यक्ष मा.श्री जयंतराव ससाणे यांना विनंती केली होती. सदर शिक्षक-शिक्षिकां व प्रशिक्षणार्थींना योगशिक्षण मिळालेस त्यांचा उपयोग जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून शिकणाऱ्या मुला-मुलींना होऊ शकेल. त्यामुळे मुला-मुलींचे आरोग्य उत्तम राहू शकेल. हा त्यामागील उदात्त हेतूचा विचार लक्षात घेऊन शिक्षक, शिक्षिकां व प्रशिक्षणार्थी यांना परवानगी देणेबाबतचे सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१. श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांकरिता रुपये ५० हजार मिळणेबाबत श्री सर्जेराव भाऊराव काटकर, अध्यक्ष, विरभद्र दल व गांवकरी, रा. बन यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७१२.** श्री सर्जेराव भाऊराव काटकर, अध्यक्ष, विरभद्र दल , रा.बन, व गांवकरी यांनी त्यांचे दिनांक नसलेल्या अर्जात विरभद्र यात्रा ही दि.१४/११/२००५ ते दि.१६/११/२००५ अखेर तीन दिवस बिरोबा बन, शिरडी

येथे मोठया थाटात भरणार असून दि.१६/११/२००५ रोजी सालाबादप्रमाणे कुस्त्याही भरवल्या जाणार आहेत, या कुस्त्यांसाठी वाटण्यासाठी म्हणून रु.५०,०००/- ची मदत स्वतः संस्थानचे अधिका-यांचे हस्ते बुधवार, दि.१६/११/२००५ रोजी दुपारी ३.०० ते ६.०० वाजताचे दरम्यान वाटावेत अशी नम्र विनंती करण्यात आलेली आहे.

कुस्त्यांसाठी म्हणून संस्थानमार्फत फक्त श्रीरामनवमी उत्सवातच रु.५०,०००/- इतकी रक्कम देण्यात येत असते. त्यावेळी संस्थानचे प्रतिनिधी म्हणून लेखाशाखेतील कर्मचारी मदतीसाठी असतात. श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी नियुक्त करुन रक्कम वाटता येईल. मागील वर्षी दि.१७/११/२००४ रोजीचे मुंबई येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०५, निर्णय क्र.११९ अन्वये बिरोबा बन, शिरडी येथे संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी म्हणून रु.२५,०००/- मात्रची रक्कम लेखाशाखेमार्फत वाटण्यात आलेली होती.

तथापि, दि.१४/११/२००५ ते दि.१६/११/२००५ अखेर होणा-या विरभद्र यात्रेतील बुधवार, दि.१६/११/२००५ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी विश्वस्त मा.श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी रुपये ५०,०००/-पर्यंतच्या रक्कमेची मदत देणेबाबत शिफारस केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. सर्जेराव भाऊराव काटकर, अध्यक्ष, विरभद्र ट्रस्ट व गांवकरी रा. बन यांचे मागणीनुसार रक्कम रुपये ५०,०००/- मात्र कुस्त्यांच्या हगाम्यासाठी संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. पशुसंवर्धन व्यवसायास चालना देण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन केंद्रात लॅबसाठी आवश्यक असणारी मशिनरी खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७१३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. जिल्हा परिषद शाळांना बेंचेस तयार करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.७१४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि.,महाबळेश्वर यांना देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.७१५.** महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि., महाबळेश्वर यांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करणेसाठी संस्थानचे भक्तनिवासस्थान येथे असणाऱ्या गाळ्यांपैकी एक गाळा दिनांक ०४.१२.२००४ ते दिनांक ०३.११.२००५ अखेर ११ महिने लिव्ह अॅण्ड लायसेन्सी तत्वावर दरमहा रक्कम रुपये १,२११/- मासिक परवाना फी व मीटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत् बील यानुसार देण्यात आलेले आहे. सदर गाळ्याची मूदत दिनांक ०३.११.२००५ अखेर संपत आहे.

महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि.,महाबळेश्वर यांनी त्यांचे दि.४.१०.२००५ चे पत्रान्वये सदर गाळ्याचे नूतनीकरण करून मिळणेबाबत विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रक्कम रुपये १,५००/- आकारुन महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि.,महाबळेश्वर यांना त्यांचे परवान्यात ११ महिने मुदतीची मुदतवाढ पूर्वीचेच इतर शर्ती व अटींवर देण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही- विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पद्धतीने पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.७१६.**संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल, कुशल कामगार पुरविण्यासाठी श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इं) लिमिटेड, नाशिक तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि.,मुंबई यांची दिनांक १.८.२००३ पासून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कराराचा/ठेकेदारीचा कालावधी दिनांक ३१.०७.२००४ अखेर संपुष्टात आल्यानंतर त्यांचे कराराची/ठेकेदारीची मूदत आहे त्याच अटी व शर्तीवर दिनांक १.०८.२००४ पासून दिनांक ३१.१०.२००५ अखेर पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे. संबंधीत लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची वाढीव मूदत दिनांक ३१.१०.२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी लागणारे अकुशल,कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांची/ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सिलबंद

निविदा फॉर्मस् विक्रीची मूदत दिनांक ६.६.२००५ पासून दिनांक १८.६.२००५ अखेर पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्वीकारण्याची अंतिम मूदत दिनांक २.६.२००५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन संस्थानमध्ये लागणारे अकुशल,कुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकड्डून एकूण ४२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर ४२ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.९.७.२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत येऊन, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी दिनांक १४.८.२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित रहाणेकामी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे सदर सभेमध्ये उपस्थित निविदाधारकांशी/ ठेकेदारांशी त्यांचे निविदांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल,कुशल कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि.,मुंबई तसेच संस्थानला कंत्राटी पद्धतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्यूरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई व शिवा इंडस्ट्रियल सिक्यूरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि.,मुंबई यांच्या निविदा निर्णय क्र.४७० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आहेत. संबंधीत चार एजन्सीज यांना वर्क ऑर्डर देणे, लेबर लायसेन्सची पूर्तता करुन घेणे, करारनामा करुन घेणे इ.कार्यवाहीस सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

याकरिता श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इं) लि., नाशिक यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल/कुशल कामगारांच्या ठेकेदारीस/करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्यूरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ठेकेदारीस/करारास सध्याच्या कंत्राटा संबंधातील करारातील अटी व शर्तीसच अनुसरुन व त्याच अटी,शर्तीचे अधीन राहून मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने दिनांक १.११.२००५ पासून पूढे दोन महिने मुदतवाढ देणेत आलेली आहे त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६.** **समूह जनता अपघात विमा नुतनीकरण कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.७१७.** सध्याची गुंतागुंतीची दिनचर्या,वेगवान प्रवास व त्यामुळे वाढते अपघात यामुळे सर्वसाधारण जीवन असुरक्षित होत आहे.त्यातच कमवत्या व्यक्तीचे व पर्यायाने संस्थान कर्मचा-यांचे कुटूंब प्रमुख म्हणून वैयक्तीक जबाबदारी अधिकाअधिक वाढत आहे. वाढत्या जबाबदा-या पूर्ण करण्यासाठी होणा-या धावपळीमुळे या कर्मचा-याची जोखीमही वाढत आहे. त्यामुळे कर्मचारी पुरेशा तन्मयतेने व उत्साहाने एकाग्रतेने त्याला नेमून दिलेल्या कामामध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटूंबाच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेविषयी काही योजना राबविणे आवश्यक ठरते.

याबाबत पुर्वीच्या मा.विश्वस्त मंडळाचे कार्यकालात प्रथमच समूह जनता अपघात योजना राबविण्यात आलेली आहे.किमान आर्थिक भार व अधिकाधिक आर्थिक संरक्षण या दृष्टीने समूह जनता अपघात योजना अत्यंत सुयोग्य अशी आहे. ही योजना संस्थानचे आस्थापनेवर असणा-या सर्व कर्मचा-यांसाठी लागू करण्यात आलेली होती. मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२२ ऑक्टोबर २००० चे सभेतील निर्णय क्र.४४४ (२) अन्वये न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर, यांना या कारणांसाठी रुपये १६१/- प्रती कर्मचारी दराने एकूण रक्कम रुपये १,६७,४४०/- (रूपये एक लाख सदूसष्ट हजार चारशे चाळीस मात्र ) पाच वर्षासाठी भरणा करण्यात आली होती. त्याची मूदत ३१ ऑक्टोबर २००५ अखेर संपुष्टात आलेली आहे.

वरील प्रमाणे ही योजना लागू झाल्यानंतर (सन २००० ते जुलै २००५ अखेर) पाच वर्षाचे कालावधीत दुर्देवी अपघाती मृत्यू आलेल्या चार संस्थान कर्मचा-यांचे वारसाला प्रत्येकी रक्कम रुपये एक लाख इतकी नुकसान भरपाई न्यू.इंडिया एश्योरन्स कंपनी, श्रीरामपूर यांचे कडून मिळालेली आहे. सदरचे योजनेची मूदत दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अखेर संपुष्टात आलेली आहे.

आता, मा.अध्यक्ष महोदय यांचे पूर्व मान्यतेने १,०५० कायम संस्थान कर्मचा-यांच्यासाठी प्रत्येकी रुपये ५३/- या दराने प्रत्येकी एक लाख विम्यासाठी एकूण प्रिमियम रुपये ५५,६५०/- (अक्षरी रुपये पंचावन्न हजार सहाशे पन्नास) मात्र एवढी रक्कम दि.०१/११/२००५ पासून पुढील एक वर्षासाठी चेकव्दारे शाखाधिकारी, दि.न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड, शाखा श्रीरामपूर यांचेकडे भरणा करणेत येऊन नुतनीकरण करण्यात आले असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७.** **संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणेसंदर्भात ॲडव्होकेट नाईक व ॲडव्होकेट गोंदकर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७१८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८.** **डॉ.रेखा काशिनाथ ढवळे, रेडीओलॉजिस्ट यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७१९.** संस्थानचे नियोजित श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी अनुभवी वैद्यकीय अधिकारी तसेच पॅरामेडीकल स्टाफच्या नेमणूका करणेकामी टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, दै.सकाळ, दै.लोकमत, या वर्तमानपत्रांमध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहीरातीमधील वैद्यकीय अधिकारी (रेडिओलॉजी) या पदासाठी दोन अर्ज प्राप्त झालले होते. त्यानुसार सदर अर्जदारांना दि.२९/३० जानेवारी, २००५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मुलाखतीसाठी हजर रहाणेबाबत कळविण्यात आले होते. पैकी डॉ.किशोरीलाल सचदेव, लोणी हे एकच उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते. हजर असलेले उमेदवार डॉ.श्री.किशोरीलाल सचदेव, एम.बी.बी.एस.,एम.डी.,रेडिओलॉजी यांची मानद रेडिओलॉजीस्ट म्हणून नेमणूकीसाठी निवड करण्यात आली. सदर पदासाठी पूर्णवेळ रेडिओलॉजीस्ट उमेदवार न मिळाल्यामुळे वर्तमानपत्रात फेर जाहीरात देवून, उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावेत असा निर्णय संमत झालेला आहे.

सदरच्या निर्णयानुसार दि.०१ सप्टेंबर, २००५ रोजी पुन्हा टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, दै.सकाळ, दै.लोकमत या वर्तमानपत्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी व पॅरा मेडीकल स्टाफ असे मिळून एकूण ३३ पदांसाठी जाहीरात प्रसिध्द करुन सदर जाहीरातीमधील अ.नं.१ ते २३ वरील वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी उमेदवारांना दि.१०/०९/२००५ रोजी रुग्णालय निवड समितीचे सभेपुढे वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यावेळी रेडिओलॉजीस्ट या पदासाठी एकच उमेदवार डॉ.मंगेश तरटे, अहमदनगर हे हजर होते. त्यांची रेडिओलॉजिस्ट या पदासाठी मुलाखत घेवून निवड करण्यात येऊन त्यांना कामावर हजर होणेबाबत दि.१७/०९/२००५ रोजी नेमणूकपत्र पाठविण्यात आले होते. तथापि, ते सध्या सेवेत असलेल्या ठिकाणचा सेवाकरार (बॉण्ड) संपेपर्यंत संस्थान रुग्णालयाकडे हजर होणार नसलेबाबत त्यांनी कळविले आहे.

नियोजित श्री साईबाबा हॉस्पिटल तातडीने सुरु करावयाचे असून त्यासाठी मोठया क्मितीची मशिनरी खरेदी करण्यात आलेली आहे व येत आहे. या रुग्णालयासाठी रेडिओलॉजिस्ट या पदावर वैद्यकीय अधिका-याची सेवा तातडीने आवश्यक आहे. या पदावर नियुक्ती केलेले डॉ. मंगेश तरटे हे लागलीच संस्थान रुग्णालयाकडे हजर होण्यास इच्छूक नसल्यामुळे अत्यावश्यकता विचारात घेऊन डॉ. रेखा ढवळे, (एम.बी.बी.एस.,डी.एम.आर.डी.)जुन्नर, यांच्या अर्जानुसार त्यांची ज्युनिअर रेडिओलॉजिस्ट या पदासाठी वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी दि.२०/१०/२००५ रोजी मुलाखत घेऊन त्या ज्यु. रेडिओलॉजिस्ट या पदावर नेमणूक करणेस पात्र आहेत. त्यांना नेमणूक पत्र देण्यात यावे अशी शिफारस केली आहे. वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी केलेल्या शिफारशीनुसार सदरचे कार्यवाहीस संस्थान व्यवस्थापन समितीचे सदस्य व रुग्णालय निवड समितीचे अध्यक्ष मा.डॉ.तिवारी व मा. व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष यांचे पूर्वमान्यतेने डॉ.रेखा ढवळे यांना ज्युनिअर रेडिओलॉजिस्ट या पदावर तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणूक देण्यात आलेली असून त्या दि.२७/१०/२००५ रोजी श्रीसाईबाबा रुग्णालयाकडे कामावर हजर झालेल्या आहेत.

नियोजित श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी नेमणूक केलेल्या इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणेच डॉ.रेखा ढवळे यांनाही त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांचे मानधन/वेतनाबाबत कार्यवाही करता येईल. तरी डॉ.रेखा ढवळे रेडिओलॉजीस्ट यांचे तात्पुरते नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९.** **नियोजित श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी नेमणूकीसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७२०.** नियोजीत श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी कंन्सलटंट/वैद्यकीय अधिकारी व इतर पदे भरणेसाठी संस्थानने खालील वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द केलेली होती.

| अ.नं. | दिनांक | वर्तमान पत्राचा तपशील | जाहीरातीचा आलेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | दि.२७/११/२००४ | ०१) टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई.<br>०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे.<br>०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या.<br>०४) दैनिक लोकमत,<br>शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद ,नाशिक पुणे.) | रुपये-१,९४,०००/- |
| ०२ | दि.०१/०९/२००५ | ०१) टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई.<br>( सदर वृत्तपत्राचे जाहीरातीचे बुंकीग दि.०८/०९/२००५ पर्यत | रुपये-१,६३,२००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पूर्ण झालेली असल्याने या वृतपत्राने जाहीरात प्रसिध्द केलेली नाही.)<br>०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे.<br>०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या.<br>०४) दैनिक लोकमत,<br>शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद ,नाशिक पुणे.) | |

उपरोक्त जाहीरातीनुसार दि.२९-३०/०१/२००५ रोजी तसेच दि.१०/०९/२००५ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

उमेदवारांच्या घेतलेल्या मुलाखतीनुसार निवड केलेल्या एकूण २८ वैद्यकीय अधिका-यांना व एक सिटीस्कॅन तंत्रज्ञ यांना नेमणूक पत्रे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी १३ वैद्यकीय अधिकारी व एक तंत्रज्ञ कामावर हजर झालेले आहेत.

नियोजीत श्रीसाईबाबा रुग्णालयाचे सेवक आकृतीबंधांस अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसल्यामुळे या रुग्णालयासाठी नव्याने नियुक्त केलेल्या व करावयाच्या वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना रुग्णालय आस्थापनेवर वेतनश्रेणीवर नेमणूका देणेस अडचणीचे आहे.त्यामुळे वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी दिलेल्या मसूद्यात केवळ हजर होणे इतपत संबंधीत उमेदवारांना नेमणूक पत्र देण्यात आलेली आहेत.

सदर रुग्णालयाचे सेवक आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळेपर्यंत सदरहू कर्मचा-यांना मासिक मानधनावर नेमणूक पत्र देता येईल. शासकीय वेतनश्रेणीच्या प्रमाणीत संबंधितांना द्यावयाचे मासिक मानधनाची निश्चिती वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी केलेली असून सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

वर नमूद केले प्रमाणे आतापर्यंत दोन वेळा रुग्णालयासाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुनही नियोजीत श्री साईबाबा रुग्णालयासाठी कंन्सलटंट/ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झालेले नाहीत. तथापि, नियोजीत रुग्णालय तातडीने सुरु करणे असल्यामुळे, रुग्णालयासाठी पूर्ण वेळ/मानद वैद्यकीय अधिकारी नेमणूका करण्याच्या दृष्टीने फेर जाहीरात देण्यात यावी असा प्रस्ताव संस्थान रुग्णालयाचे वरिष्ठ प्रशासक यांनी दिलेला आहे.

त्यानुसार तातडीची गरज म्हणून मा.अध्यक्ष साहेब यांच्या पूर्व मान्यतेने खालील मसुद्यातील जाहीरात ०१)टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई.,०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे.०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या.०४) दैनिक लोकमत,शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद, नाशिक, पुणे.) या वर्तमान पत्रांमध्ये प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे.

**प्रसिध्दीस दिलेली जाहीरात खालील प्रमाणे आहे.**

| |
|---|
| Full time/Honorary consultants in-Cardiology,Neurology,Neuro surgery, Urology, Nephrology,Paediatric surgery,Onco surgery, Intensivist, Plastic surgery, Maxillo facial surgery,Micro surgery in ENT & Ophthalmology,Pathology (Full time only),General surgery,General Medicine, Ob.& Gynecology, Radiology, Paediatrics, Anaesthesiology, Dermatology, Sonology,etc. |
| 01.Consultant should have a minimum experience of 5 yrs after obtaining post graduation degree.<br>02.Consultant should possess DM/MCH/MD/MS in respective subject, only diplomats need not apply.<br>03.Full timers wil be given remuneration as per Govt. of Maharashtra recommendations.<br>**04) Honoraries should specify the following.**<br>**a)** Frequency of their visits per month.<br>**b)** Particular days or dates of their visits with time schedule made available at shirdi.<br>**c)** Their expectations regarding–Travel,Share in Consultations, share in job work & visits. |

उपरोक्त जाहिरातीनुसार उमेदवारांना अर्ज करण्याची अंतिम मूदत **दिनांक १०/११/२००५** ही देण्यात आलेली आहे. तरी सदरच्या जाहिरातीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०. श्रीरामपूर भू-संपादन कक्ष पूर्ववत सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.७२१.** संस्थानकरिता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा.उपविभागीय अधिकारी महसूल, श्रीरामपूर, यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन/मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | नायब तहसिलदार संवर्गातील | कंन्सलटंट | ०१. | रु. ७,०००/- |
| ०२. | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु. ४,५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०२ | रु. ४,०००/- |
| ०४. | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | एकूण | ०५. | |

सदरहू कक्षाकडे भू-संपादनासाठी एकूण सहा प्रकरणे कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहेत. या कक्षाला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असून दि.३१/०८/२००५ अखेर कक्षाची मूदत संपल्यानंतर तेव्हापासून हा कक्ष बंद आहे. दि.०१/०९/२००५ पासून कक्ष पुढे चालू ठेवणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता झालेली नाही.

दि.१८/०९/२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सदर कक्षाबाबतचा विषय निर्णयासाठी सादर करण्यात आला होता.मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावात "दि.३१/०८/२००५ अखेर सदरचा कक्ष संपुष्टात आणून या कक्षाकडील कामकाज फर्निचर व इतर साहित्यासह शिर्डी कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावे." असे प्रस्तावीत केले होते.

सदर कक्षाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय क्र.५२६ नुसार "भू-संपादन करणेकामी मा.उपविभागीय अधिकारी, महसूल श्रीरामपूर यांनी केलेल्या कामाचा अहवाल मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर करावा व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात यावा." असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर, भाग श्रीरामपूर यांना दि. ०७/१०/२००५ रोजी लेखी पत्र देऊन सदरचा कक्ष स्थापनेपासून कक्षाकडे सोपविण्यात आलेली एकूण कामे, त्यापैकी पूर्ण झालेली कामे व शिल्लक इतर कामांची प्रगती याबाबतचा तपशील देणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार दि.३१/१०/२००५ रोजी त्यांचेकडून सदरचा खुलासा प्राप्त झाला असून, तो अवलोकनार्थ सोबत सादर केला आहे. दि.०१/०९/२००५ पासून सदर कक्षाचे काम बंद आहे मात्र याबाबत उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी सदर कक्ष सुरु करणेबाबत वारंवार तोंडी तसेच दि.३१/१०/२००५ चे पत्राने या कक्षाची मुदतवाढ दि.३१/०८/२००६ पर्यंत करणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त प्रमाणे श्रीरामपूर कक्षाबाबत परिस्थिती आहे. दि.२८/१०/२००५ रोजी संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय शिर्डी येथे आले असता, त्यांनी सदरचा कक्ष पूर्ववत सुरु करणेबाबत तोंडी सूचना दिलेली आहे.

सदर कक्षाकडे नायब तहसिलदार संवर्गातील कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी श्री गर्जे यांनी राजीनामा दिलेला असल्यामुळे त्यांचेऐवजी संस्थानचे शिर्डी कार्यालयात कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेले श्री डी.व्ही. रायपल्ली, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना सदर कक्षाकडे काम पहाणे बाबत देण्यात येवून मा.अध्यक्ष महोदय यांचे सूचनेनुसार हा कक्ष दि.०१/११/२००५ पासून पूर्ववत सूरू करणेत आलेला आहे व या कक्षास दि.०१/११/२००५ पासून दि.३०/०४/२००६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१. असिस्टंट टाऊन प्लॅनरचे नेमणूकीबाबत.**
**निर्णय क्र.७२२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३२. उद्यान विकसित करणेबाबत.**
**निर्णय क्र. ७२३.** संस्थानने खरेदी केलेल्या शेती महामंडळाकडून संपादित केलेल्या मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील जमिनीवर उद्यान विकसित करणेकामी आजचे सभेत श्री विश्वास मढव, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी तयार केलेल्या उद्यानाची चित्रफितीव्दारे माहिती सभेस करुन दिली. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने खरेदी केलेल्या, शेती महामंडळाकडून संपादित केलेल्या मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील जमिनीवर उद्यान विकसित करणेकामी सल्लागार म्हणून श्री विश्वास मढव, मुंबई यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच उद्यान विकसित करणेकामी रुपये २५ कोटी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३.** **साई चॅनेल सुरु करणेस परवानगी देणे बाबत**

**निर्णय क्र.७२४.** शुभी टक्कर,मॅनेजींग डायरेक्टर,साईमा एंटरटेनमेंट,मुंबई यांनी त्यांचे दिनांक **०५.११.२००५** रोजीचे अर्जाने साई चॅनेल सुरु करणेस परवानगी मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्यासोबत त्यांनी सुरु करावयाचे चॅनेलच्या प्रस्तावाची एक प्रत जोडलेली आहे. सादर केलेल्या प्रस्तावात म्हटले आहे की, बाबांच्या सबका मालिक एक व श्रध्दा आणि सबुरी या संदेशांचा जास्तीत जास्त लोकांपर्यंत प्रसार व प्रचार व्हावा,श्री साईबाबांचे चमत्कार आदिंची माहिती व्हावी व बाबांचे नाव संपूर्ण जगभर व्हावे हाच उद्‌देश हा चॅनेल सुरु करण्यामागे आहे.

सदर चॅनेल २४ तास सुरु राहणार असून त्यासाठी साईमा एंटरटेनमेंट,मुंबई हे ५० कोटी रुपये गुंतवणूक करणार आहेत.सदर चॅनेलवर कार्यक्रम दाखविणेसाठी जाहिराती तेच गोळा करणार असून जाहिरातीपोटी मिळणा-या रकमेतून ते साईमा एंटरटेनमेंटचे व्यवस्थापन करणार आहेत. आम्ही या चॅनेलद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर श्री बाबांच्या कार्याच्या माहितीचा प्रचार करणार आहोत.या चॅनेलचे प्रसारासाठी सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांचा वापर करणार आहोत. त्यांनी सादर केलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१.या चॅनेलचे सर्व अधिकार हे साईमा एंटरटेनमेंट यांचेकडे राखीव ठेवण्यात आलेले आहेत.

०२.चॅनेलची सर्व मालमत्ता व जबाबदारी ही साईमा एंटरटेनमेंट यांची राहील.

०३.साईमा एंटरटेनमेंटने वेळोवेळी प्रसारीत होणारे धार्मिक व सामाजिक कार्यक्रम,मालिका प्रसारीत करणेचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

०४.हया चॅनेलच्या प्रक्षेपणासाठी प्रसिध्द करावयाच्या मजकूरावर संपादकीय संस्कार व इतर प्रसारणा संबंधीचे सर्व अधिकार हे साईमा एंटरटेनमेंट यांना राहतील.यासंदर्भात संस्थानवर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.फक्त काही संशोधन कार्यासाठी संस्थानच्या प्रतिनिधींची मदत घेण्यात येईल.

०५.या चॅनेलद्वारे प्रक्षेपीत होणा-या सर्व कार्यक्रमांची व मालमत्तेची मालकी ही साईमा एंटरटेनमेंट यांची राहील.

०६.या चॅनेल व्यतिरिक्त इतर कोणत्याही चॅनेलला मंदिर व परिसरात थेट प्रक्षेपण किंवा चित्रीकरण करता येणार नाही.फक्त बातम्यांचे चॅनेल यातून वगळले जातील.

०७.संस्थानला ८०० चौ.फुट आकाराची खोली मंदिरानजीक द्यावी लागेल.

०८.दररोज १० व्यक्तींची जेवणाची व निवासाची व्यवस्था करावी लागेल.

०९.या चॅनेलला संस्थानला संपूर्ण सहकार्य द्यावे लागेल. तसेच संशोधन कार्यासाठी, लिखाणासाठी महत्वाची माहिती कार्यक्रम आकर्षक होणेसाठी द्यावी लागेल.

१०.चित्रीकरणासाठी आलेल्या आमच्या कर्मचा-यांना चित्रीकरणाचे वेळी चित्रीकरण करतांना संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे लागेल.

आजचे सभेत शुभी टक्कर, मॅनेजींग डायरेक्टर, साईमा एंटरटेनमेंट, मुंबई या व त्यांचे प्रतिनिधी सभेस उपस्थित होते. त्यांनी सदरचे चॅनेलबाबत तयार केलेली चित्रफित सभेस दाखविली. याबाबत समिती सभेने त्यांना त्याअनुषंगिक कागदपत्रे सादर करणेबाबत सांगितले. ती प्राप्त झालेनंतर समिती पुढील निर्णय घेईल, असे ठरले

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४.** **आयकर कलमातर्गत ३५ एसी चा प्रकल्प अहवालाचा पाठपुरावा करणेसाठी श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौंटंट , पुणे यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.७२५.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस मिळणाऱ्या देणग्यांवर देणगीदारास शंभर टक्के आयकरात सवलत मिळविणेसाठी संस्थानच्या नावे अधिसूचना (Notification) मिळविण्याच्या दृष्टीने कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. सदरची अधिसूचना मिळविणेसाठी नवी दिल्ली येथे प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर,२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये डॉ.कैलास पाटील, प्रोजेक्ट डायरेक्टर, आयडियल कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, सांगली यांना प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. डॉ.पाटील यांनी सदर प्रकल्प अहवाल तयार करुन तो राष्ट्रीय समिती, नवी दिल्ली, यांना सादर केला आहे. हा प्रकल्प अहवाल राष्ट्रीय समितीसमोर मंजूर होणेसाठी त्यात खालील त्रुटी दूर करणेसाठी पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे आहे.डॉ.कैलास पाटील यांची नेमणूक फक्त प्रकल्प अहवाल तयार करणेपुरती मर्यादित असल्याने ह्या प्रकल्प अहवालाचा पाठपुरावा करणेसाठी संबंधित तज्ञ व्यक्तीची नेमणूक होणे आवश्यक होते.

सदर प्रकल्प अहवालाबाबत दिनांक ३० ऑक्टोबर, २००५ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे शिरडी भेटीत चर्चा झाली असता प्रकल्पाचा पाठपुरावा /पूर्तता करणेकामी श्री अभय शास्त्री, चार्टर्ड

अकौंटंट, पुणे यांनी संस्थानला दिनांक २२ ऑक्टोबर,२००५ चे दिलेल्या पत्रावर चर्चा होऊन, तातडीची गरज म्हणून त्यांचे नेमणूकीबाबत तोंडी आदेश देण्यात आले होते. त्यानुसार श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/१२५१७/२००५ दिनांक ३१ ऑक्टोबर,२००५ अन्वये रुपये एक लक्ष पन्नास हजार या एकत्रित मानधनावर नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे.

श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांनी संस्थानला अधिसूचना मिळवून देण्यासाठीचा पाठपुरावा करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे त्यांना सदर कामासाठी रुपये एक लक्ष पन्नास हजार मात्र एकत्रित मानधन द्यावयाचे असून या मानधनामध्ये जाण्या-येण्याचा व इतर सर्व खर्च समाविष्ट आहे. या एकूण मानधनापैकी रुपये २५,०००/- प्रथम भेटीच्या वेळेस, रुपये ५०,०००/- व्दितीय भेटीच्या वेळेस व उर्वरित रक्कम सदर प्रकल्प अहवालाची अधिसूचना संस्थानला प्राप्त झालेनंतर देण्यात येणार आहे.

तरी श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांच्या सदर प्रकल्प अहवालासाठी केलेल्या नेमणूकीस तसेच त्यांना द्यावयाचे रुपये एक लक्ष पन्नास हजार मात्र एकत्रित मानधनास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.३५. संस्थानकरिता नवीन वाहन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७२६.** संस्थानचे कार्यालयीन वापरासाठी असलेली वाहने बरीच जूनी झालेली असून त्यांचा दुरुस्ती व देखभालीवरील खर्च हा दिवसेंदिवस अप्रमाण होत असून वाढत आहे. त्यांचे विक्री मुल्य (रिसेल व्हॅल्यू) झपाट्याने कमी होत असल्याने याबाबीचा एकत्रित विचार करता ही वाहने जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी व त्यांचे बदल्यात नवीन वाहने खरेदी करावीत याबाबत निर्णय व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.११.२००४ चे सभेत निर्णय क्र. ११० अन्वये पारित झालेला आहे.

त्यानुसार ॲम्बेसॅडर कार ०२ सुमो ०१, हुन्डाई ॲसेंट ०१ अशा एकूण ०४ कार्यालयीन वाहने जाहिर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे. व त्यांचे बदल्यात खालीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१. | ॲम्बेसॅडर-०१ |
| ०२. | टाटा इंडीगो -०१ |
| ०३. | टाटा सुमो हिक्टा -०१ |

निर्णयाप्रमाणे टाटा ॲम्बेसॅडर व इंडीगो कार खरेदी करण्यात आलेल्या आहेत. पैकी टाटा सुमो हिक्टा खरेदी करणे बाकी आहे. टाटा सुमो हिक्टा ऐवजी संस्थानचे कार्यालयीन वापराकरीता महिंद्रा स्कॉर्पिओ ही गाडी कंपनीचे अधिकृत डिलर्सकडून निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६. साईलीला व्दैमासिकाचे वर्गणीदार वाढविणे बाबत.**

**निर्णय क्र.७२७.** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्ये व अधिकार " या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये ,"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्यांचा विस्तार करील, तसेच (ड) मध्ये श्री साईबाबांच्या भक्ती मध्ये बंधुभाव,एकता,श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल," अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री साईबाबांचे जीवनकार्याची,शिकवणूकीची व त्यांच्या लीलांची माहिती जास्तीत जास्त भक्तांना व्हावी व त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने जनसंपर्क कार्यालयात दर्शन व आरती पासेस घेण्यासाठी येणा-या प्रत्येक महत्वाच्या व्यक्तींना संस्थान प्रकाशित साईलीला या द्वैमासिकाचे रु.५०/-एवढी वार्षिक वर्गणी भरुन सभासद करुन घेणे बाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सूचित केलेले आहे. त्यानुसार जनसंपर्क कार्यालयाद्वारे याबाबत त्वरीत कार्यवाही सुरु करण्यात यावी असा निर्देश मा.अध्यक्ष महोदय.यांनी दिलेला आहे. तथापि; याबाबत कार्यवाही करावयाची झाल्यास काही महत्वाच्या व्यक्ती हया प्रत्येक आठवडयाला, प्रत्येक महिन्याला येतात. अशा व्यक्तींकडून वर्षभरात फक्त एकदाच सभासद वर्गणी घेण्यात यावी. तसेच यातून वृध्द व अपंग व्यक्तींना वगळण्यात यावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

आयत्या वेळेचा

**विषय नं.३७.** **संस्थेच्या वतीने नव्याने सुरु करावयाच्या बी.एस्सी.नर्सिंग,वैद्यकीय,**डेंटल,आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, **पदवी** व पदव्युत्तर **महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता संस्थानचे रुग्णालयात अभ्यासक्रमानुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करुन मिळणेचे सचिव,संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्था, शिंगणापूर,ता. कोपरगाव यांचे पत्र.**

**निर्णय क्र.७२८.** सचिव,संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्था,शिंगणापूर,ता.कोपरगाव यांनी त्यांचे दिनांक ०५.११.२००५ चे पत्रान्वये कोपरगाव परिसरामध्ये असलेल्या वैद्यकीय अभ्यासक्रमाची गरज लक्षात घेता बी.एस्सी.नर्सिंग व वैद्यकीय डेंटल,आयुर्वेदिक, होमिओपॅथीक,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम व्यवस्थापनाने सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तथापि, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे मानका व प्रमाणकाप्रमाणे या अभ्यासक्रमाकरिता किमान २००बेड असलेले हॉस्पिटल विद्यार्थ्यांचे प्रॅक्टीकलकरिता आवश्यक आहे.

श्रीसाईबाबा संस्थानचे वतीने ३०० बेड असलेले अद्ययावत साधन सामुग्री व उपकरणे यांनी परिपूर्ण असलेले हॉस्पिटल श्रीसाईबाबांचे कृपाप्रसादाने व विश्वस्त समितीचे सुयोग्य मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे चालविले जात आहे. या हॉस्पिटलमधील सोयी-सुविधांचा वापर संस्थेच्या वतीने सुरु करावयाचे बी.एस्सी.नर्सिंग, वैद्यकीय, डेंटल, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थांना करता येऊ शकेल.याकरिता आमचे संस्थेत बी.एस्सी.नर्सिंग वैद्यकीय, डेंटल, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थानचे रुग्णालयात अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी सुविधा उपलब्ध करुन द्यावी; अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने नव्याने सुरु करावयाच्या बी.एस्सी.नर्सिंग वैद्यकीय डेंटल, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संस्थानचे रुग्णालयात विनामोबदला सरावासाठी परवानगी देण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

## <u>दिनांक ५.११.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-</u>

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८.** **कोपरगांव शहरांतील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे काम संस्थानमार्फत करुन मिळणेबाबत कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचे पत्राबाबत**

**निर्णय क्र.७२९.** दिनांक २०/१०/२००५ रोजीचे पत्रान्वये मा. नगराध्यक्ष, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांनी कोपरगांव येथे नगर-मनमाड रोडलगत श्री साईबाबांची तपोभूमी आहे. या तपोभूमीचे दर्शन घेऊन तसेच दक्षिणगंगा गोदावरी नदीत स्नान करुन भाविक गंगेचे पवित्र पाणी श्री साई अभिषेकासाठी साईबाबा तपोभूमी ते जब्रेश्वर मंदिर ते मोहनीराजनगर मधून नगर-मनमाड हायवेने शिर्डीस पायी घेऊन जातात. सदर मार्गावर शिर्डीकडे जाणारे भाविकांची कायम वर्दळ असते. याच मार्गावरुन गंगाजल कावडी शिर्डीकडे जातात.

सदरचा मार्ग हा कोपरगांव शहरातून श्री साईबाबा चौफुली ते आण्णाभाऊ साठे पुतळा ते एस टी स्टॅण्ड ते शिवाजी पुतळा ते जब्रेश्वर मंदिर ते मोहनीराजनगर मार्गे जुनीगंगा देवी मंदिर याप्रमाणे आहे. सध्या हा मार्ग पुराचे व पावसाचे पाण्याने अगदी नादुरुस्त झाला आहे. सदर रस्त्यावरुन पायी चालणा-या भाविकांना अत्यंत खडतर प्रवास करावा लागतो.

सध्या नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने व रस्त्याचे काम हे अधिक खर्चाचे असल्याने नगरपरिषद सदरचा मार्ग दुरुस्त करु शकत नाही. तरी कृपया शिर्डीचे साईबाबांचे दर्शनासाठी दक्षिण भागातील अनेक भाविक तसेच इतर परिसरातील भाविक गोदातीरी स्नान करुन यामार्गाने शिर्डीकडे जात असल्याने श्री साईबाबा संस्थान मार्फत सदर पालखी व कावडी मार्गाचा रस्ता नवीन तयार करुन द्यावा रस्त्याचे काम संस्थानचे निधीतून करणेबाबत विनंती केलेली असून, त्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत कोपरगांव नगरपरिषदेचे मा.अध्यक्ष, पदाधिकारी व शहरातील नागरिक उपस्थित होते. त्यांनी सदरहू रस्ता संस्थानने तयार करुन देणेबाबत समक्ष विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कोपरगांव शहरांतील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे रु.१,१२,४९,५१०/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचे काम संस्थानमार्फत करुन देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोट-कलम (२) नुसार राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

| कार्यवाही | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाचे मान्यतेसाठी जा.नं.एसएसएस/ वशी-बांधकाम/१४७३४ दि.१७/१२/२००५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
|---|---|

**विषय नं.३९. आर्किटेक्ट श्री. डी. ओ. निकम, पुणे यांचे नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ७३०.** भक्तनिवास इमारतीचे पूर्वेकडील सर्व्हे न. १०७ मधील मोकळया जागेत साईभक्तांचे निवासासाठी डॉरमेटरी हॉलचे बांधकाम करणे, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करणे व मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमीनीवर विकास प्रकल्प उभारणेसाठी मास्टर प्लॅन तयार करणे. या कामांसाठी आर्किटेक्ट म्हणून सेवा पुरविणेकरिता श्री.डी.ओ. निकम, पुणे यांची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. याकामी त्यांना २ टक्के फी अधिक सर्व्हीस टॅक्स अदा करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.६५० ते ७३० सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

*Wednesday*
*08112005*